# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ३०/०८/२००३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शनिवार दिनांक ३०/०८/२००३ रोजी सभा सुचना क्र. १५ दि. २७/०८/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन म. पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन म. पाटील | सभापती |
| २) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ३) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ५) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| ६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ८) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ९) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १०) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ११) | श्री. नितीन गो. ठाकूर | सदस्य |
| १२) | श्री. मॉरस रॉड्रीक्स | सदस्य |
| १३) | श्री. हॅरल बोर्जीस | सदस्य |
| १४) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १५) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |
| १६) | श्रीम. रिटा शहा | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरुवात करावी.

**(प्र. सचिवांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.)**

**आसिफ शेख :-**

मा. सभापती साहेब, मा. उपायुक्त साहेब सभेला सुरू करण्यापूर्वी नुकताच आपण २८ तारखेला आपल्या या शहराच्या प्रथम नागरिक आदरणीय मा. महापौर श्रीम. मायरा गिल्बर्टजी मेंडोसा यांच्या यशस्वी कारकीर्दीत एक वर्षे पूर्ण झालेले आहे. त्याबद्दल ही सभा त्याचे अभिनंदन ह्या ठिकाणी करित आहे असा मी ठराव मांडतो.

मा. श्रीम. मायरा मेंन्डोसा साहेबांच्या कारकीर्दीस या शहराचा सर्वांगीण विकास झालेला आहे जी आपली पाण्ी पुरवठ्याची १३२ कोटीची योजना होती ती कार्यान्वीत झालेली आहे. त्याप्रमाणे जो रेल्वे उड्डाणपुल आहे तो रखडलेल्या स्थितीत होता तोही पुल अपुर्ण स्थितीत गेलेला आहे. लवकरच त्याचे उदघाटन होईल. त्याचप्रमाणे २७ कोटी रूपये खर्च करून आपण जो काशीमिरा रस्ता जो हेडगेवार मार्ग असे आपण संबोधितो तोही रस्ता आपण २९ कोटी रूपये वाढ करून ३२ कोटी रूपयापर्यंत गेलेला आहे. त्या रस्त्याचे काम प्रगती पथावर आहे. त्याचप्रमाणे भाईंदर(प) कडील चौपाटी विकसित करण्याच्या कामास गती प्राप्त झालेली आहे. त्याप्रमाणे भाईंदर (पू) येथील चौपाटी जिल्हाधिका-यांकडून आपल्या ताब्यात घेण्यासाठी पत्रव्यवहार झालेला आहे. त्याचप्रमाणे शहरात म्हणजे

संपूर्ण ठाणे जिल्ह्यात असं एक अभिनव उपक्रम जो राबविला की झोपडपट्टीवासियांना जे सन १९९५ पूर्वीचे झोपडपट्टीधारक आहेत. त्यांना फोटोपास देण्याची प्रक्रिया आपण सुरू केलेली आहे. त्याचप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक असे संत गाडगेबाबा अभियान अंतर्गत आपल्याला महाराष्ट्र शासनाकडून पाच लाखांचा पुरस्कार मिळालेला आहे. त्याचप्रमाणे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक प्रयत्न महापौरांकडून झालेले आहेत आणि ते प्रयत्न करित असताना आपले सर्वांचे लाडके आणि प्रथम नगराध्यक्ष गिल्बर्ट जॉन मेंडोसा यांचाही पाठिंबा यांचेही सहकार्य मिळालेलं आहे. त्याचप्रमाणे सर्व पक्षाचं भारतीय जनता पक्ष असो राष्ट्रवादी काँग्रेस असो शिवसेना किंवा जनता दल असो. सगळ्या पक्षाच्या लोकांचं पण या ठिकाणी आपल्याला वर्षभरात महापौरांना सहकार्य मिळालेल आहे.सगळ्यांचे या ठिकाणी आभार व्यक्त करून महापौरांच्या कारकीर्दास या ठिकाणी एक वर्ष यशस्वीरित्या पूर्ण झाल्याबद्दल त्याच या ठिकाणी अभिनंदन करतो असा मी ठराव मांडत आहे.

**ठराव क्र. ११२अ :-**

श्रीम. मायरा मेन्डोन्सा यांची महापौर या पदावर दिनांक २८/०८/२००२ रोजी निवड झाली. त्यांना या पदावर १ वर्षाचा कालावधी झालेला आहे. या एक वर्षाच्या कालावधीत मिरा भाईंदर शहरासाठी बऱ्याच चांगल्या सुधारणा झाल्यात व मिरा भाईंदर महापालिका क्षेत्र स्वच्छ सुंदर झाले. विविध प्रकारची विकास कामे झालीत. त्यांना सर्व राजकिय व सामाजिक नगरसेवक, कार्यकर्ते यांचे सहकार्य मिळाले म्हणून त्यांच्या कारकिर्दीस एक वर्ष पूर्ण झाल्याने त्यांचे ही स्थायी समिती सभा अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. नितीन ठाकुर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**धनराज अग्रवाल :-**

माझे असे म्हणणे आहे की सभापती महोदय, एक वर्षात आपण काम चांगले केले आहे. परंतु एक वर्ष झाल्यावर त्याचे आपण काय उजळणी केली? आपण इकडे काय मिटींग घेतली. सगळ्या नगरसेवकांना बोलावून त्यांना कायमचा आढावा दिला. काय केलं नाही.नुसतं स्थायी समितीमध्ये ठराव मांडून अभिनंदन करायचं त्याच्यापेक्षा नगरपलिकेत सर्व नगरसेवकांना बोलावून आणि त्याचे बोर्ड बॅनर वगैरे लावले पाहिजे होते. प्रशासन चुकलेले आहे आणि ते त्याच्या कामाचं सर्व पक्षांनी त्यानां सहकार्य केलेले आहे. तुम्ही जे शासकीय लोक आहेत. त्यांनी आणि मुख्य म्हणजे सभापतीनी तुम्ही त्याचा आढावा बरोबर घेतला पाहिजे होता आणि लोकांना माहिती पडलं पाहिजे हे काम चालु आहे. तुमची यामध्ये चुकी झालेली आहे.ती चुकी तुम्ही पुर्ण करून घ्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी हा ठराव मांडलेला आहे. या ठरावाला अनुमोदन झालेलं आहे. कोणतेही चांगले काम होत असताना विरोधकांनी विरोधी भूमिका मांडली पाहिजे आणि ती भूमिका मांडल्यानंतरच आम्हाला वाटते की, आम्ही शासकीय नाही सत्ताधारी आहोत असे आम्हाला वाटते आणि सन्मा. सदस्य धनराजजी यांना मी सांगू इच्छितो की, मा. महापौरांच्या दालनामध्ये विविध पक्षांच्या नगरसेवकांनी येऊन त्यांना अभिनंदन केले. तेथे बैठकीमध्ये थोडीशी त्यांची चर्चादेखील झाली आणि तशाप्रकारची एक पुस्तिका आपण मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये जी झालेली कामे आहेत ज्या कामाचा झालेला आढावा त्या कामाची पुस्तिका करायला घेतली आहे. परंतु त्या दिवशी जी पुस्तिका ज्या प्रकाशनात दिली होती. त्या दिवशी ज्या ठिकाणी पुस्तिका दिली त्या ठिकाणी त्याच दिवशी बॉम्बस्फोट झाल्याकारणाने त्या पुस्तिकेचे छपाई काम राहून गेले. म्हणून त्याच्यामध्ये आम्ही असा निर्णय घेतला की, महापौर मॅडम आता ७-८ दिवस रजेवर आहेत. त्या आल्यानंतर पुस्तिकेचे उदघाटन, या शहरामधील बॅनर्स त्याला प्रसिध्दी माध्यमातून त्याचा एक वर्षात झालेला कार्यकाल याची माहिती शहराला द्यायची अशा पध्दतीचा ७-८ दिवसांनी हा कार्यक्रम धेण्यात येणार आहे. आपण अशी माहिती पहिल्यांदा घ्यावी. आणि नंतर मग प्रामुख्याने सभापती किंवा प्रामुख्याने इतर शासकीय लोक किंवा

सत्ताधारी लोक अशा नंतर आपण या विषयावर चर्चा करावी. कारण या विषयावर प्रत्येकाला एक आनंद आहें. प्रत्येकाला असे वाटते की कार्यक्रम चांगला झाला पाहिजे. आपण ज्या भावना व्यक्त केल्या त्या भावना पाठीमागे आपल्याला आनंदाची भावना व्यक्त करायची होती त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो आणि या विषयावर चर्चा होऊ नये पुढील विषय मांडावा.

**याकुब कुरेशी :-**

सभागृहाला सांगू इच्छितो की, मागच्या सभेमध्ये आपण ठरविले होते की अत्यंत किचकट असा विषय पाणी आणि घरपट्टी या दोघांपेक्षा वेगळा असलेला विषय आणि तो आज विषयपत्रिकेवर मागच्यावेळी सांगितले असतानासुध्दा हा विषय घेतला नाही. आणि गावातील लोक अतिशय संतापलेले आहेत. अशा परिस्थितीत आपण ज्यावेळी ठरवतो की, असा तातडीचा विषय तातडीने सभागृहासमोर आणावा पण तो आणलेला नाही. तरीसुध्दा मी केळकर साहेबांना विनंती करतो की घरपट्टी आणि पाणीपट्टी हे दोन्ही भाग वेगवेगळे आहे.

**मा. सभापती :-**

या विषया संबंधी कोणी अधिकारी उपस्थित आहेत का? केळकर साहेब एक तर त्या आपण ठरवलं होते की विभागाची लोक पाहिजेत विभागाच्या अन्य लोकांना ऑफिस सोडून जायला सांगायचं नाही आणि तिथे सध्या विभागप्रमुख आहेत. पण विभागप्रमुखांनी उपस्थित राहिलं पाहिजे. विषय नसेल तो भाग वेगळा आहे. पण विभागप्रमुखांनी राहिलं पाहिजे आणि आज शहरामध्ये जो प्रश्न उपस्थित केला.त्याबद्दल जो प्रस्ताव आहे. तो ते मांडणार आहेत. परंतु अशा वेळेला सभेला डिपार्टमेंटचे अधिकारी असतील त्यांनी सभेला ११ वाजता उपस्थित रहायला पाहिजे. यापुढे असे होता कामा नये.

**नितीन ठाकूर :-**

माननिय उपायुक्त साहेब, सभापतीसाहेब एक विनंती करु इच्छितों की आपण आज स्टॅन्डीग कमिटीची सभा लावली आज जे प्रत्येक हिन्दु आहेत त्यांच्याकडे गणपतीची धावपळ आहे. कोंणाची सार्वजनिक मंडळे आहेत,कोंणाच्या घरी गणपती येतात असं असताना प्रशासनाने मोठी चुक केलेली आहे. कालचा दिवस प्रशासनाने वाया घालवला आहे प्रशासनाने आज सभा बोलावली आहे. अशी घटना पुढच्या चार वर्षामध्ये होऊ नये अशी मी आशा बाळगतो.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती महोदय, आणि सन्मा. उपायुक्त साहेब मी प्रस्ताव मांडलेंला मागच्या वेळी पण चर्चा झाली आणि तेव्हा असं आश्वासन देण्यात आलं होत की पुढच्या वेळी हा विषय विषयपत्रिकेत घेऊन किंवा संबंधित विभागाचे उपायुक्त या ठिकाणी येऊन आपल्याला सांगणार असे आश्वासन मला वाटते, करनिर्धारक आणि संकलक यांनी दिलेलं आहे त्यावर आज कोणीही उपस्थित दिसत नाहीत.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, आता तुम्ही प्रस्ताव मांडता तर आम्ही मागच्यावेळी प्रस्ताव मांडला आहे की तुम्ही टॅक्स आणि पाण्याबाबत लवकर करुन घ्या. सभापती आपण आहात आणि आपणच केले होते. आपणच विषय आणला पाहिजे होता. आता प्रस्ताव मांडणार त्याचा अर्थ काय? मला काही समजत नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल, प्रशासनाच्या अनुषंगाने प्रशासन जेव्हा एखाद्या शहराला रेव्हेन्यू देण्याच्या बाबतीमध्ये जर अग्रेसिव्ह असेल तर त्या प्रशासनाच्या भुमिकेवर जर प्रशासनाच्या काही अडचणी असतील तर त्या अडचणी त्यांच्यापर्यंत आहेत. कारण विषय जरी आपण मांडला तरी त्या विषयावर टिप्पणी आणि गोषवारा डिपार्टमेंटचा असतो आणि तशी मी चर्चा कमिशनरबरोबर केली त्यावेळी उपायुक्त केळकरसाहेब तिथे उपस्थित होते.त्यांनी सांगितले कायद्याच्याबाबतीत सुध्दा बोला किंवा अन्य जो रेव्हेन्यू मिळणार आहे. त्याच्याबद्दल ही भुमिका घेऊ नका आणि तशा प्रकारचा विषय तुम्ही घेतल्यानंतर गोषवारा देण्यास आम्हाला ही अडचण होईल. म्हणुन सन्मा. सदस्य याकूब कुरेशी यांनी हा शुन्य प्रहरामध्ये जो विषय काढलेला आहे. या शुन्य प्रहारच्या विषयामध्ये आम्हाला जो सदस्यांना अधिकार आहे. लोकशाहीच्या माध्यमातून त्या अधिकाराचा आम्ही वापर करित आहोत आणि कुरेशी साहेबांनी जो इथे आणलेला प्रस्ताव आहे. या प्रस्तावामुळे या शहरामध्ये घबराट सुरू झालेली आहे. शहरामध्ये लोक सळो कि पळो झालेली आहेत. पिण्याचं बिल भरायचं की कर भरायचा. घरात राहायचं की पाणी घ्यायचं की नाही घ्यायचं की घर सोडून जायचं. अशा प्रकारचा विषय केळकर साहेब झालेला आहे म्हणून आज हा विषय शुन्य प्रहारामध्ये त्यांनी काढलेला आहे आणि या विषयांवर

साधक बाधक चर्चा होईल. याच्यावर काय रूलिंग द्यायचं आणि अधिका-यांनी काय ठरवायचं. त्या अधिका-यांना कोणते निर्णय द्यायचे तें आपल्या ह्या चर्चेच्या विषयामध्ये होऊन जाईल तर चर्चा सुरु करावी.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, आपण सांगितलं की अधिका-याने सांगितलं तो विषय घेऊ नका. परत तो विषय येणार नाही चर्चा होऊन त्याचा फायदा होत नसेल तर नुसता प्रस्ताव मांडुन त्याचा फायदा नाही.

**मा. सभापती :-**

आपण चांगले संसदपटू आहात हे माहित आहे. परंतु आपण सुध्दा जाण ठेवा की जेव्हा चर्चा झाल्यानंतर त्या शुन्य प्रहराच्या चर्चेला महत्व असतं जेवढं महत्व इतर चर्चेला असतं त्याच्यापेक्षा शुन्य प्रहरामध्यें जी आपण चर्चा करतो त्याला जास्त महत्व असते. आणि त्या महत्वच्यानंतर प्रोसिडींगमध्ये जो विषय येईल तो विषय आल्यानंतर प्रशासनाला तुमचे काम करावे लागेल. म्हणून तुम्हाला मी सांगत आहे की हा विषय घेतल्यानंतर चर्चेला जो आलेला विषय आहे त्याच्यावर प्रशासनाला कारवाई करावी लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब जी आपण आता शुन्याचा जो उल्लेख केला नेमका शुन्य प्रहर चालु कधी होतो. शुन्य प्रहराची वेळ काय? चर्चा आपण करा.आम्ही तुमच्या चर्चेत सहभागी होत आहोत. शुन्य प्रहराची वेळ कोंणती?

**मा. सभापती :-**

सभा संपते ती शुन्य प्रहराची वेळ.

**मिलन म्हात्रे :-**

नाही सभाशास्त्र काढा. बाराचा काटा क्रॉस झाला की शुन्य प्रहर चालु होतो. डी.एम.सी. साहेबांना विचारा.

**आसिफ शेख :-**

अत्यंत नाजुक आणि महत्वाचा विषय होता त्यामुळे मागच्या वेळी आम्ही उपस्थित केलं की गावात आग लागलेली आहे आणि जेव्हा आग लागते तेव्हाच फायर ब्रिगेडने पाणि टाकायचे असते त्यासाठी विषय किंवा विंषयपत्रिकेवर नंतर चर्चा असे नसते आणि ही आपली स्थायी समिति आहे. संपुर्ण व्यवस्थापन करण्याची समिती आहे. जे विषय लोकांच्या हिताचे असतात त्याला अगोदर प्रधान्य द्यायला पाहिजे. टॅक्स आणि पाणी हे दोन्ही वेगळे विषय अत्यंत ज्वलंत विषय आहेत. नाजुक विषय आहेत. एका ठिकाणी तुम्ही सगळ्या लोकांना नोटिसा पाठविल्या आहेत आणि सोसायट्यांना नागरिकांना तुम्ही कंपलशन केले की तुम्ही कंपलसरी आम्हाला ७५ टक्के टॅक्स द्या. तेव्हाच आम्ही तुमचं पाणी बिल स्विकारू आणि पाणि भरायला आले की तुम्ही पाण्याचं बिल घेत नाही. मागच्या वेळी सभापती साहेब आपण सांगितलं की आम्ही तुर्त ओरली स्थगिती देतो. परंतु त्याची अंमलबजावणी प्रशासनातर्फे झाली नाही. दोन्ही विभागांमध्ये काही को-ऑर्डीनेशन नाही. टॅक्स विभाग आणि पाणी विभाग दोन्हीमध्ये को-ऑर्डीनेशन पाहिजे. असा निर्णय स्थायी समितीमध्ये झालेला आहे. सभापती साहेबांनी असे रुलिंग दिलेले आहे. एवढे सांगूनसुद्धा काही झाले नाही. लोकांना फे-या माराव्या लागत आहेत आणि आम्ही सांगितले, पाणी बिल तुम्हांला जर घ्यायचे नसेल तर ते घेऊ नका. टॅक्स अगोदर घ्या. परंतु नळ कनेक्श्न कट करु नका आणि त्यांच्यावर विलंब शुल्क लावू नका अशा स्पष्ट सुचना आपल्याला दिल्या असतांना देखील प्रशासन काही याच्यावर अंमलबजावणी करायला तयार नाही. मग उपयोग काय? स्थायी समितीमध्ये आपण म्हणतो सचिव साहेब आम्हांला दरवेळी पत्र पाठवतात की, अशी सभा आयोजित केली आहे आणि खाली म्हटले आहे, मा. स्थायी समितीच्या आदेशानुसार. स्थायी समितीचा आदेश तुम्हांला मिळाला ना. स्थायी समितीने हा निर्णय घेतला म्हणजे आदेश झाला. रुलिंग झालं. मग अर्थ काय स्थायी समितीला? इथे आपण पाहतो की, सगळं सामोपचाराने, सगळ्यांना विश्वासात घेऊन आपण काम करित आहोत आणि असे असतांना देखील नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. सभापती साहेब तुम्ही रोखठोक भुमिका यामध्ये घ्या आणि आजच्या आजच यावर तुम्ही एक निर्णय घेऊन लोकांना या त्रासापासून मुक्त करा.

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापती साहेब, उप आयुक्त साहेब, आपण गेल्या मिटींगमध्ये अशी एक बाब ठरवली होती की स्थायी समितीचे विषय संपल्यानंतर जे विशेष उल्लेख असतात त्याचा त्यानंतर उल्लेख केला जावा. त्याच्यात त्या सुचना कराव्यात असे ठरवले होते. आज पुन्हा आपण त्याच गोष्टीवर येतो. विषय अतिशय महत्वाचा आहे, मी मानतो. आमचे मित्र आसिफ शेख अतिशय कळकळीने मुद्दा मांडतात पण मुद्दा या विषयांनंतर मांडावा अशी मी विनंती करतो. जमलं तर सांभाळून घ्या. कारण गेल्या वेळी आपला तसा निर्णय झाला नाही तर ह्या विषयावर जेवढे तुम्ही बोलता तेवढेच सर्व नगरसेवक बोलतील आणि आपली सभा बाजूला राहिल.

**मिलन म्हात्रे :-**

नाहीतरी ठरलेले आहे. पहिले इतिवृत्तांत नंतर विषयपत्रिका, नंतर विषय.

**धनराज अग्रवाल :-**

आज नविनच इकडे शुन्य काळचा विषय आला.

**मिलन म्हात्रे :-**

आतापर्यंत शुन्य काळाचा विषय कधी आलाच नाही. आम्हाला सांगितले की पहिले प्रोसिडींग घेऊ द्या. विषयपत्रिका पूर्ण होऊ द्या आणि मग बोलायचे. मागे जेव्हा आरोग्याचा प्रश्न आला तेव्हा सभापती उठून निघून गेले.

**धनराज अग्रवाल :-**

म्हणजे सवलतीप्रमाणे आपण शुन्यकाळ लावायचा असे काय आहे. नियमाप्रमाणे चला.

**याकुब कुरेशी :-**

म्हणजे तुम्हांला काय वाटते, हा विषय घेऊ नये का? हा विषय अतिशय गंभीर आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मी सांगतो तो विषय सभापतींनी का घेतला नाही?

**मिलन म्हात्रे :-**

सभापतींनी आणि प्रशासनाने तो विषय विषयपत्रिकेवर घ्यायला पाहिजे होता.

**मा. सभापती :-**

मी तुम्हांला विषयाची माहिती दिलेली आहे. तुम्हांला उत्तर दिलेले आहे. समाधान मानायचे असेल तर समाधान मानून घ्या.

**धनराज अग्रवाल :-**

आम्ही जोपर्यंत हा विषय असेल तोपर्यंत सभात्याग करीत आहोत.

**चंद्रकांत वैती :-**

सभापती साहेब, आतापर्यंत आपण अतिशय चांगल्या पद्धतीने सभेचे निर्णय चालवले आहेत, घेतले आहेत आणि खेळीमेळीच्या वातावरणामध्ये घेतलेले आहेत. आज अशी काही विशेष बाब झालेली नाही की, आपण एवढे ओरडायला पाहिजे. आपण अतिशय चांगल्या पद्धतीने सभा चालवता, कामकाज चालवता. आमचा अनुभव आहे. आज आपण जो काही फेरबदल केलेला आहे तो बदल आपण रद्द करावा आणि सन्मा. धनराजजी आणि बी.जे.पी. च्या सदस्यांना विनंती करतो की, या महानगरपालिकेच्या विकासात्मक मुद्यांवर चर्चा करायची आहे. आपण आपला निर्णय बदलून पुनश्च आपले स्थान ग्रहण करावे.

**मिलन म्हात्रे :-**

नाही. निर्णयाचा प्रश्नच येत नाही. डी.एस.सी. साहेब तसे नाही. या अगोदर नियमानुसार प्रथम प्रोसिडींग, विषयपत्रिकेचे वाचन, विषयपत्रिकेचे बदललेले ठराव पुर्ण झाल्यानंतर प्रत्येक विषय घेतले जातात. मागच्या वेळेला जो आरोग्याचा प्रश्न आला तो तुम्ही सोडवला का? तुम्ही काय बोललात? मिटींग झाल्यानंतर ठरवू. मिटींग झाल्यानंतर सगळे पळाले. प्रश्न तसाच पडून राहिला. तुम्ही विषयपत्रिका घ्या. आमची देखील संमती आहे. आमची पत्र त्याच्यावर आहेत. हिअरिंग द्या लोकोना. मागच्या वेळी ह्याच्यावर भाषणे झालेली आहेत. काही मागण्या आम्ही सुद्धा केलेल्या आहेत. विषयपत्रिका सुरु करा. संपल्यानंतर तो विषय घ्या.

**हेरल बोर्जिस :-**

म्हात्रे साहेब, विषयावर चर्चा करु नये अशी कोणाचीच भावना नाही.

**मा. सभापती :-**

मी तुम्हांला काय सांगतो की, या ठिकाणी जेव्हा सभापतींनी तुम्हांला सांगितल्यावर प्रत्येक सदस्यांनी आपल्याला बोलायला आम्ही संधी देतो आणि उपरोक्त जर आपण जास्त बोलत असाल, सभागृहामध्ये प्रत्येक सदस्याला बोलले पाहिजे. प्रत्येक सदस्यांनी आपली भुमिका मांडली पाहिजे. प्रत्येकाला मोकळीक आहे. पण प्रत्येकाने विचारले की, मीच बोलेन बाकीचे बोलणार नाही असे विषय होऊ शकत नाही. आज शहरामध्ये वस्तुस्थिती काय चालली आहे. सन्मा. सदस्य म्हात्रेजी आपण जेव्हा कोणतीही सिरियस बाब सभागृहामध्ये मांडता तेव्हा आपण त्या मांडलेल्या विषयाला किंवा कोणत्या बाबीला आम्ही कधीही तुम्हांला या ठिकाणी नाही बोललो नाही की, तुम्ही बोलू नका म्हणून. पण आज या शहरामध्ये पाण्याच्या प्रश्नावर रोज लोक पैसे घेऊन या पालिकेमध्ये येतात. पाण्याचे पैसे घेऊन येतात, कराचे पैसे घेऊन येतात. कर भरला नाही म्हणून पाण्याचे पैसे घेतले जात नाहीत. लोकांनी येथे काय करायचे? सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल, आपल्याला या विषयावर बोललो नाही. मी विषया संदर्भात चर्चा करुन बोललो. आपण आपल्याला रुलिंग दिल्यानंतर आपल्याला गप्प बसायला सांगितले तर आपण गप्प बसले पाहीजे. प्रत्येक सदस्यांना बोलायला संधी दिली पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

या सभागृहामध्ये मागच्या वेळी तुम्ही बोलता की, हा विषय गंभीर आहे. संपूर्ण प्रशासनाचे काम होते, विषयपत्रिकेवरील विषय क्रमांक इतिवृत्तांतानंतरचा जो विषय येतो त्याच्यानंतर हा विषय लावायला पाहिजे होता. का लावला नाही? हे कन्ट्रोलिंग कोणाचे आहे? सर्व कंन्ट्रोलिंग पावर सभापती साहेब आपले आहेत आणि तुमचे जे प्रशासकीय अधिकारी आहेत त्यांच्या आहेत. जे इकडे सचिव बसलेले आहेत. सचिवांच्या समोर ही चर्चा झाली. त्यांनी हा विषय अगत्याने लावायला पाहिजे होता. महत्वाचा विषय असून सभागृहामध्ये मागे चर्चा झाली असूनसुद्धा तो विषय घेतलाच नाही. म्हणजे आपली पकड या सभागृहावरती दिसून येते. म्हणजे निंदेचा विषय आहे हा. मागच्या वेळेला आरोग्याचा प्रश्न झाला पण अजून विषय पत्रिकेवर तो प्रश्न लावलेला आहे का? नाही लावला आहे. हे जे चालले आहे तेच सांगातो की, हे फार चुकीचे आहे. निदान आमचे सोडा आम्ही सदस्य आहोत. तुम्ही पीठासन सभापती आहात तुमच्या आदेशाचे पालन झाले पाहिजें. प्रश्न तुम्ही मोठे का आम्ही मोठे तो नाही. याकुब कुरेशी यांनी जो प्रश्न मांडला त्या विषयावर मागच्यावेळी सर्व सदस्यांनी चर्चा केली. आपण सुद्धा एवढे चिडण्याची काही एक गरज नाही. आम्हांला हे वाईट वाटते की, तुमच्या निर्णयाचे पालन कोण करीत नाही. आमचे म्हणणे ते आहे. कशाला आम्ही सगळ्यांनी कामधंदे टाकून इकडे यायचे, वेळ घालवायचा. महत्वाचे विषय मांडायचे आणि मग प्रशासनाने त्याची दखल घ्यायची नाही. विषय दोन ओळींमध्ये टाकायला भारी पडत होता का?

**मा. सभापती :-**

या ठिकाणी प्रशासनाने मनमानी जे नियम आलेले आहेत. थोड्याशा प्रशासनाच्या चुकीमुळे मागच्या सभेला चर्चा झाली. आम्ही कमिशनरकडे गेलो. आमचे अधिकार आहेत. आम्ही आमच्या अधिकाराचा वापर केला पाहिजे. परंतु प्रशासनालाही बरोबर घेऊन जावे अशी आमची सदिच्छा असते. सन्मा. सदस्यांची बोला की, सभापती या नात्याने बोला, प्रत्येकाची इच्छा असते, सदिच्छा असते की, प्रशासनाने आपल्याबरोबर चालले पाहिजे. प्रशासन आपल्याबरोबर राहिले पाहिजे. जर अशा पद्धतीचा प्रशासनाने जर गैरअर्थ प्रशासन काढत असेल, सन्मा. उप आयुक्त साहेब, केळकर साहेब आणि सन्मा. उप आयुक्त नाईक साहेब, मी सांगू इच्छितो की, जर आपल्या सहकार्याची आम्ही अपेक्षा करीत असलो आणि आपल्या सहकार्याच्या अपेक्षेमध्ये सभागृहामध्ये विशिष्ट गदारोळ माजत असेल. सदस्या सदस्यांमध्ये, मतांमध्ये विभिन्नता दिसत असेल तर ती होता कामा नये. आज आपण मनमानी करुन अशा पद्धतीने कर राहत्या कराचा कर आणि पाण्याचे बिल याचा कोणताही मेळ बसत नसतांना आज शहरामध्ये ज्या पद्धतीने आपण जे वातावरण निर्माण केलेले आहे यात संपूर्ण जबाबदार प्रशासन आहे आणि कधीही मी आजपर्यंत सन्मा. सदस्यांच्या वतीने प्रशासनाच्या कोणत्याही बाबतीमध्ये त्रास होईल असे कोणतेही कामकाज सदस्यांकडून किंवा असे कोणतेही आदेश सभागृहाकडून आपल्याला मिळाले नाहीत. मागच्या सभेला हा विषय झाला होता आणि मागच्या सभेला हा विषय झाला असताना सुद्धा जो विषय आणल्यानंतर अर्ध्या तासान आम्ही ती चर्चा घडवून आणल्यानंतर इतिवृत्तांतामध्ये नोंद होत नाही म्हणून हा विषय शुन्य प्रहारामध्ये म्हणजे सभा सुरु असतांना अत्यावश्यक बाब म्हणून हा विषय घ्यावा म्हणून हा विषय घेतला गेला. जर आमच्या सन्मा. सदस्यांमध्ये जर मतभिन्नता निर्माण होत असेल तर अशा प्रशासनावर आम्ही कोणत्याही पद्धतीने चालवलेले कामकाज आहे. ते कामकाज

आम्ही कधी समाधानी राहणार नाही. आम्ही असमाधानी राहू आणि जर शहरामध्ये वेगळ्या प्रकारचे वातावरण निर्माण होत असेल त्याला संपूर्णपणे जबाबदार प्रशासन राहील. कारण नागरिकांमधून आम्ही निवडून आलेले आहोत. नागरिकांच्या वतीने आम्ही या ठिकाणी आलेले आहोत. या नागरिकांना जर कुठली गैरसोय होत असेल, नागरिकांना कोणता त्रास होत असेल, नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होत असेल तर आम्ही लोकप्रतिनिधी राहून इथे अर्थ नाही. आम्ही जर सभापती बोला किंवा स्टँडींग कमिटी सदस्य बोला किंवा अन्य महासभेचे सदस्य बोला. या ठिकाणी आम्ही लोकांमधून आलेलो आहोत आणि आम्हांला लोकाभिमुख रहायचे आहे. लोकांची कामे आम्हांला करायची आहेत आणि अशा पद्धतीने जर कोणत्याही पद्धतीने आपण घेतलेले निर्णय शहराला हानीकारक असतील तर ते निर्णय प्रशासनाकडून आलेले निर्णय आम्ही मान्य करणार नाही. आम्ही नागरिकांच्या बाजून उभे राहू आणि लागेल त्या वेळेला कोणत्याही, गांधीच्या मार्गाने बोला किंवा लोकशाहीच्या मार्गाने बोला, जे प्रश्न सोडवता येतील ते प्रश्न आम्ही सोडवू आणि या विषयावर फक्त नाईक साहेब आपण या ठिकाणी आलेले आहात तर आपण आपला खुलासा द्यावा. खुलासा समाधानी असेल तर आम्ही चर्चा करणार नाही आणि खुलासा असमाधानी असेल तर चर्चा करावी लागेल. कृपया नाईक साहेबांनी या विषयावर चर्चा करावी.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेब आणि सन्मा. सभासद, महानगरपालिका हद्दीमध्ये एकूण एक लाख सत्याऐंशी हजार खातेदार आहेत. त्यामध्ये आठ ते नऊ हजार टॉवर आहेत. मागच्या वर्षाची वसुली आणि यापुर्वी नगरपालिका असतांनाची वसुली याचा जर हिशेब पाहिला तर वसुली फार कमी प्रमाणात झालेली होती. म्हणून मागच्या वर्षी ज्या वेळेला मी आयुक्त होतो त्या वेळेला पाणीपट्टी आणि प्रॉपर्टी टॅक्स जो पर्यंत प्रॉपर्टी टॅक्स भरणार नाही तोपर्यंत पाणीपट्टी स्विकारणार नाही अशा तऱ्हेने आदेश मी दिला होता. त्यावेळेला जरी ७६ टक्के वसुली झालेली असली तरी प्रत्यक्षात ती ८६ टक्के होती. कारण या नगरपालिकेत जुनी घरे पाडून नवी बांधली, नवीन घरावर टॅक्स लागला पण जुन्या घराचा टॅक्स जो होता तो लावतानाच कमी करायला पाहिजे होता. तो कमी केला गेला नाही. त्यामुळे ते कमी करण्याचे अहवाल मागच्या वेळेला मागवले होते. मागे नगरपालिका असतांना स्थायी समितीपुढे ठेवण्यांत आले होत. स्थायी समितीने मंजुर केलेले नाही. त्यामुळे ती रक्कम तशीच राहिलेली आहे. आता आयुक्त साहेबांबरोबर चर्चा केल्यानंतर ते प्रशासनाच्या अखत्यारीत विषय असल्यामुळे आयुक्त साहेब, जुनी इमारत पाडून जर नवीन बांधली असेल आणि नवीन इमारतींवर टॅक्स लागला असेल तर जुना टॅक्स माफ लावतांनाच करायला पाहिजे होता असे सांगितल्यामुळे सविस्तर अहवाल त्यांच्याकडे सादर करण्यांत येईल. आता सध्या नागरिकांची जी परिस्थिती आहे की, काही टॉवरमध्ये बिल्डर बिल्डींग बांधून निघून जातात. काही रिकाम्या असतात आणि त्यांचे पत्ते सापडत नाहीत. विकले आहेत हे सापडत नाही. निदान राहत्या लोकांच्या कडून टॅक्स वसुल व्हावा आणि रिकाम्या असलेल्या घराचा जर लिलाव करायचे ठरवले तरी जवळ जवळ ७०-८० हजार, ८ ते ९ हजार फ्लॅट रिकामी सापडतील आणि प्रत्येकाचा लिलाव करणे आणि प्रोसिजर फॉलो करणे मार्च अखेरीस शक्य होत नाही. जेणेकरुन पाणीपट्टी अडवनू प्रॉपर्टी टॅक्स जेवढा वसुल करता येईल तेवढा आताच करुन घ्यावा आणि त्यानंतर लिलावाचे प्रोसिजर सुरु करावे म्हणून ही पद्धत सुरु केलेली आहे. सोसायटीला एकच बिल मिरा भाईंदर महापालिकाच देते असे नाही. ठाणे महापालिका, कल्याण डोंबवली, मुंबई महापालिका सोसायटीला एकच बिल देते. प्रत्यक्षात एक बिल महापालिकेला साडेचार रुपयांना पडते. जर आपण सर्व फ्लॅट ओनरना बिल वैयक्तिक द्यायला गेलो तर जबाबदारी फिक्स होत नाही आणि जे ते मी भरलेले असल्यामुळे सोसायटीचे कनेक्शन कट करु नये असे म्हणतात आपण सोसायटीवर जबाबदारी सोपवलेली आहे आणि नागरिक राहत असतांनादेखील त्यांनी जर टॅक्स भरला नाही तर सेक्रेटरी आणि चेअरमन यांना आपण अधिकार देतो की, त्यांच्यावर तुम्ही इन्डीविज्युअल फ्लॅटचे कनेक्शन कट करा. म्हणजे इतर नागरिकांना त्रास होणार नाही. साडेचार रुपयांप्रमाणे जे बिलिंग पाठवावे लागते ते बिल रक्कम कमी व्हावी हा एक उद्देश आणि इतर भागामध्ये सोसायटीलाच बिल देतात आणि पाणीपट्टी व इतर कर भरल्याशिवाय रक्कम न भरल्यास कनेक्शन कट करण्यांत येईल अशी नियमामध्ये प्रोव्हिजन आहे. या संबंधी हायकोर्टात तीन केसेस गेल्या होत्या. तीनही केसेसमध्ये महापालिका जिंकलेली आहे आणि ही सांगड घालण्याचा उद्देश हा तुमच्यासाठीच आहे. नगरपालिकेचा विकास व्हायचा असेल तर पैसा लागतो आणि पैसा नसेल तर मिटींग घेऊन पण काय उपयोग होणार नाही. आपण १८ टक्के व्याजाने गव्हर्नमेंटच्या कर्जाचे हप्ते भरतो. दर सहामाहीला पाच कोटींचे हप्ते भरतो आणि जर रक्कमच भरायला नसेल तर व्याज दामदुप्पट होत जाते आणि जर वेळीच भरले नाही तर दंड द्यावा

लागतो आणि दर सहामाहीला पाच कोटींचा हप्ता आहे आणि सध्या नगरपालिकेमध्ये चालू असलेली कामे, भरावा लागणारा कर्जाचा हप्ता याचा विचार करता नगरपालिकेचा दर महिन्याला होणारा पगार ही उपविधीमध्ये असलेली तरतुद ही हायकोर्टामध्ये दाखविलेली तरतूद आणि ॲफिडेव्हीट याप्रमाणे हायकोर्टानेसुद्धा नगरपालिकेला वसुलीसाठी हा मार्ग म्हणजे उपविधीमध्येच तरतुद आहे. कर पाणीपट्टी व इतर कर असा शब्दप्रयोग असल्यामुळे हायकोर्टातसुद्धा महापालिकेच्या बाजूने केस झालेली आहे हे आता आपण जरी प्रत्यक्षात कृतीमध्ये अजूनही केलेले नाही. नागरिकांना प्रॉपर्टी टॅक्सची बिले मिळालेली आहेत. पंधरा दिवस गेल्यानंतर फक्त आपण आता तोंडीच लोकांना सांगतोय. नळ कनेक्शन तोडायची वेळ अजूनही महिनाभर येणार नाही. महिना झाल्यानंतर जर ज्या ज्या नागरिकांनी टॅक्स भरले नाहीत त्यांचे नळ कनेक्शन कट करण्यांस सुरुवात करणार आहोत. यामध्ये नगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीकोनातून ही पावले उचललेली आहेत असे नागरिकांना त्रास देण्याचे किंवा नागरिक स्वखुशीने इतर ठिकाणी खर्च करायला तयार असतात. पण महापालिकेचा पैसा वसुल करायचा असेल तर आम्हांला कोणते तरी नियम किंवा कायद्याचा आढावा घेतल्याशिवाय रक्कम भरायला लोक तयार होत नाहीत. म्हणून नगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीकोनातून ही पावलं उचललेली आहेत. यात काही चुक झाली असे मानत नाही. कृपा करुन आपण समजून घ्यावे आणि वसुलीमध्ये अशी सांगड न घातल्यास वसुली होणार नाही आणि वसुलीमध्ये परिणाम होईल. प्रत्येक प्रॉपर्टी लिलाव करत आपण जायचे म्हटले तर जवळ जवळ साठ-सत्तर टक्के प्रॉपर्टी लिलाव करावा लागेल. पाणीपट्टीचा धाक दाखवून त्यामध्ये २५-३० टक्केच शिल्लक राहतील. त्यावेळेला ही ॲक्शन घेणे सोयीचे होईल. आता जर वसुलीची आकडेवारी पाहिली तर पुर्वी दर दिवसाला पन्नास हजारापर्यंत वसुली होत होती आणि सध्या आता आठ-दहा दिवसांमध्ये प्रत्येक दिवसाला नऊ लाख. एकोणतीस तारखेला ६ लाख ५० हजार, अठ्ठावीस तारखेला १० लाख ४९ हजार, सत्तावीस तारखेला ८ लाख २६ हजार, सव्वीस तारखेला ७ लाख ४१ हजार, पंचवीस तारखेला १५ लाख ४२ हजार, बावीस तारखेला ८ लाख ९२ हजार, वीस तारखेला ३ लाख २४ हजार हे ॲक्शन सुरु केल्यापासून वसुली. ४ लाख ६८ हजार अठरा तारखेला २ लाख ७६ हजार.

**आसिफ शेख :-**

उप आयुक्त साहेब, जी तुम्ही संपूर्ण माहिती दिली ती जरा विभागाप्रमाणे द्यावी म्हणजे मिरा रोडला किती, भाईंदरला किती त्याप्रमाणे, म्हणजे एकंदर कॅल्क्युलेशन करतांना आपल्याला ते सोयीस्कर पडेल.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सोा.) :-**

हा जर विभागाप्रमाणे हवा असेल तर

**मा. सभापती :-**

नाही, सन्मा. सदस्य आसिफ शेखजी प्रश्न विभागाचा नाही.

**आसिफ शेख :-**

गावातील स्थानिक नागरिकांचा आपण विचार करीत आहोत.

**मा. सभापती :-**

इथे स्थानिक नागरिक आहेत. जनरल नागरिक आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेत आपण सगळे नागरिकच आहोत. रहिवासी आहोत. परंतु कराच्या बरोबर पाण्याची बिले हा जो विषय आहे तो संपूर्णपणे वेगळा विषय आहे आणि बजेटच्या मिटींगमध्ये हा विषय सन्मा. उप आयुक्त साहेब, बजेटमध्ये तरतुद करतांना आपण असा विषय देखील आणला होता की, कराच्या बरोबर पाण्याची बिले गेली पाहिजेत. हा विषय झाला होता त्यावेळी सभागृहाने ही बाब मान्य केली नाही. महासभेनुसारही बाब मान्य झालेली नाही. स्थायी समितीमध्ये सुद्धा ही बाब मान्य झालेली नाही आणि अशी बाब मान्य न झाल्यानंतर आपण पुन्हा तो विषय आपल्या पद्धतीने करता. आपल्याला वसुली होते हा विषय वेगळा आहे. हा विषय दुय्यम आहे. परंतु पुन्हा आपण अशा पद्धतीने विषय आणत असाल तर ही आपली मनमानी आहे प्रशासनाची. वसुली होते हा विषय नाही. स्थायी समितीच्या चर्चेमध्ये हा विषय आला. महासभेला पण हा विषय गेला. त्याच्यामध्ये आपण, प्रशासनाने दोन्ही ठिकाणी बाब मांडली की, आपण ही बिले एकत्र काढू. कराच्या बरोबर पाण्याची बिले सरसकट गेली पाहिजेत. असा विषय आपण आणला होता. आज दोन्ही ठिकाणी हा विषय अमान्य झाला आणि अमान्य झाल्यानंतर पुन्हा आपण त्या पद्धतीनेच काम सुरु केलेले आहे. हा विषय येथे आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेबांचे म्हणणे बरोबर आहे. ज्यावेळेला आम्ही पाणी बिल आणि प्रॉपर्टी टॅक्स एकत्र करणार होतो. त्यावेळेला पाणीपट्टी लावतांना आपण हजार लीटरला रु. ७/- या पद्धतीने लावला. यापुर्वी आमचे धोरण असे होते की, मिनिमम चार्जेस जे आहेत ते मोजमापन न घेता डायरेक्ट कनेक्शनलाच किती रक्कम लावायची हा विषय आम्ही महासभेपुढे दिला होता. म्हणजे त्यामध्ये रु. ७/- हजार लिटर आणि त्याच्याखाली जर मीटर चालू नसेल तर जी किंमत लावायची ती किंमत सरसकट सगळ्यांना लावायची हे धोरण ठरविल्यानंतरच आपण प्रॉपर्टी टॅक्स मध्ये हे बिल ॲड करु शकतो. मीटरवरुन जर मोजमापे घेऊन बिले पाठवायची असतील तर ती ॲड करु शकत नाही. कारण डायरेक्ट कनेक्शनला जर रेट लावला तर आपण प्रॉपर्टी टॅक्स मध्ये ॲड करु शकतो कारण आपण जाहिरात प्रसिद्धीकरण करतांना किंवा ठरावाला मसुदा देतांना आम्ही दोन रकमा दिलेल्या आहेत. एक डायरेक्ट लावण्याची रक्कम आणि मोजमापे घेऊन लावण्याची. तुम्ही जर एकाच रक्कमेची सर्वांना समान रक्कम लावा. एका कनेक्शनला अर्धा इंचला किती? एक इंचला किती? पाऊण इंचला किती? हा जर रेट लावून दिला असता म्हणजे मान्यता दिली असती तर आपण प्रॉपर्टी टॅक्स आणि हे एकत्रच पाठविले असते. आपण मोजमाप घेऊन बिले लावलेली असल्यामुळे ते एकत्र करता येत नाही. यांचे बेसिक मी तुम्हांला सांगतो. १ एप्रिल ते ३१ मार्च हे प्रॉपर्टी टॅक्सचे वर्ष आहे. मात्र पाणीपट्टी वसुलीचे वर्ष जानेवारीला सुरु होते. म्हणजे जानेवारी, फेब्रुवारी, मार्च हे तीन महिने संपल्यानंतर मोजमाप घ्यायला एप्रिलमध्ये सुरुवात होते आणि एप्रिलच्या शेवटी किंवा मे च्या पहिल्या आठवड्यात बिले जातात. म्हणजे हा तिमाहि संपला, एप्रिल-मे मध्ये. एप्रिल, मे, जून या तीन महिन्यांची बिले जून संपल्यानंतर जुलैमध्ये मोजमाप होतात आणि ऑगस्टमध्ये बिले जायला सुरुवात होतात. मार्च महिन्यात जी मोजमापे केलेली असतात ती आम्हांला एप्रिलमध्ये बिले इश्यु होत असल्यामुळे तो प्रॉपर्टी टॅक्स वसुलीला आम्हांला मिळत नाही आणि शेवटची तिमाही मिळत नाही आणि पहिली तिमाही मिळत नाही. पहिली तिमाही का मिळत नाही? कारण जानेवारी, फेब्रुवारी, मार्चमध्ये झालेली बिले एप्रिलमध्ये पाठवतो. त्यामुळे सुरुवातीला आम्हांला वसुली करता येत नाही. म्हणजें प्रॉपर्टी टॅक्स वसुल करता येत नाही आणि शेवटची तिमाही मिळत नाही. मधल्या दोन तिमाही आम्हाला मिळतात. तीही वेळेवर बिलं गेली तरच. म्हणून आम्ही ह्या तिमाहीला म्हणजे पहिली तिमाही आम्ही अडवली नाही पाणीपट्टीमध्ये तरीदेखील नागरिकांनी पाणीपट्टी असून देखील २८ टक्के लोकांनी भरले. म्हणजे जानेवारी, फेब्रुवारी, मार्च ह्या तीन महिन्याची बिले आम्ही एप्रिलमध्ये देऊन पण ऑगस्ट महिन्यापर्यंत फक्त २८ टक्के लोकांनी पाण्याचा टॅक्स भरला. म्हणजें पाणीपट्टीसुध्दा लोक गडबडीने भरतात, हा जो समज आहें. २८ टक्केच वसुली पहिल्या तिमाहीची झाली. आणि दुस-या तिमाहीची किती वसुली होईल. त्यामुळे आम्ही ही सांगड घातलेली आहें आणि ही वसुली करणे आणि वसुली बजेटवर चालेले असते. रक्कम जर वेळेवर वसुल झाली नाही तर बजेट कोलॅप्स होतो आणि हा प्रशासनाचा विषय आहे आणि नागरिकांना ज्या सुविधा पुरवणार आहात त्यांच्यासाठीच ही रक्कमेची वसुली होते. जर रक्कम वसुल करायचे बंद करायचं असेल हा प्रशासनाच्या अखत्यारितील विषय नाही म्हणूनच सांगड घातलेली आहे आणि वसूलीची पध्दत वसुलीचं लोकांना समजल पाहिजे जाणीव झाली पाहिजे की, पाणीपट्टी गडबडीने येऊन भरतात मात्र प्रोपर्टी टॅक्स आम्ही दहा दहा वेळा जाऊनही भरलेले नाहीत यापूर्वीचे मान्यवर सभासद नगरपालिका असतानाचे नगरसेवक पण आहेत त्यांना कल्पना असेल की, आपले क्लार्क आणि शिपाई प्रत्येकांच्या घरी दहा दहा वेळा जाऊन येऊन पण उद्या ये पाचशे रूपये घे आता. परवा ये दोन महिने. प्रत्येकाच्या घरी दहा-दहा वेळा फे-या घालूनदेखील टॅक्स भरलेले नाही. यापूर्वी टॅक्सचे टक्केवारी जर आपण पाहिले तर आपल्या लक्षात येईल की ही सांगड घालणे संयुक्तिक आहे आणि कायद्याने ते मान्य आहे. उपविधी मध्ये तरतूद आहे. हायकोर्टातही केस जिंकलेली आहे आणि प्रशासनाच्या अखत्यारितील विषय आहे आणि तुम्हाला ठराव करताना देखील आर्थिक बॅलन्स असल्याशिवाय नगरपालिकेच्या विकासासाठी हातभार लावू शकणार नाही आणि आपण इकडे कर्ज ११ टक्के व्याजाने भरण्यापेक्षा नगरपालिकेचे पैसे वसुली करणे आणि विकासाला कर्जाचे हप्तें परतफेड करायला योग्य आहे. कृपया याचा सहानुभूतीपूर्व विचार करुन निर्णय घ्यावा ही विनंती.

**मा. सभापती :-**

सन्मा. उपायुक्त साहेब यांनी आपल्याला चर्चेमध्ये ब-याचशा बाबी सांगितल्या परंतु मी अगोदर आपल्याला कल्पना दिली होती. दोन्ही सभागृहमध्ये हा विषय चर्चेला नामंजुर झालेला आहे.

त्याच्यामुळे लोकप्रतिनिधी नागरिकांच्या बरोबर असतात आणि नागरिक त्यांच्याबरोबर आहेत. प्रशासनाला गाईडलाईन देण्यासाठी किंवा प्रशासनाने लोकप्रतिनिधींना गाईडलाईन देण्याच्या दृष्टीकोनातून दोन्ही रथाची चाके एकत्र असतील तर चांगला गाडा चालू शकेल. याच्यामध्ये काही दुमत नाही. परंतु सद्य परिस्थितीमध्ये जर शहरामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. आपण हा विषय वारंवार दोन्ही सभागृहामध्ये आणून विषय नामंजुर झालेला आहे. आपण कायद्याचा बडगा आम्हांला दाखवत असाल तर लोकशाहीचे हत्यार आमच्याकडे आहे. गांधींच्या विचाराने आणि लोकशाहीच्या विचाराने आम्ही जर चाललो तर आम्हांला चालणं भाग आहे. आम्हांला ही मिरा भाईंदर महानगरपालिका चालली पाहिजे. त्यांचे बजेट कोलॅप्स न होता बजेट चांगल्या पद्धतीने इम्प्लीमेन्टेशन होऊन या शहराचा विकासदेखील झाला पाहिजे. परंतु दोन्ही सभागृहामध्ये चर्चा होऊनदेखील हा विषय नामंजुर झालेला होता आणि तरीसुद्धा आपण हा विषय पुन्हा अचानकपणे हा विषय आणला. मागच्या वेळेला हा विषय आपण आणला होता. तो विषय केला नाही. परंतु आता अशा पद्धतीने त्याला कोणतीही वेळ आपण दिलेली नाही. आपण त्वरीत याची कारवाई करावी. अशा प्रकारची नोटीस बिले आपण पाठवली तर ज्यांना भीती आहे त्यांनी भरले परंतु ज्या शहरामध्ये अशा जुन्या सोसायट्या आहेत, ज्या सोसायटीमध्ये त्या सोसायटीने त्यांचा मेन्टेनन्स चार्ज थकबाकी ठेवलेला आहे. मेन्टेनन्स भरु शकत नाहीत त्या सोसायटीची स्वतःची पाण्याची बिले, साफसफाईची बिले, सिंकींग फंड अशा आदी फन्ड असलेले फन्ड सोसायटीला भरु शकत नाही. अशा पद्धतीने कर राहिला असेल तर कोणत्या पद्धतीने कर भरुन ती लोक कर वसुल करुन आपल्याला पाण्याची बिले भरायला सांगितले किंवा पाण्याची बिले नंतर भरा पहिला कर भरा असे सांगू शकत नाही. कारण आपण सर्वे केल्यानंतर जेवढ्या सोसायटी आज नवीन ज्या कॉलनी आलेल्या आहेत त्या नवीन कॉलनी, जेसल पार्क बोला किंवा सृष्टी बोला अशा ठिकाणी अद्ययावत कॉलनी आहेत आणि त्या कॉलनीमध्ये हायफाय जी लोक आहेत. त्यांचा कोणताही मेन्टेनन्स चार्ज भरायचा रहात नाही अशा लोकांनी आपल्याला कर भरणा केलेला आहे. परंतु ज्या जुन्या सोसायट्या आहेत ज्या सोसायट्यांमध्ये ज्यांनी मेन्टेनन्स सोसायटीला भरलेले नाही आणि तो मेन्टेनन्स भरु शकत नाही अशा सोसायटीचे पैसे चेअरमन, सेक्रेटरी कोणत्या पद्धतीने इमारतीचा कर काढतील. तो हाऊस टॅक्स वसुल करु शकत नाही आणि अशा पद्धतीमुळे या ठिकाणी एक भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. दहशतीचे वातावरण निर्माण झालेले आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रशासन झिजीया कर वसुल करायला लागले आहे, याचा आपण सर्वे करावा. प्रॅक्टीकल सर्वे याचा आपण करावा. आपल्याकडे जी बिले आलेली आहेत, जे पैसे आलेले आहेत, ज्यांनी भरणा केला आपण जी फिगर सांगितली ज्यांनी भरणा केला तो भरणा ज्या हायफाय सोसायट्या आहेत त्यांनी केलेला आहे. ज्या सोसायटीमध्ये अशा प्रकारचे मेन्टेनन्स किंवा सिंकींग फंन्ड बाकी आहेत या चेअरमन, सेक्रेटरीने कोणत्या पद्धतीने आपले पैसे वसुल करावेत म्हणून यासाठी आम्हांला या सभागृहामध्ये यापुर्वी झालेल्या चर्चेप्रमाणे दोन्ही वेळेला दोन्ही सभागृहामध्ये चर्चा झाली होती की, पाण्याचे बिल आणि हाऊस टॅक्स याचा कुठेही ताळमेळ बसत नाहीत. म्हणून यासाठी आपण ज्या बिल्डींगची प्रॅक्टीकली वस्तुस्थिती काय ती आपण बघा आणि नंतर आपण त्याच्यावर ॲक्शन घ्या किंवा ॲक्शन घेण्याचा प्रयत्न करा. कारण आम्ही आमच्याकडे आल्यानंतर लोकांना या पद्धतीने सांगितलेले आहे. सर्व सन्मा. सदस्यांनी तुमचे पाण्याचे बिल किंवा कनेक्शन कापता येणार नाही, कापणार नाही ते कारण बाकी मार्ग नाही. जेवढी वसुली होईल तेवढी वसुली करा. आम्ही ऑफ दि रेकॉर्ड तुम्हांला बोलू. तुमची वसुली झाली पाहिजे. वसुली केली पाहिजे आणि या शहराचा विकास झाला पाहिजे. जे ऑन द रेकॉर्ड आहेत परंतु ऑफ द रेकॉर्ड असाही विषय होऊ शकतो की, या विषयामध्ये जर आम्ही या पद्धतीने नागरिकांना जर जुलूमगिरी पद्धतीने वसुली केली तर मग तिथे प्रशासनच आहे. प्रशासनाची राजवट आहे अशा पद्धतीचे वातावरण आणि अशा पद्धतीचा मॅसेज या शहरामध्ये गेलेला आहे. मी सांगतो नाईक साहेब, प्रॅक्टीकली बघा, आपण बोलतो कायद्यामध्ये असे करता येते. कायद्यामध्ये ११ टक्के इन्टरेस्ट भरायचा आहे. दंड आकारल्यावर तो १२, १३, १४, १५ वर जाईल. हे आम्ही मान्य करतो. ७४व्या घटना दुरुस्ती झालेली आहे. त्यामधून आम्हांला जी मुभा दिलेली आहे, स्वायतत्ता दिलेली आहे. कशाकरिता स्वायतत्ता दिलेली आहे की, इकडल्या नागरिकांना संपूर्णपणे स्वयंपूर्ण प्रशासनाने मदत केली पाहिजे. त्यांच्याबरोबर राहिले पाहिजे. त्यांना पाणी, वीज, रस्ते आदी ज्या मुलभूत सोयी आहेत त्या सोयी दिल्या पाहिजेत. या सुविधा देऊ शकलो नाही आणि या सोयी देतांना जर आम्ही अन्य कोणत्या पद्धतीने कायद्याचा बडगा ठेवला की, कायद्याने तुम्हांला हे करता येणार नाही. कायद्याने तुम्ही हे केले पाहिजे, तर उपयोग काय? प्रशासन जर चालवायचे

असेल तर प्रशासकीय राजवट योग्य आहे. मग ती स्वराज्य संस्था होऊच शकत नाही. अशा पद्धतीने आपण जे अवलंबिले आहे याच्यामध्ये बदल झाला पाहिजे. या ठिकाणी अशी माझी भुमिका आहे. तुम्हांला पैसे मिळाले पाहिजेत हा विषय नाही. बजेट इम्प्लिमेंन्टेशन झाले पाहिजे. आज आम्ही तुम्हांला असे का बोललो की, दोन्ही सभागृहामध्ये हा विषय आल्यानंतर तो विषय अमान्य झाला. त्याच्यावर चर्चा झाली की, आता एकत्र बिले करुन चालणार नाही. का चालणार नाही? तुमचे कायदे वेगळे असतील परंतु या सोसायट्या ज्या आहेत, मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये ग्रामपंचायत काळापासून आलेले भाईंदर, ग्रामपंचायत काळापासून आलेली नवघर ग्रामपंचायत, ग्रामपंचायत काळापासून उत्तन विभाग अशा पद्धतीने ज्या जुन्या इमारती जीर्ण झालेल्या आहेत त्या इमारती दुरुस्त करु शकत नाहीत. एक भली मोठी यादी पी.डब्ल्यु.ने काढलेली आहे की, या शहरामध्ये ४०, ५०, ६०, ७० इमारती शंभराच्या वर इमारती नादुरुस्त झालेल्या आहेत आणि त्या इमारती दुरुस्त होऊ शकत नाहीत. त्या इमारती कधी कोसळतील त्याच्या खाली कधी लोक मरतील अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि अशा वेळेला प्रशासनाने निर्णय घेतला असेल तो निर्णय कदापी आम्हांला मान्य करता येणार नाही. अशा पद्धतीचे वातावरण शहरामध्ये झालेले आहे. कृपया प्रशासकीय काळ आहे अशा प्रकारचा मॅसेज तुम्ही देऊ नका. त्यामध्ये रिलिफ द्या तुम्ही. तुम्ही बोलता आज विषय घेतला नाही. सन्मा. सदस्यांची जी भुमिका या ठिकाणी मांडलेली आहे आणि मी मघाशी बोललो आम्ही प्रशासनाला मदत करतो. ते आमच्याबरोबर राहिले पाहिजे. आम्ही त्यांच्याबरोबर राहिले पाहिजे. म्हणून आम्ही हा विषय घेतलेला नाही. पण प्रत्यक्ष प्रशासनाने या ठिकाणी पाहिले असेल की, तीव्र नाराजी किंवा तीव्र भुमिका आज मा. सन्मा. सदस्यांची या ठिकाणी राहिलेली आहे आणि याच्यामध्ये प्रशासनाच्या वतीने तेढ जर निर्माण होत असेल तर कदापि आम्ही सहन करुन घेणार नाही आणि करता येणारही नाही म्हणून आणि टॅक्सची एवढी प्रकरणे प्रलंबित आहेत त्या विषयावर आपण नंतर यायचे हा विषय इकडे नाही. म्हणून त्या विषयावर बोलू इच्छित नाही. फक्त आम्हांला एकच बोलायचे आहे, कृपया आपण कर आणि पाणी बिल याची सांगड या ठिकाणी घालू नये आणि घातली तर त्यामध्ये कोणत्याही पद्धतीचे नळ कनेक्शन कापले जाऊ नयेत आणि जर त्यांचे कनेक्शन कापले, नळाच्या जोडण्या कापल्या तर आम्हांला लोकशाही पद्धतीने पाऊले उचलावी लागतील. आम्हाला महात्मा गांधींच्या मार्गाने जावे लागेल याची नोंद प्रशासनाने घ्यावी.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सो.) :-**

माझ्या माहितीप्रमाणे पाणीपट्टी अडवून प्रॉपर्टी टॅक्स भरावा आणि प्रॉपर्टी टॅक्स न भरल्यास नळ कनेक्शन कट करू असे सांगितल्यामुळे किंवा वसुली वाढवल्यामुळे तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो असे ऐकीवात नाही आणि होण्याची शक्यता पण नाही कारण प्रॉपर्टी टॅक्स हे त्यंच्यकडून येणं बाकी आहे आणि कोणतेही शासन येणं बाकी वसुली करण्यासाठी आतापर्यंत कोणत्याही संस्थेमध्ये किंवा नगरपालिका हद्दीमध्ये किंवा महापालिकेच्या हद्दीमध्ये कायदा सुव्यवस्था वसुलीसाठी निर्माण झालेली आहे असे कधी घडले नाही आणि यापुढेही घडणार नाही आणि आम्ही प्रॉपर्टी टॅक्स बिलं दिल्यानंतर लगेचच कट करतो असे कधी बोललो नाही. फक्त आम्ही प्लंबर आणि व्हॉल्वमन या लोकांना प्रॉपर्टी टॅक्स बिल पोहोचल्यानंतर एक महिनाभर प्रॉपर्टी टॅक्स आणि पाणीपट्टी न भरल्यास नळ कनेक्शन तोडू असे आपण सांगत जा. प्रत्यक्षात कट करण्याची सुरुवात केलेली नाही. आम्ही देखील जाणून बुजून, जाणीवपूर्वक चुक करणार नाही. आम्हांलाही नागरिकांना त्रास द्यायचा नाही. फक्त आम्ही सांगतो आहे की, एकदा, दोनदा, पंधरा दिवस, महिनाभर, दोन महिने असे सांगणे चालू आहे. परंतु अजूनही आम्ही ॲक्शन घेतलेली नाही. ज्यावेळी महिनाभर सांगून देखील भरले नाही त्यावेळी आम्हांला ॲक्शन घ्यावी लागेल. नाईलाज आहे आणि यासाठी हे नगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीकोनात आहे आणि उपविधी मध्ये प्रोव्हीजन आहे.

**मा. सभापती :-**

बायलॉजमध्ये प्रोव्हीजन आपण नाही सांगितली. उपविधीमध्ये प्रोव्हीजन आहे. खुलासा करावा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सो.) :-**

बायलॉज आणि उपविधी दोन्ही एकच आहे.

**मा. सभापती :-**

मग आपण सांगितले की अशी प्रोव्हिजन नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सो.) :-**

दोन्ही बिले एकत्र पाठवायची कोणत्याही कायद्यामध्ये तरतुद नाही.

**मा. सभापती :-**

बरोबर आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सोा.) :-**

आपण प्रशासनाच्या सोयीसाठी प्रॉपर्टी टॅक्स आणि पाणीपट्टी एकत्र पाठवतो आणि सगळीकडे ज्यावेळी कल्याण डोबिवली महापालिकेचा निकाल झाला. असा झाला की, तुम्ही पाण्याचे मेजरमेंट घेऊनच बिले पाठवा. ज्या ठिकाणी फ्लॅट रेटवर आकारणी झालेली आहे, उदाहरणार्थ अ वर्ग नगरपालिका ब वर्ग नगरपालिका यामध्ये वर्षाला ८०७ रुपये एकत्र पाठवत होतो. ज्यावेळी मोजमाप घेऊन बिले पाठवावी म्हणतात त्यावेळी ती एकत्र करता येत नाहीत. जरी एकत्र करता येत नसेल तरी उपविधीमध्ये येणे बाकी असल्यास नगरपालिकेचे असल्यास नळ कनेक्शन कट करतो. ही उपविधीमध्ये प्रोव्हिजन आहे. प्रॉपर्टी टॅक्स आणि पाणीपट्टी फ्लॅट रेटने जेव्हा अर्धा इंचाला एवढी रक्कम, एक इंचाला एवढी रक्कम, पाऊण इंचाला एवढी अशी फ्लॅट रेटने आकारणी तुम्ही करुन दिली तर एकत्र करता येणे शक्य आहे. मोजमाप घेऊन जर बिले पाठवायची असतील तर एकत्र करता येत नाही. कारण प्रॉपर्टी टॅक्स एकदाच जातो आणि हे तीन चार वेळा वर्षातून पाठवावे लागतात म्हणून आम्हांला वेगवेगळे पाठविणे गरजेचे आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. उपायुक्त साहेब आपण सांगितले की, एका बाजूने उपविधीमध्ये आणि बायलॉज कोणत्याही पद्धतीची तरतुद नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सोा.) :-**

कट करण्याची तरतुद आहे.

**मा. सभापती :-**

कट तुम्ही केव्हा करा तेव्हा तुम्हाला पाण्याची बिले त्यांनी भरली नाही तेव्हा तुम्ही कट करा. ते पाण्याची बिले भरायला तयार आहेत आणि तुम्ही सांगता आम्हांला कर द्या. हाऊस टॅक्स तुम्ही आम्हांला द्या. हाऊस टॅक्स दिल्याशिवाय तुमची पाण्याची बिले घेणार नाही. मग असे आपण एका बाजूने सांगता की, पाण्याची बिले नाही भरली तर आम्ही नळ कनेक्शन कापू. ते पाण्याची बिले भरायला तयार आहेत आणि तुम्ही घ्यायला तयार नाही. तुम्ही हे सांगता, तुम्ही आम्हांला अगोदर कर द्या, हाऊस टॅक्स द्या. असे होऊच शकत नाही. जेव्हा आम्हाला वाटते ता कायदा होऊच शकत नाही. आम्हांला असे बोलायचे आहे की, प्रशासनाची भुमिका अशी आहे की, या शहराचा विकास झाला पाहिजे. या शहरामध्ये बजेट इम्प्लिमेंटेशन झाले पाहिजे. जे बजेट सन्मा. सदस्यांनी या ठिकाणी मांडले त्याला अप्रुव्हल सन्मा. सदस्यांनी दिले. या शहराचा विकास व्हावा यासाठी या ठिकाणी या नागरिकांनी या ठिकाणी लोकप्रतिनिधींना पाठविले. त्यांची आस्था तिच आहे जी आस्था तुमची आहे. असे असतांना लोक जी पाण्याची बिले भरायला येतात आणि आपण त्यांना सांगतो कर भरा, हाऊस टॅक्स भरा नंतर आम्ही पाण्याचे बिल घेऊ. तुम्ही एका बाजून येणारे बिल जर तुम्ही घेऊ शकत नाही आणि तुम्ही कर काय सांगता? याची सांगड घालता येत नाही. जर साहेब तुम्ही सांगता की, दोन्ही बाजूने कायद्यात तरतुद नसतांना आकारणी करता येत नाही. बिले पाठविता येत नाहीत. त्यांची सांगड घालता येत नाही. तर आपल्या या भुमिकेमुळे प्रॅक्टीकल भुमिका आपण जी घेतलेली आहे त्या प्रॅक्टीकल भुमिकेमुळे सांगड घातली जाते.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, आपण या ठिकाणी जी भावना व्यक्त केली, मतप्रदर्शन केले त्या मताशी आम्ही सर्व सभागृह सहमत आहे. उपायुक्त साहेब, मी आपणांस या ठिकाणी सांगू इच्छितो की, आपण सांगितले की, टॅक्स डिपार्टमेंटची पर डे जी वसुली आहे ती ८६ टक्के आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सोा.) :-**

नाही. ८६ टक्के मागच्या वेळी आपण कनेक्शनचे पैसे घेतले नाही.

**आसिफ शेख :-**

आणि आता वॉटर डिपार्टमेंट मध्ये तुम्ही सांगितले की, २८ टक्के आहे. २८ टक्के याचा अर्थ असा होतो की, तुमचं टॅक्स डिपार्टमेंट जास्त ॲक्टीव आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सोा.) :-**

असा माझा म्हणण्याचा उद्देश नव्हता.

**आसिफ शेख :-**

पण दुसरा अर्थ तसा होतो. म्हणजे दोन्ही डिपार्टमेंटमध्ये को-ऑर्डीनेशन जे पाहिजे आहे. एक डिपार्टमेट चांगले काम करते, एक डिपार्टमेंट चांगले काम करित नाही. असे आपल्या बोलण्यातून सिद्ध होते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सोा.) :-**

चांगले म्हटले नाही. जानेवारी, फेंब्रूवारी, मार्च या तीन महिन्याची बिले एप्रिल महिन्यामध्ये गेली. एप्रिलपासून ऑगस्टपर्यंत फक्त २८ टक्के. पाणीपट्टी भरण्याची एवढी गडबडच होती. तर त्याच वेळी पहिल्या तिमाहिमध्ये ८०-९० टक्के का झाली नाहीत?

**याकुब कुरेशी :-**

नगरसेवकांना तुम्ही विचारता का झाली नाही? ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सोा.) :-**

त्यांना काय म्हणायचे आहे ते तुमच्या लक्षात आलेले नाही.

**याकुब कुरेशी :-**

तुम्ही जे म्हटलेले आहे ते माझ्या लक्षात आलेले आहे. तुम्ही नगरसेवकांना विचारता का झाली नाही?

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सोा.) :-**

त्यांचे म्हणणे आहे पाणीपट्टी २८ टक्के म्हणजे टक्केवारी फार वाढली पण प्रॉपर्टी टॅक्स काही गेला नाही.

**आसिफ शेख :-**

या सर्वांवर रामबाण उपाय सांगतो, आपण सांगितले उपविधीमध्ये तरतुद आहे आणि आपण हायकोर्टामध्ये देखील केस जिंकलेली आहे असे आपण या ठिकाणी आपल्या संभाषणामध्ये नमूद केलेले आहे. परंतु मला या ठिकाणी असे म्हणावयाचे आहे, ज्याप्रमाणे बी.एस.ई.एस. ज्याप्रमाणे लाईट बिल आणि टेलिफोन बिल प्रत्येक ठिकाणी कलेक्शन सेंटर आहेत. मागच्या आमसभेत, महासभेत हा विषय आलेला होता. तो विषय प्रलंबित झालेला आहे आणि जर आपण त्या पद्धतीने कलेक्शन सेंटर उघडले तर मला वाटतं आपण जे लोकांना ज्या पद्धतीने सक्ती करता, नागरिक त्यासाठी निश्चितपणे कलेक्शन सेंटरमध्ये जाऊन पैसे भरतील.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सोा.) :-**

आम्ही इतक्या गडबडीने सक्ती करणार नाही. सांगणे चालू आहे. कट करण्याच्या निर्णयापर्यंत आम्ही आलेलो नाही.

**आसिफ शेख :-**

तुम्ही सक्ती केलेली आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सोा.) :-**

सांगणे चालू आहे. आता मी कट करण्याच्या निर्णयापर्यंत आलेलो नाही.

**आसिफ शेख :-**

मागच्या सभेत सन्मा. सभापती साहेबांनी रुलिंग दिले की, जो निर्णय घेतलेला आहे तो निर्णय स्थगित करण्यांत येत आहे. तरीदेखील डिपार्टमेंटने त्यावर अंमलबजावणी केलेली नाही. म्हणजे स्थायी समितीचा अधिकार नाही का? म्हणजे स्थायी समिती जे निर्णय घेते ते प्रशासनाला बंधनकारक नाही का? प्रशासन मोठे आहे की, स्थायी समिती मोठी आहे हे प्रथम तुम्ही स्पष्ट करा. या ठिकाणी स्थायी समिती संपूर्ण शहराचे प्रत्येक विषयावर व्यवस्थापन करित असते. स्थायी समितीचा निर्णय हा महत्वाचा निर्णय आहे तरीदेखील प्रशासन त्याला केराची टोपली समजून धुडकावत असेल तर ते योग्य नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सोा.) :-**

वसुलीमध्ये हस्तक्षेप करता येत नाही.

**आसिफ शेख :-**

लोकांनी आम्हांला या ठिकाणी निवडून पाठवलेले आहे. कायद्याची बाब ठिक आहे की, तुम्हांला कायदेशिर वसुली करायचा अधिकार वगैरे आहे. पण लोकांच्या भावना पण आपण समजायला पाहिजे. आम्ही दुवा आहोत. शासन आणि प्रशासन यांमधील दुवा म्हणजे लोकप्रतिनिधी.

**मा. सभापती :-**

आपण या ठिकाणी सांगितले की, सक्ती नाही. आम्ही वसुलीमध्ये इंटरफेर करु शकत नाही आणि वसुलीमध्ये कोणत्याही पद्धतीने सन्मा. सदस्यांनी कोणताही हस्तक्षेप केलेला नाही. हस्तक्षेप करणारही नाही. परंतु प्रशासनाने जो हस्तक्षेप केलेला आहे, कोणत्याही उपविधीमध्ये कोणतीही अशा त-हेची तरतुद नसतांना निकड आपण लावली. पाण्याचे बिल आणि कराचे बिल याची जी आपण निकड लावलेली आहे ती निकड आपण लावू नये. पाण्याची बिले भरायला लोक तयार आहेत. तुम्ही लाईन बघा किती लोक येतात. आपल्या महापालिकेमध्ये पाण्याची बिले भरायला किती लोक येऊन परत जातात ते आपण पहा. आम्हांला आपल्याला या ठिकाणी एकच सांगावयाचे आहे, पाण्याची सांगड आणि कराची सांगड ही आपण एकत्र करु नये. हाऊस टॅक्स आणि वॉटर बिल एकत्र करु नये आणि प्रशासनाच्या बाबतीत आपण जो निर्णय घेतलेला आहे, जी आपण कार्यवाही सुरु केलेली आहे त्याला लोकांनी कार्टात जावे का? न्यायालयात जाऊन दाद मागावी का? अशी आपली भूमिका आहे का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सो.) :-**

तोडायला अजुन सुरुवातच केलेली नाही.

**मा. सभापती :-**

तोडायला आपण सुरुवात करुच शकत नाही. एखादा नळ कनेक्शनधारक तुम्हांला पैसे भरायला जर तयार असेल तर आपण कोणत्या पद्धतीने त्यांचे नळ कनेक्शन कापणार? आपण नळ कनेक्शन कापूच शकत नाही. मी तुमचे पाण्याचे पैसे भरायला तयार आहे. आपण पैसे घ्यायला तयार नाहीत तर त्यांचे कनेक्शन आपण कापू शकतो का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सो.) :-**

त्यासाठी मी तुम्हाला वाचुन दाखवतो खाजगी पाणीपुरवठा बंद करण्याची किंवा पाणी बंद करण्याची सक्ती प्राधिकृत अधिका-यांस कोणताही मुख्य नळ कोणताही खाजगी नळ जर पाणीपुरवठा करण्यात येत असेल खाजगी जागेचा नळ जोडणी तोडता येईल व पुढीलपैकी बाबतीत नगरपालिकेत देय असलेली कोणतीही रक्कम किंवा खर्च वसुली करण्याच्या नगरपालिकेच्या अधिका-यास वाद न येता म्हणजे कोणतीही रक्कम येणे वसुल करण्यासाठी नळ कनेक्शन कट करता येईल.

**मा. सभापती :-**

पण कंपलसरी आपण काम करू शकत नाही. ही जी सक्ती एकत्र बिले पाठवून लावलेली आहे. निकड लावू नका.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सो.) :-**

एकत्र बिल पाठवले नाही तरी नगरपालिकेचे कोणतेही येणे बाकी वसुलीसाठी नळ तोडता येते ही प्रोविजन आहे.

**मा. सभापती :-**

बरोबर आहे. मग उपविधीमध्ये अशी आपण तरतुद करावी.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सो.) :-**

केलेली आहे. मग वाचुन काय दाखवलं? दोन्ही बिले एकत्र पाठवण्याची तरतुद कायद्यामध्ये आहे का? असे त्यांनी विचारले ते कट करण्याचे विचारले नाही मला. त्यांना माहिती आहे की, कट करण्याची प्रोव्हिजन आहे.

**मा. सभापती :-**

आपण एकत्र बिले कशी पाठवली असती असे मला विचारायचे आहे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, नाईक साहेबांनी जे स्पष्टीकरण केले ते १०० टक्के बरोबर आहे की, उपविधीमध्ये तरतुद आहे आणि नगरपालिकेला देय असलेली कोणतीही वसुली करायची असेल तर नळ कनेक्शन आपण कायदेशीर तोडू शकता. पण त्या कायद्याची अंमलबजावणी करीत असतांना प्रशासन जबाबदार राहणार आहे. कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थती या शहरामध्ये निर्माण झालेली आहे. आग लागलेली आहे. आम्ही पहिलेच म्हटले तेव्हा तुमचा नियम लागू पडत नाही. जेव्हा लॉ ॲन्ड ऑर्डरचा प्रश्न असेल तेव्हा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सो.) :-**

मला वाटतं कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर पोलिस स्टेशनचे काम आहे. नगरपालिकेचे नाही.

**आसिफ शेख :-**

पण हस्तक्षेप करू शकतो ना. एका कायद्यामध्ये दुसरा कायदा हस्तक्षेप करू शकतो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सो.) :-**

तुम्ही काय करायचे तो तुमचा प्रश्न आहे. आम्ही तुम्हाला माहिती देण्याचे काम केले. अधिकार तुम्हाला आहे तुम्ही काय करायचे ते करा. फक्त तुम्हाला माहिती देणारा अधिकारी मी आहे.

**आसिफ शेख :-**

प्रशासन नागरिकांकडून जी सक्तीने वसुली करित आहे त्यास आमचा विरोध आहे. परंतु आपल्या वसुलीमध्ये इंटरफेर करित नाही. आपण वसुली करा परंतु पाण्याचे जे बिल लोक भरायला येतात ते आपण स्विकारा.आमचें एचढेच म्हणणे आहे.मागच्या वेळी सभापती साहेबांनी जे रुलिंग दिलेले आहे.त्याची अमलबजावणी झाली नाही.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, आता जी बिले टॅक्सच्या आणि पाण्याच्या बाबतीमध्ये गेलेली आहेत. फार वेळेपासून हा विषय चालू आहे. आम्ही ज्यावेळेला आमच्या ऑफिसमध्ये बसत असतो. शेवटी शहर आम्हाला व तुम्हाला चालवायचे आहे. मी सरळ नागरिकांना सांगतो प्रशासनाला हे शहर चालवायचे नाही. हे शहर आम्हाला आणि तुम्हाला सगळ्यांना चालवायचे आहे. मी देखील तुमच्यापैकीच एक नागरिक आहे. अशा बाबतीमध्ये चार दिवसापुर्वी एका सोसायटीबरोबर माझा जबरदस्त झगडा झाला. तुम्ही टॅक्स भरता तो माझ्यासाठी भरत नाही. तुम्हाला सोयी सुविधा पाहिजेत. तुम्हाला हॉस्पिटल पाहिजेत, तुम्हाला चौपाटी पाहिजेत, तुम्हाला गार्डन पाहिजेत,तुम्हाला सर्व सुविधा पाहिजेत. तर म्हटल तुम्ही ८०० रु वर्षाकाठी नगरपालिकेला देता आणि त्याच्यामध्ये तुम्हाला संपूर्ण सुविधा पुरवायच्या आहेत. क्लार्क लोकांनी, अधिका-यांनी त्याची समजूत चांगल्या त-हेने काढली पाहिजें. लोक येतात त्यांचे समाधान होत नाही. नावामध्ये फरक आहे, फ्लॅटमध्ये फरक आहे. हे जर केलं तर निश्चितपणे लोक टॅक्स भरायला तयार आहेत.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती साहेब, उपायुक्त साहेब, सन्मा. सदस्श्य दिनेश नलावडेजी यांनी या ठिकाणी सांगितले की नाईक साहेबांनी चांगल्या त-हेने वसुली केली त्यांना आपण इन्क्रीमेंट वगैरे दिले. अभिनंदनाचा ठराव केला.

**रिटा शाह :-**

आपण मागे बोललात सर्वांना बोलण्याची संधी देणार मग आता काय चालले आहे.

**आसिफ शेख :-**

पण त्यांनी माझे नाव घेतले म्हणून खुलासा करु दे.

**रिटा शाह :-**

नाही, साहेब असे नसते.

**चंद्रकांत वैती :-**

आज मिटींग पोस्टपोन करायची. हाच विषय तुम्ही आज घ्या. लावलं काय तुम्ही? गेल्या मिटींगमध्ये ठराव झाला की असा विशेष विषय असेल तर तो सभेनंतर द्यायचा का म्हणून तुम्ही विषय घेतला? तुम्ही विषयपत्रिकेवर हा विषय घ्यायला पाहिजे होता.आम्हाला काम नाहीत काय? आणि तुम्ही एकटेच बोलू शकता का? सगळ्यांचे ऐकावे लागेल आज एकच विषय घ्यायचा.

**आसिफ शेख :-**

सभागृहात अशा प्रकारचे मला वाटते संभाषणाची जी भाषा आहे ती योग्य नाही. संसदीय कामकाजाप्रमाणे सभागृह चालले पाहिजे या मताशी आम्ही सर्व सहमत आहोत. आपण या ठिकाणी ज्या पध्दतीने बोलता त्याच्या दुपटीपेक्षा आम्ही बोलू शकतो.

**चंद्रकांत वैती :-**

किती बोलता आम्हाला बोलायचे नाही का?

**आसिफ शेख :-**

तुम्ही बोला ना.

**चंद्रकांत वैती :-**

हा विषय महत्वाचा नाही का?

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब सांगतील ना? या पध्दतीने तुम्ही बोलताय.

**चंद्रकांत वैती :-**

ही पध्दत आहे का? ज्ञानी झालात काय?

**आसिफ शेख :-**

ज्ञानी कोण झाले या ठिकाणी. या ठिकाणी तुमच्या ज्या सुचना असतील त्या मांडा. माझे या ठिकाणी एवढेच म्हणणे आहे की, टॅक्स वसुली आणि पाणीपट्टी यांची सांगड एकत्र करु नये आणि जे पाणी बिल भरण्यासाठी आले त्यांचे पाणी बिल स्विकारावे. लोकांना काय समजवायचे ते आपण लोकांना समजावणार आहोत. पण कायद्याचा बडगा कृपया त्यांना दाखवू नये आणि सन्मा. सदस्य दिनेश नलावडे यांनी या ठिकाणी जे सांगितले, नाईक साहेबांबद्दल, त्यांना जेवढे प्रेम नाईक साहेबांबद्दल आहे त्याच्यापेक्षा १०० टक्के आमचं त्यांच्यावर जास्त आहे.

**मा. सभापती :-**

प्रेमाचा प्रश्न नाही.

**रिटा शाह :-**

प्रेमाचा प्रश्न इथे कुठे आहे?

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त ) :-**

एकूण फ्लॅटपैकी जे बिल्डरच्या ताब्यात असतील किंवा बिल्डरच्या नावावर असतील त्यासाठी त्या सोसायटीला, नागरिकांना आम्ही त्रास देणार नाही. बिल्डरच्या ताब्यात असतील तर आम्ही नळ कनेक्शन तोडणार नाही. बिल्डरला त्रास होईल असेच आम्ही करणार आहोत आणि कृपा करुन सभासदांनी एवढाच विचार करावा की, नागरिकांना समजावून सांगण्याचे काम तुमचे आहे. टॅक्स भरला नाही तर कट होणार हे बोलल्यानंतर काय प्रतिक्रिया होते ती बघा. कारण नागरिक इतर ठिकाणी खर्च करायला स्वतः खिशातून पैसे काढतात. मात्र आम्हांला वसुलीसाठी खिशात आत घालावा लागतो ही वेळ का आली? की मागची जर टक्केवारी पाहिली तर ३०, ४०, ४५ टक्के या पुढे वसुली गेलेली नाही. त्यामुळे डी.ए. ग्रँड मागच्या दहा वर्षातील बुडालेले आहे. त्यामुळे ही जुळणी केल्याशिवाय नगरपालिकेची टक्केवारी वसुल होणार नाही. त्यामुळे ग्रँडवरदेखील परिणाम होतो आणि आपल्याकडे जे तक्रार घेऊन येतील त्यांना कृपा करुन समजावून सांगावे, हे आपल्या आणि महापालिकेच्या हितासाठीच चाललेले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

गेल्या एक वर्षापासून स्टॅंडींगच्या सभा आपण चालवत आहोत आणि आज गेल्या मिटींगला आपण निर्णय घेतला, आपण जर दुस-यांवर निर्णय लादत असू तर ते पहिल्यांदा आपण नियम पाळायला शिकले पाहिजे. गेल्या वेळीच्या मिटींगमध्ये निर्णय झाला की, असा महत्वाचा विषय असेल तर स्टॅंडींगनंतर आपण चर्चा करायची. मग गेल्या वेळी एवढा महत्वाचा विषय चर्चेमध्ये होता. मग तुम्ही विषयपत्रिकेवर हा विषय का आणला नाही. हा विषय तुम्ही विषयपत्रिकेवर आणला पाहिजे होता. आणि आपल्याला खुप कळत आहे. आपण जनेचे खरे सेवक आहोत याची आम्हांला खात्री आहे. परंतु सभेमध्ये गेल्या ठराव झाला होता मग आपण हा विषय अतिशय तातडीने का घेतला? काय गरज होती आणि जर आपल्याला जनतेची एवढी कळकळ पडली होती तर ज्या वेळेला ऑक्ट्राय बद्दल आम्ही प्रखर भुमिका घेतली होती त्या वेळेला जनतेबद्दलची कळकळ आणि आस्था कुठे गेली होती. ज्या वेळेला हाऊस टॅक्स आणि पाणीपट्टीसाठी अभिकर्ता नेमण्याची वेळ आली तेव्हा तुमची जनतेबद्दलची आस्था कुठे गेली होती? ज्या वेळेला पाण्याची बिले ३ रु. ८० पैशावरुन ७ रु. २० पैसे करण्यात आली, हाऊस टॅक्स तीन टक्केनी वाढविण्यांत आला, का वाढविण्यांत आला? सांगितले. एम.एम.आर.डी.ए. कडून लोन घ्यायचा आहे. त्यांनी तसा क्लॉज टाकला आहे. आपल्याला ॲग्रीमेंटमध्ये तसे दाखवायचे आहे. त्याशिवाय आपल्याला लोन मिळणार नाही. या महापालिकेच्या विकासासाठी जो निधी आपण राखून ठेवला तो त्यातील चाळीस टक्के निधी आपण रस्त्यासाठी वापरतो. इथे लोन आजपर्यंत मिळाला का? मग त्या वेळेला जनतेचा आपल्याला कळकळ नव्हती का? जाणीव नव्हती का? तुमच्या अधिका-यांची आणि आम्ही लोकप्रतिनिधी आहोत हे समजत नव्हते काय? आज तुम्हांला जनतेची एवढी कळकळ वाटते. हाऊस टॅक्स बाबतीत आमची फार गंभीर मते

होती. नाईक साहेब, आपण खुलासा केला ही फार चांगली गोष्ट झाली. आणखीन एक सक्ती आपण लोकांवर केलेली आहे. सोसायटीच्या माध्यमातून टॅक्स वसुल करणार. ज्या नवीन सोसायट्या आहेत, सोसायटी कधी बनते. मिरा भाईंदरच्या ८० टक्के सोसायट्या ह्या नॉन को-ऑपरेशन मध्ये झालेल्या आहेत. २० टक्के सोसायट्या ह्या को-ऑपरेशन बेसीसवर झालेल्या आहेत. बिल्डरच्या स्वतःच्या भांडणातले काही बाकी असतात, यु.एल.सी. चे फ्लॅट बाकी असतात ते सोसायटी बनवून देत नाही. मग ज्या सोसायट्या आल्याच नाहीत होऊ शकत नाहीत. त्यांनी का म्हणून सोसायटीच्या नावाने टॅक्स भरायचा. इन्डिविज्युअल टॅक्सची पावती प्रत्येक नागरिकाला लागते. कोणाला जामीन रहायचे असते, कुणाला तारण द्यायचे असते, ते आपण सोसायटीचा एकत्र टॅक्स भरल्यानंतर इन्डीविज्युअल टॅक्सची पावती पण आपण देऊ. परंतु एखाद्याला अर्जेन्सी असते. त्याचे घर तारण ठेवण्यासाठी किंवा एखाद्याला जामीन राहण्यासाठी किंवा इतर कुठल्याही कारणासाठी त्याला एमर्जन्सी घरपट्टीची पावती पाहिजे असेल आणि ती लेटेस्ट पावती पाहिजे असेल आणि तो भरायला आला तर तुमचा अधिकारी सांगेल सोसायटीच्या माध्यमातून भरायला पाहिजे. तर ते लोकांना शक्य नाही. आपण रिव्हेन्युची गोष्ट करु या. रिव्हेन्युच्या बाबतीत पाण्यामध्ये आपल्याला एवढी कमी वसुली आली होती पण आज रिव्हेन्युच्या बातीत आपण कमी नाही. शेकडो हजारो कनेक्शन आपण दिले त्या हजारो कनेक्शनचे आपल्याकडे डिपॉझिट जमले. एवढ्या लोकांना कनेक्शन दिले त्यांचे पाण्याचे बिल आपल्याकडे येतील, येणार नाही अशातला भाग नाही. म्हणजे जो मेजर रिव्हेन्यु आहे तो हाऊस टॅक्सच्या माध्यमातून होता, जकातीच्या माध्यमातून आहे आणि दुसरा पाण्याच्या माध्यमातून होणार आहे. त्या लोकांना आपण पाणी कसे देणार या बाबतीत विचार करण्यापेक्षा आपण पाणी त्यांच्या लाईन कापायच्या गोष्टी करायला लागलो ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. तुमचा निर्णय बरोबर आहे. तुम्ही पालक आहात. ह्या नगराचे भले कसे करायचे या बाबतीत तुम्ही विचार करा. परंतु या शहरातील नागरिक सगळेच गर्भश्रीमंत नाहीत. सभापतींनी उल्लेख केला की, जुन्या ज्या बिल्डींग आहेत त्याच्यामध्ये १०-२० हजार रुपये नाहीत. ५०-५० हजार रुपये, ७०-७० हजार रुपये मेन्टेनन्स बाकी आहे. ती लोक कसला टॅक्स देतील. मग त्यांच्यावर तुम्हांला जी कारवाई करायची आहे, जप्तीची करा किंवा काही करा. या बाबतीत कुणीही जर लोकप्रतिनिधी मध्ये आला तर त्याच्यावर तुम्ही कारवाई करा. त्यांना तशी समज द्या. परंतु ही सक्ती जी आहे ती योग्य नाही. अजून आपले शहर एवढे श्रीमंत झालेले नाही. तुम्ही सांगाल काही गोष्टी ठिक आहेत, मिरा रोडमध्ये श्रीमंत वस्त्या आहेत किंवा जे लोक काम करतात ते लोक कुठल्याही प्रकारचे ड्युज आपल्याजवळ ठेवत नाहीत. परंतु या मिरा भाईंदर महापालिकेमध्ये आदिवासी पाडे देखील आहेत. धारावीसारखे क्षेत्र काशिमिराला जे मुंबईपासून फक्त एक किलोमीटरवरती आहे. तिथे आज विजेची सोय नाही. या आपल्या महापालिकेच्या क्षेत्रातील तो भाग आहे. चेना, वर्सोवासारख्या ठिकाणी अजून लोकांना नदीतून जावे लागते. त्यांना आपण रस्ते देऊ शकलो नाही अशा गरीब वस्त्या आहेत. मग जेव्हा आपण नियम लावू नियम सर्वांना सारखाच लागेल ना आणि पुन्हा त्याच्यावर आपण एक निकष लावू जसा आमच्या स्थायी समितीने लावला होता की, जे रिझर्व प्रभाग आहेत त्याच्यामध्ये सगळ्यांना कनेक्शन देता येईल मग साईकृपा कॉम्प्लेक्स हा अकरा नंबरमध्ये फार मोठा आदिवासी भाग आहे. मग त्याच्यामध्ये सर्व इमारतींना पण आपण कनेक्शन देण्याचा निकष लावणार का? तुम्ही कुठल्याही निकषाची अंमलबजावणी करायची असेल तर त्यांचे एक ऑर्डर तयार केली पाहिजे. त्यांची एक नियमावली तयार केली पाहिजे. साहेब, आपण घेतलेल्या निर्णयामुळे संपूर्ण शहरामध्ये, लोकांमध्ये असंतोषाची लाट आहे. लोक तुमच्याकडे दुःख बोलू शकत नाही कारण तुम्ही अधिकारी आहेत. आमच्याकडे बोलू शकतात कारण आम्ही ऐकण्यासाठी जन्म घेतला. कृपया सभापती साहेब, यांच्यापुढे असे असेल तर विषय आम्ही पण आणू, असे अगत्याचे विषय अनेक आहेत. काही गरज नव्हती हा विषय तुम्हाला पहिला घेण्याची. आम्ही आपल्याला विनंती केली की, सभेनंतर विषय घ्या आणि आपल्याला एवढी कळकळ होती आम्हाला माहिती आहे. गेल्या सभेत हा विषय आला होता. मग आपण विषय पत्रिकेवर हा विषय का घेतला नाही? घेऊ शकत नाही का विषय? रितसर चर्चा झाली असती. घरी गणपती यायचे आहेत, काय आहे, तुम्हांला काय मस्करी वाटली का? तुम्ही असे बोलू शकता.

**रिटा शाह :-**

मिटींग पोस्टपोन करा. पुढच्या वेळेला हा विषय तुम्ही पहिल्या नंबरवर आणा आणि नंतर करा.

**हेरल बोर्जिस :-**

सन्मा. सभापती साहेब इथे सन्मा वैतीजी यांनी जनतेच्या संदर्भात बऱ्याचशा व्यथा आणि गाथा गायल्या. सन्मा. वैतीसाहेब मी आपणाला आठवण करुन देऊ इच्छितो काही शब्दप्रयोगाबद्दल आपण जी चर्चा घडवली त्याबद्दल तीव्र आक्षेप आहे. सर्वप्रथम आपण ऑक्ट्रायच्या संदर्भात जे बोललात अगदी संपुर्ण जनतेला जगजाहीर आहे की ऑक्ट्राय विषया संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सोबत काँग्रेस पक्ष देखिल होता. फक्त भाजपाच्य सदस्याचा त्याला तीव्र विरोध होता. आणि कदाचित आपण हे विसरला असाल दुसरी गोष्ट २५ टक्केवरून २८ टक्के जर कर नेला. आपण जर ट्रायपार्टी अॅग्रीमेंट वाचले असेल त्यामध्ये आपण १९९७ साली आपण बंधनकारक त्या गोष्टीला होतो. त्यामुळे तसा काही आपल्यावरती आक्षेप करायचा काही विषय नव्हता. फक्त आपल्या काही शब्दप्रयोगाशी मी असहमत आहे.

**शिवमुर्ती नाईक :-**

वैतीसाहेब बोलले त्याप्रमाणे जुन्या ज्या सोसायट्या असतील आणि ज्या अडचणींच्या आहेत. त्यावर अशाप्रकारचा अन्याय आम्ही करणार नाही आणि काजुपाडा आणि माशाचापाडा आणि उत्तन, डोगरी या भागातील टॅक्स वसुली ८० टक्के असते. जी आपण गरीब लोकवस्ती म्हणतो आणि जी आदिवासी म्हणतो त्यांची वसुली ८० टक्के असते.

**हेरल बोर्जिस :-**

आमची ९८ टक्के असते साहेब. अपवादात्मक दोन चार लोक सोडून.

**शिवमुर्ती नाईक :-**

तेच सांगतो जी आपण गरिब वस्ती म्हणतो .जे आदिवासी म्हणतो. त्याची दरवर्षाची वसुली ही ८० टक्के असते. भरत नाही तो वेस्ट ईस्ट आणि मिरारोड ज्यांच्याकडे आपण पैसा जास्त आहे असा उल्लेख केला त्यांच्या लोकांकडूनच वसुलीसाठी हात घालावा लागतो आणि कायद्याचा बडगा दाखवावा लागतो. नागरिक हा नगरपालिकेचा टॅक्स भरायला कंटाळा करतात. बाकीचे टॅक्स, टेलिफोन बिल असेल, इलेक्ट्रीक बिल असेल नाहीतर रेल्वेचा पास असेल किंवा इतर काही असतील त्या ठिकाणी स्वखुशीने खरेदी करतात. मात्र स्वखुशीने रक्कम जाऊन भरतात. आपल्याकडे स्वखुशीने कोण भरायला येत नाहीत. दोन-दोन, दहा-दहा वेळा सांगावे लागते आणि आपल्याला मी सांगितले आहे की, कमीत कमी १५-२० दिवस किंवा महिनाभर त्यांना पूर्वकल्पना दिल्याशिवाय आम्ही कनेक्शन कट करणार नाही आणि हे महपालिकेच्या हितासाठी वसुली होणे गरजेचे असल्यामुळे हा सांगाडा उपविधीतील असलेल्या तरतुदीचा आधार घेऊनच लावलेला आहे. ते बेकायदेशीर आहे असे म्हणता येणार नाही. कृपा करुन नगरपालिकेच्या वसुलीबाबत कुणी आपल्याकडे तक्रार करायला आल्यास आपण जे बाकीचे टॅक्स वेळेवर भरता त्याप्रमाणे नगरपालिकेचे टॅक्स भरावे असे त्यांना समजावून सांगण्याची विनंती सर्वांना करतो.

**रिटा शाह :-**

पाणी कनेक्शन, पाणी बिल आणि हाऊस टॅक्स ही चर्चा चालली आहे. हा मुद्दा साहेब आपल्याला लक्षात असेल. पुढेही झाला होता. त्याबद्दल लोकांची नाराजी अशी होती की अचानक लोक नगरपालिकेची आली तेव्हा नगरपालिका होती लोक आली आणि कनेक्शन कापले. लोकांना काय माहिती नव्हते असे काय झाले? कशाला ते कनेक्शन कापतात. कुठला प्रॉब्लेम झाला आहे. कोणाला काही माहिती नव्हते. अचानक आपले लोक गाड्या भरुन आले. कनेक्शन कापून गेले. एक सोसायटीला सकाळपर्यंत माहिती नव्हते की, आपले कनेक्शन कापून झालेले आहे असे पण झाले होते. आपण जे बोलता आणि दिनेश नलावडे जे स्थायी समितीमध्ये बोलले की, लोक बघायला गेले तर हॉटेलात जाऊन खातात ते परवडत त्यांना लाईट बिल भरतात, टेलिफोन बिल भरतात. सर्व खर्च करतात, मोबाईल पण असतात. ते लोक पण टॅक्स भरत नाही असेही आहेत. फक्त नगरपालिकेचे टॅक्स बिल भरतांना त्यांना असे आहे नाही भरले तर काय होणार. जास्तीत जास्त दारावर येणार. आपण हप्त्यांनी देऊ असाही गैरसमज लोकांमध्ये आहे आणि मी मानते प्रशासन चालवायचे असेल तर अधिकाऱ्यांनी थोडी सक्ती करावीच लागते. पण सक्ती करण्याचा अर्थ असा नाही की, गुंडागर्दी करायची. कारण त्यावेळी जेव्हा झाले होते की, जेव्हा आपण कनेक्शन कापले, शंभर कनेक्शन वेस्टला आपण कापले होते टोटल. तेव्हा कमीत कमी लोकांना आपण नोटीस द्या की, तुमच्या सोसायटीचा असा असा भरणा बाकी आहे आणि हा भरणा तुम्ही चार दिवसांत, दोन दिवसांत, २४ तासांत, आठ तासात भरणा केला नाही तर तुमचे कनेक्शन कापण्यांत येणार. अशी तुम्ही त्यांना समज द्या. नंतर

ते कनेक्शन कापा. ठिक आहे. वसुली करण्यासाठी लोक दारावर जाणार आणि असे बोलणार की, तुम्ही हे भरले नाही ते भरले नाही. तुमचे कनेक्शन कापणार. ठिक आहे. ते तुमची प्रशासकीय चाल बोला. तुमचे काम आहे ते बोलायचे पण तुम्ही प्रॅक्टीकली करतांना तुम्ही ऑफिशिअली जावा. कारण त्यावेळी मी स्वतः हायकोर्टात गेली होती. आपल्याला माहिती आहे. माझ्या वॉर्डातील चार सोसायटीला मी हायकोर्टात नेले होते. हायकोर्टाचा निर्णय झाला महानगरपालिकेच्या बाजूने झाला. कशाला तर उपविधीमध्ये ती तरतुद आहे की, कुठलाही टॅक्स भरला नाही, कुठलाही भरणा केला नाही तर वॉटर कनेक्शन महानगरपालिका, नगरपालिका कापू शकते. तो निर्णय ही झाला त्या बाजूने मी दुमत नाही. आपण जे काम चालू केले त्याबद्दल आपल्याला शाबासकी पण मिळाली आणि संत गाडगेबाबा जो आपल्या इथे परितोषिक मिळाले त्याच्यामध्ये सर्व बाबी होत्या की, ते पारितोषिक मिळविण्यासाठी आपल्याला काय काय करावे लागेल आणि नगरपालिकेने काय काय करावे लागेल. ह्या सर्व गोष्टींमध्ये तुम्ही साहेब आयुक्तांच्या हिशोबाने तुम्ही नंबर वनला राहिले. तुम्ही एवढी आमच्या शहरासाठी मेहनत केली आणि त्या मेहनतीचे कारण आहे की, आम्हांला ते पारितोषिक मिळाले. त्याचे श्रेय मी तुम्हांला महानगरपालिकेत दिले आहे. पण मी एक विनंती करते, तुम्ही प्रशासकीय राज्य चालवता. तुम्हांला प्रशासन चालवायचे आहे. आम्ही फक्त लोकप्रतिनिधी आहेत आणि आम्हांला लोकांना उत्तरे द्यायची आहेत. तुम्हांला हे शहर सांभाळायचे आहे. शहराचा विकास करायचा आहे व शहराच्या विकासासाठी पैसा पाहिजे. पैशाशिवाय शहराचा विकास होणार नाही हे सुद्धा मी मान्य करते. पण कुठल्याही तुम्ही वॉटर कनेक्शन कापा किंवा कुठलीही सक्ती करा. परंतु ती कायदेशीर करा असे माझे बोलणे आहे. तुम्ही कनेक्शन कापा परंतु ही सोसायटी पैसेवाली आहे आणि ही गरीब आहे असे नसते. सर्व सोसायट्यांना पैसे लागतात व सर्व सोसायट्यांना मेन्टेनन्स लागते. दोन लोकांनी पैसे भरले नाहीत म्हणून कनेक्शन कापायचे असे नाही. याच्यामध्ये तशी तरतुद करा की ८० टक्के किंवा ९० टक्के एवढा भरणा व्हायला पाहिजे आणि जर तेवढा भरणा नाही झाला तरच कनेक्शन कापा. कारण दोन लोकांनी पैसे भरले नाही म्हणून काय आपण चाळीस लोकांवर अन्याय करायचा का? हे सुद्धा आपण नाही करायचे. याच्यासाठी तुम्ही कायदेशीर असे मुद्दे बनवावेत आणि हा विषय आपण आजच्या मिटींगमध्ये न घेता ही मिटींग तुम्ही पोस्टपोन करा आणि पुढच्या मिटींगमध्ये तुम्ही सदरचा विषय विषयपत्रिकेवर आणून ह्या विषयावर कायदेशीर जे ठरवायचे आहे ते ठरवून सदरचा विषय पुढील स्थायी समितीसमोर आणून सदरचा ठराव पारित करावा असा मी ठराव मांडीत आहे.

**शरद पाटील :-**

आता आपण एकत्र बिल पाठवत आहोत, सोसायटीला आणि आता आपण बोलल्याप्रमाणे स्पष्टीकरण करतो आहे की, जर एखादी सोसायटी मेन्टेनन्स भरू शकत नसेल किंवा टॅक्स देणार नाही किंवा ती सोसायटी जर टॅक्स भरायला आली आणि त्याच्यातील जर पाच लोक टॅक्स भरत नसतील तर तुम्ही कुठल्या पद्धतीने त्यांच्याकडून टॅक्स वसुली घ्याल.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त ) :-**

शंभर टक्के वसूली झालीच पाहिजे असे काही बंधन मागच्या वर्षापासून किंवा आता पर्यंत कधी केलेले नाही. ७०-८० टक्के वसूली झाल्यानंतर आम्ही ते कनेक्शन शक्यतो ९९ टक्के तोडत नाही. आणि त्या लोकांना सोसायटीचे चेअरमन, सोसायटीचे सदस्य ज्यावेळेला आपल्याकडे येतात आणि सांगतात की पाचच लोक राहीलेले आहेत आणि आम्हालासुध्दा त्रास देत आहेत. त्यांना आम्ही पोलिस स्टेशनला पत्र देतो की ह्या सोसायट्यांना त्या फ्लॅटचे कनेक्शन सोसायटीच्या चेअरमनने किंवा सेक्रेटरीने कट केले तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करु नका असे पत्र पोलिस स्टेशनला देतो आणि त्याची एक कॉपी सोसायटीला देतो हे त्या नागरिकांना सुद्धा समजले पाहिजे की, पाचजण भरत नाही आणि बाकीच्या लोकांना वेठीस धरायला नको आणि त्याच्यासाठी त्या ऐशी लोकांना त्रास व्हायला नको म्हणून आम्ही हे पत्र देतो आणि पत्राच्या भितीमुळे सगळ्या लोकांनी भरायला सुद्धा सुरुवात केली. कारण त्या फ्लॅटचे कनेक्शन तोडण्याचा अधिकार आपण सोसायटी आणि सेक्रेटरीला देतो.

**मिलन म्हात्रे :-**

ते स्विकारतील की नाही?

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त) :-**

शक्यतो ८० टक्के झाले आणि पाच लोक भरत नसतील तर त्यांना पत्र देतो आणि पैसे स्विकारतो आणि नियमाप्रमाणे आम्ही फक्त आता सध्या जे चाललेले आहे हे फक्त सांगण्याचे चालले आहे. दोन दिवसांनी चार दिवसांनी त्या माणसाकडे गरीब सोसायटी आणि सेक्रेटरीला सांगून यायला

पाठवतो आणि त्यांची सही घेतो. तुम्हांला सांगितले म्हणून आणि ज्यावेळी ॲक्शन घेणार त्यावेळी मी २४ तासाची नोटीस देणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपल्या परवानगीने बोलतो. आपण ही जी आता पाऊण तास चर्चा केली, हे जे सचिव आहेत त्यांनी सभा अजून चालू केलेली नाही.

**मा. सभापती :-**

सभा चालू केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ही जी साधक-बाधक चर्चा झाली इतिवृत्तांतामध्ये येणार आहे का? कुठल्या अनुषंगाने?

**रिटा शाह :-**

कुठल्या कायद्याखाली आणणार?

**मिलन म्हात्रे :-**

जी सभा ज्या सदस्यांनी सुरु केली त्या सदस्यांचे विषयपत्रिकामधील १३८ मध्ये स्पेसिफीक नांव आहे. पत्र आहे. सांगायचा दृष्टिकोन असा आहे या सभागृहाचा, आता त्यांच्याकडे गणपती आहेत. सगळे काही आहे. ठीक आहे. तुम्ही सभा घ्यायला नको होती. मान्य आहे. आम्हांला गणपती वगैरे काही नाही. आम्ही नगरसेवक आहोत. जबाबदारी आहे. आम्ही चार तास मिटींग चालवू निर्णय घेऊन सभागृहाच्या बाहेर पडू. नंबर एक जर असे पत्र पाठवून विषय क्रमांक १३८ हा येतो तर सन्मा. सदस्यांनी त्याच सदस्यांनी सत्ता त्यांची आहे, महापौर त्यांचे आहेत, सभापती त्यांचे आहेत, प्रशासनसुद्धा बहुतेक त्यांच्या सांगण्यानुसार धावपळ करते, चालते आणि वागतेसुद्धा तर १३८च्या अगोदर १३७ हा विषय सभापतींकडे आसिफ शेख यांनी का आणला नाही असा माझा स्वतःचा या सभागृहामध्ये आक्षेप आहे. पण इकडे त्यांनी क्लीअर कट या सदस्यांचे नांव दिलेले आहे. १३७ जर त्यांनी आणला असता तर आम्ही त्यांना अनुमोदन दिले असते. प्रश्न म्हणजे मुद्दा क्र. १. दुसरी गोष्ट, आता झाली. नाईक साहेबांनी प्रशासनाला फार चांगल्या पद्धतीने सांभाळले आहे. प्रत्येक वेळेला सांभाळतात म्हणून प्रशासन त्याला डब्यात टाकते. प्रशासन अडचणीत आले, एखादा क्लार्क आला, एखादा प्युन घरी रहायची वेळ आली की, नाईक साहेब सगळ्यांना आठवतात. जेव्हा नाईक साहेबांनी या सभागृहात एन्ट्री केली पुर्वी सगळे उठून उभे रहायचे, आज कुणीच उभे राहिले नाही. यावर माझे लक्ष आहे. बऱ्याच ठिकाणी युज ॲन्ड थ्रो हा प्रकार चालतो तो हल्ली चालला आहे. प्रश्न तो नाही. आपण थोडे अनॅलिसीस केले. अमुक तारखेला अमुक एवढी एवढी वसुली झाली. तारखा आपण दिल्या आहेत. साहेब आपण आपल्या म्हणण्यानुसार जर ही लाखो रुपयांची वसुली झाली तर १८ तारखेच्या अगोदर प्रशासन काय करीत होते? मग त्याच्या अगोदर काही लाखातील रकमा का वसुली झालेल्या नाहीत? थोड्या वेळापूर्वी तुम्ही म्हणालात की, काही सोसायट्या ज्या ॲडॉप्ट सोसायट्या आहेत किंवा ज्या प्रपोज सोसायट्या आहेत त्यांना मी हा नियम लावणार नाही किंवा त्यांच्याबद्दल आम्ही थोडी सॉफ्ट बाजू घेऊ असे आपण आपल्या संभाषणामध्ये व्यक्त केले. चार दिवसांपुर्वी एक केस आपणाकडे मी आणली होती, ही सोसायटी अजून स्थापन झालेली नाही. त्या व्यक्तींनी पैसे आणले होते. शेवटपर्यंत प्रशासनाने ते पैसे घेतले नाही. मी स्वतः सांगितले की, साहेब ही सोसायटी अजून अस्तित्वात आलेली नाही ही केस आपण पैसे घेतले तर बरे होईल. पण शेवटपर्यंत तुम्ही ऐकले नाही. मी म्हटलं नाही ऐकत तर पैसे भरुन टाकले. तर सांगायचा दृष्टीकोन असा आहे की, ह्याच्यावरती बहुतेक सांभाळण्याचा प्रकार झालेला आहे. परंतु बऱ्याच सोसायट्यांना आता माझ्या वार्डमधील सोसायटीवाले परवा आले होते. त्यांनी स्पष्ट सांगितले की, आम्ही दहा बिल्डींगचे पाण्याचे पैसे नगरपालिकेत भरायला तयार आहोत. आम्ही आमचा वेळ खर्च करुन नगरपालिकेत गेलो परंतु नगरपालिकेने पैसे आम्हांला घ्यायची मनाई केली. पुर्वी सुद्धा आपली वसुली झाली. पुर्वी आपण स्वतः उपायुक्त, आयुक्त त्याच्या अगोदर चिफ ऑफीसर होते. अशाच पद्धतीची सक्तीची वसुली झाली. लोकांनी पैसे आणून भरले त्या वेळेलासुद्धा आपण पाण्याचे कनेक्शन घेत होतात. हाऊस टॅक्स सेपरेट घेत होतात. प्रॅक्टीकली, वसुली चांगली दोन्ही खात्यातील चांगली झाली. त्यावेळी असे नाही की, बैलगाडीचा एक बैल पुढे धावतो आणि एक मागे धावतो. हा प्रकार नव्हता. सायमल्टेनिअसली, तो जो रथ तुम्ही बोललात तो चांगला चालला होता. तर सांगायचा दृष्टीकोन असा की, वारंवार आमच्या नगरसेवकांना असे सांगितले जाते की, वसुलीबद्दल आम्ही पोलिस स्टेशनला पत्र दिलेले आहे. पण आपण हा विचार करतो का? की, ज्या सोसायटीचा सेक्रेटरी ट्रेझरर किंवा जो चेअरमन आहे त्यांना पुढे

ही फार वाईट परिस्थिती फेस करायला लागणार आहे. महानगरपालिकेने आयुक्तांच्या सहिने चेअरमन, सेक्रेटरी, ट्रेझरर त्यांना तो तुम्हांला अधिकार दिलेला आहे असे अजुन कुठल्याही सोसायटीला आपण पत्र दिलेले नाही, ते द्यावे. पोलिस स्टेशनला ठिक आहे. कल आना, बाहर खडा रहना, एन.सी. नोंदवून घ्या, ह्याला आतमध्ये टाका. एक लक्षात ठेवा या विषयावर एवढी चर्चा झाली पण नगरपालिकेच्या कायद्याच्या पुस्तिकेमध्ये जे आयुक्तांना सर्वोतपरी अधिकारी घटनात्मक दृष्टीकोनातून मिळालेले आहेत. त्यातील एक तरी अधिकार चेअरमन, सेक्रेटरी, ट्रेझरर यांना आहे का? त्या व्यक्तीची जप्ती ते करु शकत नाही. त्या व्यक्तीला ते सक्ती करु शकत नाहीत. त्या व्यक्तीचा फ्लॅट ते बंद करु शकत नाहीत. सील करु शकत नाहीत. त्या व्यक्तीचा फ्लॅट ते लिलाव करु शकत नाहीत. सर्वतोपरी सगळे घटनात्मक अधिकार आयुक्तांना आहेत हे लक्षात ठेवा. बिल्डरशी तिकडे आज कुठलेही पदाधिकारी दोन हात करु शकत नाही आणि महापालिका प्रशासन पण करु शकत नाही. माझ्या वॉर्डमध्ये एका बिल्डींगने ५ लाख ८० हजार पैसे भरले. आजही १० ते १२ फ्लॅट बिल्डरच्या नावावर आहेत. या गोष्टीला तीन वर्षे झाली. अजूनपर्यंत त्या बिल्डरकडून काही रिस्पॉन्स नाही आणि नगरपालिकेनेसुद्धा त्याचा नाद सोडलेला आहे. कशाला आपण गोल गोल गप्पा करायच्या. तुम्ही रिकव्हरी किती झाली ते सांगितले, नळ कनेक्शन किती कापले त्याचा हिशेब दिला त्याच्यातून महसुल किती आला त्याचा हिशोब दिला. नळ कनेक्शन कापायला सोपे असेते. एखाद्या बिल्डरचा फ्लॅट लिलाव करायला कठीण असतो. नाहीतर सेटींग लागतात. भलत्या सलत्यांचे फोन येतात. प्रशासन त्याच्यावरती दबाव येतो आणि मग बिल्डर लोक मोकळे सुटतात. काय कारवाई आपण करणार? गोरगरीबांना फटके मारले की, पैसे वसुल होतात. ही परीस्थिती आहे मी उदाहरणादाखल देतो. माझ्या इकडे मी स्वतः त्या वेळेला आलो असतांना गोरगरिब लोकांनी कर्ज काढून तीन तीन, साडेतीन हजार, पाच हजार सगळे भरले. साहेब आपण नवीन आला होतात. आपलीच स्वाक्षरी त्याच्यावर आहे आणि जवळजवळ १० ते १५ फ्लॅट अजूनही त्याच्यातील टॅक्सचे बाकी आहेत. त्याच्यावर काय कारवाई केली? बिचारे गोरगरीब कमावणारा दोन हजार, अडीच हजार. तो देखील पैसे भरता आहे असे टॉवरच्या टॉवर पडलेले आहेत. तुम्ही पाच पंचवीस बिल्डर लोकांचे करा ना. फ्लॅट तुम्ही का नाही लिलाव करत? जसे तुम्ही अन्यत्र बाबतीत ठाणे महानगरपालिकेमध्ये किंवा कल्याण डोबिवलीचे तुम्ही उदाहरण दिलेत त्या महानगरपालिकेने पण लिलाव केले आहेत. जसे तुम्ही उदाहरण देता तसे तुम्ही तेही उदाहरण द्या ना. ठाणे महानगरपालिकेने ५० लिलाव केले. मिरा भाईंदर नगरपालिकेने २५ करावे. मी नेहमी तुम्हांला सांगतो प्रशासन अडचणीत आल्यावर तुमचा वापर केला जातो हे प्रत्येक वेळेला सांगतो आहे. लोकांना यांनी अडचणीत आणायचे सावरायचे तुम्ही. हे सगळे चालेले आहे. कल्याण डोंबिवलीमध्येसुद्धा हे प्रकार चालू आहेत. इंडस्ट्रिजमध्येसुद्धा इंडस्ट्री सिल करुन बऱ्याचशा कंपन्यांनी नगरपालिकेनी, महानगरपालिकेनी पैसे मिळविलेले आहेत. मला एक सांगा आपल्या आयुक्तांना जेवढे विधीवत न्यायप्रविष्ठ ज्या बाबी आहेत आता जे तीन मॅटर आपण सांगितले की, केसचा निकाल आपल्या बाजुनी झाला. मान्य आहे. त्या केसमध्ये काही टेक्निकल मुद्दे आले नसतील, होऊ शकते. का होऊ शकत नाही? नगरपालिका काय सगळेच ॲफिडेव्हीटवर सांगत नसते. बऱ्याचशा वेळेला तुमच्या वकिलाला बोलते करावे लागते कोर्टामध्ये. आम्ही बोलते केलेले आहे. वसुल्या पण केलेल्या आहेत. एक लक्षात ठेवा मी परत परत सांगतो, साहेब या मारामाऱ्या प्रचंड होता. दुश्मन्या होतात, चॅप्टर केसेस होतात. सोसायटीत ट्रेझरर, चेअरमन, सेक्रेटरी यांचा काहीही संबंध नसतो. बरेचसे लोक निरनिराळ्या तऱ्हेने सोसायटीमध्ये आलेले आहेत. त्यांना चांगली मेन्टेलिटी असते असे समजू नका. क्रिमिनल मेन्टेलिटीची पण लोक आहेत. त्यांना ज्ञान देणारी लोक आहेत. अशातून काही क्रिमिनल केसेस तयार होतात. त्या पदाधिकाऱ्यांना त्याचा हॅरेसमेन्ट त्रास होतो. आपल्याला ज्या घटनात्मक सविधानात्मक बाबी आहेत आणि अधिकार दिलेले आहेत, प्रदान झालेले आहेत तशा प्रकारचे अधिकार या तीनही व्यक्तींना, पदाधिकाऱ्यांना नाहीत. त्याकरिता माझी ही तशी सुचना आहे म्हणा किंवा काहीही म्हणा की, तुम्ही का नाही डायरेक्ट चेअरमन, सेक्रेटरी आणि सोसायटीच्या ट्रेझररला सरळ पत्रच द्या ना. आम्ही ही नवीन पद्धती अवलंबलेली आहे आणि त्याच्यामुळे तुम्हांला आम्ही असे असे अधिकार देतो की, तुम्ही आम्हांला पत्र दिले तर आम्ही लगेच कारवाई करु किंवा ह्या पोलिस स्टेशनवर ह्या ह्या मॅटरवरती तुमच्यावर केस होऊ शकत नाही. ही सर्वस्वी जबाबदारी आम्ही तुम्हांला दिलेली आहे. अशातील खुलासा कुठे आतापर्यंत प्रशासनाचा आला आहे का? आयुक्त म्हणतात की, मल जप्तीचा आदेश असुनसुद्धा मी करणार नाही, तुम्ही करा. मला लिलाव करण्याचा अधिकार आहे पण माझे अधिकार मी डावलले आहेत. माझे अधिकार तुम्ही

वापरायचे नाही. सगळे रेडीमेड करुन आणून मला द्यायचे. अधिकार माझे इम्प्लिमेंट दुसऱ्याने करायचे हे कोण बोलते का? अजूनपर्यंत मागच्या वेळेला पण विषय हा आला पण ह्या विषयाबद्दल कोणी बोलले नाही. आयुक्तांनी उठून बोलायला पाहिजे ना? ह्या ४९ च्या ॲक्टनुसार मला अशी प्रोव्हिजन आणि ही जी पावर्स दिली आहेत पण ती मी युटीलाईझ नाही करणार. माझी वसुली सगळी चेअरमन सेक्रेटरीने करुन आणायची. परत पैसे जमा करायचे प्रेस्टिज आम्ही घ्यायला तयार. इतके लाख वसुल झाले. आता तुमच्या कडे जो टॅक्स डिपार्टमेंटमध्ये एवढा जो स्टाफ पडलेला आहे, बसलेला आहे. त्याचे काय करणार, सगळी वसुली त्यांनी करुन आणायची. तुमच्या स्टाफचे मग काय एवढे जे पगार आता एक एक नवीन नवीन अधिकारी येतात, २० हजार पगार, १५ हजार पगार, २५ हजार पगार, गाड्या, इंधनाचा खर्च हा सगळा एका साईडला खर्च आहे. एका साईडला मागच्या वेळेला तुमचा प्राव्हटायझेशनवरती आणले होते हे सगळे डिपार्टमेंट तुम्ही प्रायव्हेट करायला देणार ह्याच्यातील जो स्टाफ निघणार तो काय करणार? त्याचा हिशेब कुठे दिला का? टिपणी आली पण या खात्यातील २०० कर्मचारी, ३०० कर्मचारी प्राव्हटायझेशन झाल्यानंतर हे बेकार बसणार आहेत. त्यांना आपल्या आस्थापनेवरुन एवढा एवढा लाख रुपये पगार जाणार आहे. हा नगरपालिकेचा खर्च आहे. हे नगरपालिकेचे नुकसान आहे. ह्याचा खुला कोणी केला आहे का? नाही, अजुनपर्यंत आलेला नाही. फक्त खाते हे प्रायव्हटायझेशन करायचे. बी.ओ.डी. तत्वावर म्हणा, कशावर पण म्हणा, देऊन टाकायचे. त्याचे चांगले वाईट परिणाम या पुढचे काय? परमनेंट माणसांना तुम्ही घरी बसवू शकणार काय? नाही. पगार तर द्यायचाच आहे. त्यांना कुठे ॲक्युमडेट करणार तुम्ही. कुठेच नाही आणि सगळ्या नगरसेवकांना सांगून ठेवतो मी, पुढे रात्री रात्री मारामाऱ्या होणार आणि पोलिस स्टेशनला जागरण होणार आहे. सगळ्या सोसायटयांमध्ये हाणामाऱ्या चालू होणार आहेत.

अभी सारे बिल्डींग का लवंडर हमारे गले मे आ गया। अभी हम नोकरी छोडके वही धंदा करे क्या? जनरल बॉडी मिटींगमे कोई आता नही है। हमारा बराबर लोग सब बराबर चलता नही है। उसका प्रेझेंटी लगता नही है। इसिलिए सबको बता नही सकते ये हमारी प्रॉब्लेम है। मेन्टेनन्स कोई देता नही है। कोई नटोरियस लोग है। वह प्रायव्हेट केस करता है। उसके तारीख पर जाना पडता है।

साहेब त्या लोकांना देखील काहीतरी त्रास होत आहे. ह्या ह्याच्यामध्ये जे काय तुम्ही तीन दाखले दिले, हायकोर्टाचे ठिक आहे. त्याचे काय निराळ्या अँगलने केस झाले असतील. तुमच्या फेवरला केसचा निकाल लागला असेल. पण असे समजू नका की, त्या केस तुमच्या बाजूने झाल्या म्हणून तुम्ही मोकळे सुटलात. तुमच्या ज्या काही उपविधी आहेत जे काही नियम आहेत हे सगळे मिळून त्याच्यावर साधक बाधाक विचार करु. बी.एस.सी.ने केले असेल त्याच्यावर त्यांना काहीतरी चांगले वाटत असेल. त्यांचे सोर्स ऑफ इन्कम जास्त असेल किंवा त्यांना शक्य असेल बी.एम.सी.चा इतिहास अनेक वर्षांचा आहे. ठाणे महानगरपालिकेचा इतिहास हा अनेक वर्षाचा आहे. आपला इतिहास हा नव्याने चालू झालेला आहे. एवढेच सांगायचा दृष्टीकोन आहे, आपल्या गेल्या बारा वर्षांचा उल्लेख केला की, अमुक अमुक वसुली झाली नाही. ग्रँड परत गेल्या. तुम्ही ठाणे महानगरपालिकेचे ग्रँड किती परत गेले त्याचा हिशोब दिला का नाही. पण आपण जेव्हा सगळा विचार करतो तेव्हा साहेब आपण अजूनपर्यंत तेवढे तयार झालेलो नाही. थोडा वेळ जाणार आहे. प्रश्न एवढाच आहे की, लोकांना आपल्याला ह्याची सवय घालावी लागेल. पटकन आपण हँबरिंग करणार तर चालणार नाही. गेल्या वर्षी आपण दांडा घेऊन बसलात. सगळी वसुली आम्हीपण तुमच्या बरोबर केली. पण याचा अर्थ असा नाही. कुठेतरी आपण लोकांना समजून घ्या. सगळ्यात महत्वाचा प्रश्न म्हणजे जे भाडेकरु आहेत व येथे येणाऱ्या नॉन रेसिडेन्शीअल लोकांनी येथे हजारो फ्लॅट आपल्या नावावर घेऊन ठेवले व मुळ मालकाचा पत्ता नाही, कोणीतरी भाडेकरु रहातात. जो माणूस तिथला सेक्रेटरी आहे अशा ह्याच्यामध्ये आपण त्यांना त्रास देणार का? तुम्ही क्रायटेरिया ठरवा ना. जी सोसायटी रजिस्टर्ड आहे, आता तुमच्या संभाषणामध्ये आले की, तुम्हांला ॲड्रेस ट्रेस होत नाही. ते कसे ट्रेस होतील. तुम्ही बी.एस.ई.एस.ला पत्र दिले. नगरपालिकेचे एन.ओ.सी नसेल तर मीटर लावायचे नाही. तुम्ही नव्वद फुटावरचे जे दुय्यम निर्बंधक आलेले आहेत ते जे रजिस्ट्रेशनची वसुली करतात त्यांना तुम्ही पत्र दिले. आमची एन.ओ.सी. असल्याशिवाय तुम्हांला रजिस्ट्रेशन करु शकत नाही. मग तुम्ही ज्या अलट्रेस प्रॉपर्टी आहेत त्यांचे पत्र तुम्ही त्यांना का देत नाहीत? त्यांच्याकडे त्यांचा रेकॉर्ड आहे, पत्ता आहे, मुळ मालकाचा अद्यावत रेकॉर्ड आहे, फोटो आहे मुळ मालकाचा. तो रेकॉर्ड कसा मिळू शकत नाही. जर तुम्ही याची माहिती काढली तर तुमची वसुली चांगली होऊ शकेल. हा प्रकार आपण करुन बघितला

पाहिजे. महानगरपालिकेच्या वतीने तुम्ही सोसायटीच्या लोकांना काय सुविध देऊ शकता? जेणेकरुन ते स्वतः पुढे आले पाहिजे की, तुम्ही ही सक्ती केलेली आहे ती आम्ही मान्य करतो. पण आम्हांला आपण काहीतरी प्रोटेक्शन द्या. ह्या त्याबाबतीत आपण नव्याने विचार करावा.

**मा. उपाआयुक्त (शिवमुर्ती नाईक साो.) :-**

मा. नगरसेवक मिलन म्हात्रे साहेबांनी सांगितले. पोलीस स्टेशनला मागच्या वर्षी जेवढी पत्र दिली. त्या पत्रामध्ये एकही सोसायटी किंवा चेअरमनवर नळ कनेक्शन फ्लॅटचे कट केले म्हणुन गुन्हा दाखल झालेला नाही. मी तिन्ही पोलीस स्टेशनला फोन केले होते की, आमचे पत्र पाहिल्यानंतर त्या फ्लॅटचे नळ कनेक्शन कट केले व कोणीही काहीही सांगितले तरी आपण गुन्हा दाखल करु नये असे मी सांगितले आहे. मी डी.वाय.एस.पी व एस.पी.च्या कानावर घातले होते. त्याप्रमाणे एस.पी. साहेबांनी डी.वाय.एस.पी. साहेबांनी तिन्ही पोलीस स्टेशनला सांगितले की इंडीव्ह्युजल फ्लॅट ओनर नगरपालिकेचे टॅक्स भरत नसतील तर सेक्रेटरी आणि चेअरमनने कनेक्शन कट केले तर त्याच्यावर आपण गुन्हा दाखल करु नका असे सांगण्याकरिता मी सभा बोलाविली होती व त्यासंदर्भात पत्रही दिलेली आहेत. नगरपालिका असताना आपण ज्यावेळी थकबाकीदारांची प्रसिद्धीकरण करतो. प्रसिद्धीकरण सर्वच नगरपालिका करित असते. आम्ही देखील त्यावेळेला प्रसिद्धीकरण केली आणि नगरपालिका असताना नगरपालिकेला अधिकार नव्हते. ज्या लोकांनी लिलावात भाग घेतला नाही. त्यामुळे नगरपालिकेला खरेदी करायचे असेल तर जिल्हाअधिका-याची मंजुरी घ्यावी लागते. त्यामुळे आम्ही लिस्ट ठेवली होती. लिलावाच्या दिवशी कोणी आले नाही आणि त्यांच नाममात्र एक रुपयाला घ्यावे. त्या लिस्टला जिल्हाधिका-यांची मंजुरी घेऊनच ते फ्लॅट नगरपालिकेच्या नावावर होणार होते परंतु त्यावेळेला मंजुरी मिळाली नाही. नागरिक फक्त नगरपालिकेचे कर भरण्याकरिताच कर्ज घेतो असे नाही. इतर कामासाठी पण कर्ज घेतात. महत्त्वाचे कर भरण्यासाठीच कर्ज काढतात हे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही. सोसायटी आणि सेक्रेटरीला आम्ही पत्र देतच आहोत. नगरपालिकेचे कर भरण्यासाठीच भांडणे होतात असे नाही या सोसायटीमध्ये. पूर्वी एकत्र कुटुंबपद्धती होती. एकाच कुटुंबातील लोक व्यवस्थित राहू शकतात. मागच्या पाच वर्षापर्यंत एकत्र कुटुंबपद्धती चालली होती. सध्या विभक्त कुटुंबपद्धत सुरु झालेली आहे. आता सोसायटीमध्ये येणारी जी लोक आहेत. ती वेगवेगळ्या गावातुन, वेगवेगळ्या जिल्ह्यातुन, वेगवेगळ्या प्रांतातुन आलेली आहे. त्यामुळे एकत्र कुटुंबात जसे सामंजस्याने वागले जाते तसे सोसायटीमध्ये सामंजस्य नसते. एक सेक्रेटरी, चेअरमनची निवडणुक झाली म्हणजे दुसरी पार्टी विरोधात जाते आणि दुसरी पार्टी निवडुन आली कि तिसरी पार्टी विरोधात जाते. आणि वेगवेगळ्या जिल्ह्यातुन वेगवेगळ्या प्रांतातुन लोक आलेले असल्यामुळे त्यांच्यात एकीची भावना नसते आणि त्यामुळे निवडणुकीसाठी वेगवेगळ्या विचारसरणींची लोक एकत्र आल्यामुळे भांडणे होतात. निव्वळ कराचे बिल गेले म्हणून भांडणे सुरु झाली नाहीत आणि माझ्यासमोर प्रत्येक सोसायटीने येऊन सांगितले आहे ह्याने मला फसवले ह्याने मला लुबाडले असे प्रत्येक सोसायटीमध्ये निव्वळ नगरपालिकेचे एक टक्कातरी भांडणे असतील. प्रॉपर्टी टॅक्स भरण्यावरुन सोसायटीमध्ये एक टक्का भांडणे असतील पण इतर कारणामुळे त्यांची भांडणे जास्त प्रमाणात आहेत. कृपा करुन ज्या तक्रारी नगरपालिकेच्या टॅक्स वसुलीकरिता येत असतील. तेव्हा नगरपालिकेच्या हितासाठी जे जे नागरीक येतील त्यांना समजावुन सांगावे. आम्ही बिल पाठवल्याबरोबर कनेक्शन कट करणार नाही. महिनाभर आम्ही सांगु, विनंती करु आणि विनंती केल्यानंतरच आम्ही नळ कनेक्शन कट करु. आम्ही ताबडतोब ॲक्शन काही घेणार नाही आणि नगरपालिकेलासुद्धा विकासाच्या कामासाठी रक्कम आवश्यक आहे. कृपाकरुन सर्व सभासदांना माझी विनंती आहे की, जे जे नागरीक येतील आणि तुम्हाला जर प्रॉब्लेम सोडवता येत नसेल त्या वेळेला मला फोन करुन जरी सांगितले तरी तो प्रॉब्लेम सॉल्व्ह करू आणि नगरपालिकेच्या वसुलीसाठी हातभार लावावा अशी नम्रतेची विनंती करतो.

**मा. केळकर साो. :-**

सन्मा. सभागृह या विषयावर सविस्तर चर्चा सर्वांनी व्यक्त केली. महानगरपालिकेमध्ये अधिकारी म्हणजे नगरपालिका नव्हे. पदाधिकारीसुद्धा नगरपालिका प्रशासनाचे महत्त्वाचे सहभागी असल्यामुळे प्रशासन चालविताना ती जी दोन चाके तुम्ही म्हटली दोन चाके नगरसेवक, लोकप्रतिनिधी आणि अधिकारी अशी जी दोन चाके आहे समन्वयाची. आपणाला माहिती आहे ५-१० वर्षापूर्वी हे एक विकसीत शहर होते आणि ज्या पद्धतीने हे शहर विकसीत होत आहे. त्यासाठी आपल्याला निधीची आवश्यकता आहे. तो निधी आपल्याला नागरिकांकडूनच उपलब्ध करावयाचा आहे. आणि जर मालमत्ता कर, पाणीपुरवठा कर आणि जकात ही महत्त्वाची उत्पन्नसाधने आपणाकडे आहेत. आणि अशा

परिस्थितीमध्ये नगरपालिकेची विकास कामे करण्यासाठी आपणाला निधीची आवश्यकता असल्यामुळे तो निधी आपल्याला नागरिकांकडुन उपलब्ध करुन घ्यायचा आहे आणि मालमत्ता कर, पाणीपट्टी कर, आणि जकात ही महत्वाची उत्पन्नाची साधने आपल्याकडे उपलब्ध आहेत आणि या तीनच साधानांवर आपले उत्पन्न अवलंबून आहे. अशा परिस्थितीत नगरपालिकेची विकासकामे करण्याकरिता आपल्याला निधीची आवश्यकता असल्या कारणामुळे प्रशासनाला वसुलीकामी आपण सहकार्य करावे अशी मी आपणाला विनंती करतो. आपणाला माहिती आहे सक्तीचा बडगा उचलल्याशिवाय वसुली होत नसते. आणि वसुली करणे ही एक प्रशासकीय बाब आहे. आणि आपणही सर्व नागरिकांना विनंती करा. लोकप्रतिनिधी म्हणुन की ही नगरपालिकेची मालमत्ता कर असो पाणीपट्टी असो अधिक काही कर असो हे लवकरात लवकर भरण्याच्या दृष्टीने आपण नगरपालिका प्रशासनाला सहकार्य करा आणि ह्या नगरपालिकेची आर्थिक समृद्धी जर झाली नाही तर विकास आपण साधु शकत नाही. कारण की दोन्हीही एकमेकांवर अवलंबुन आहे आणि सर्वांनी सहकार्य करावे. एवढे बोलुन मी माझे भाषण संपवितो.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांनी पाणी ह्या विषयावर कोणतीही सांगड घालू नये. कर आणि पाण्याची बिले ह्याच्यावर सर्व सन्मा. सदस्यांनी जी साधकबाधक चर्चा केली. ती अत्यंत तळमळीची चर्चा होती. आणि या ठिकाणी प्रशासनाकडुन उपायुक्त नाईकसाहेब यांनीही आपल्याला गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. आणि त्यांनी आपल्याला चांगल्या गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. कोणत्या पद्धतीची सक्ती प्रशासनाकडुन केली जाणार नाही अशा पद्धतीचे प्रशासनाकडुन या ठिकाणी आपल्याला त्यांनी सांगितलेले आहे. या बाबतीत रुलिंग देऊ इच्छितो. याच्यापुढे सांगड घातली गेली जाणार नाही. फक्त नागरिकांना त्याचा समज दिला जाईल. नागरिकांना उदाहरणार्थ धाक दाखविला जाईल. परंतु प्रत्यक्ष कृतीमध्ये कोणतेही कनेक्शन कापण्यात येऊ नये. जो पर्यंत त्यांना पूर्णपणे संधी दयावी. शहराचा विकास व्हावा असेही सगळ्यांचे मत आहे. प्रशासनाचे मत आहे, नगरसेवकांचे मत आहे. नागरीकही त्यांना साथ देत आहेत. या पुढे कोणत्याही पद्धतीने सक्तीने कनेक्शन कापले जाणार नाही. एवढे नमूद करुन घ्यावे. पुढील विषयाला सुरुवात करा.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३१ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. १३ वर सुचक व अनुमोदन दिले आहे. पण नाव लिहिण्यात आलेले नाही.

**प्र. सचिव :-**

सूचक आणि अनुमोदन ह्याला नसते.

**मिलन म्हात्रे :-**

जे काही मतदान झाले किंवा ठराव केला गेला आणि नावे कमी झाली, नावे वाढली आपण ह्याच्यात उल्लेख केला पाहिजे होता.

**मा. सभापती :-**

बिनविरोध निवडणुक असे दुरुस्ती करण्यात यावी.

**मा. केळकर सो. :-**

मा. सभापतीसाहेब यांनी चिठ्ठ्या टाकल्या आणि त्याप्रमाणे आठ सदस्य निवृत्त झाले असे घोषित केले.

**प्रकरण क्र. १३१ :-**

दि. ७/७/०३ रोजीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ११३ :-**

दि. ०७/०७/२००३ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे.** **अनुमोदन :- श्री. हरेश गावंड.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३२ चे वाचन केले.)

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सभापती साहेब, सन्मा. उपायुक्त साहेब मिरा भाईंदर शहरामध्ये जी आरक्षणे आहेत व काही आरक्षणे सरकारी जागेत आहेत. आणि जिथे जिथे सरकारी जागेतील आरक्षणे आहेत तिथे तिथे हमखास अतिक्रमण झालेले आहे आणि आपण एक ठराव घेतला होता. तो ठराव म्हणजे महाराष्ट्र शासनाचा आदेश आहे. सन १९९५ नंतरच्या ज्या झोपड्या आहेत त्या काढण्याचा ठरवले होते. आणि सरकारी जागेतील अतिक्रमणे यामुळे दूर होणार आहेत. वास्तविक भूसंपादन अधिकारी ज्यांच्या माध्यमातुन सर्व आरक्षणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यांत येतील आणि जी मालकी जागा आहे. त्या मालकी जागेबाबत म्युनिसिपल ॲक्टमध्ये जी प्रोव्हीजन असेल त्याप्रमाणे त्यांना टी.डी.आर देणे किंा जो काय मोबदला असेल तो देता येईल. ही नेमणुक आधीच व्हायला पाहिजे होती. ह्या नेमणुकीचे प्रकरण आल्यामुळे त्याच्यामध्ये श्री. मुकुंद मोरे ह्यांच्याबद्दल माहिती दिलेली आहे व अधिकाऱ्याची नेमणूक होणे अतिशय गरजेचे आहे. तसेच अतिशय महत्त्वाकांक्षी आरक्षणे आपल्याला ताब्यात घ्यायची आहे. त्याच्यामध्ये नाट्यगृहे, कार्यालयीन जागा आणि ज्या प्रभाग समित्यांची कार्यालयासाठी जागा आपल्याला ताब्यात घ्यायची आहे. सभापती साहेब आपण ह्या अधिकाऱ्याची सक्षमता पडताळुनच अधिकाऱ्याची नेमणूक करावी.

**धनराज अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब महानगरपालिकेत ए.टी.पी. मध्ये इजिनिअर किती आहेत?

**मा. सभापती :-**

तीन अधिकारी आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

पहिले नगरपालिका असताना एक ए.टी.पी. अधिकारी होते आणि आता तीन ए.टी.पी. अधिकारी झालेले आहेत. ते आपला अधिकार का वापरत नाही. नुसते नकाशे पास करुन बिल्डरला द्यायचे हे अधिकार त्यांना दिलेले आहे काय? जे सार्वजनिक काम आहे ते हे अधिकारी का करत नाही. आता आपण जे अधिकारी नेमणार आहात. तर मला माहिती द्या किती जागा आपल्याला भूसंपादन करायची आहे किती खाजगी आहेत व किती महानगरपालिकेच्या जागा आहेत. आणि त्या अधिकाऱ्यांची कॅपेसिटी किती आहे. तो किती दिवसात तो जागा भूसंपादन करु शकेल. एक अधिकारी ठेवला म्हणजे आपण त्यांना वारंवार वाढ देतो. तसे नाही झाले पाहिजे. कारण आपला बजेट फार कमी आहे. १३५ कोटीचा आहे व आपण नवनविन अधिकारी नेमुन पगार वाढवत राहणार असेल तर शहराच्या विकासाची कामे होणार नाही. मला येथे एकच विचारायचे आहे आपण येथे करारनामा करुन जेवढे भूसंपादन करायचे आहे व पाच महिन्याकरिता ज्या अधिकाऱ्याची नियुक्ती करायची आहे. तर त्याचे काम पाच महिन्यामध्ये झाले पाहिजे असे तुम्ही करारनामा केला पाहिजे. असे करणार आहात ह्याचे आपण आम्हाला उत्तर द्यावे.

**कल्याण केळकर (मा. उप आयुक्त सो.) :-**

सन्मा. श्री.धनराज अग्रवालजी ह्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याप्रमाणे महानगरपालिकेच्या विकास आराखडा मंजुर झाला. आपल्या शहरामध्ये विविध अशी प्रयोजन जी विकास आराखड्यामध्ये नागरिक सुविधाची ज्या जागा संपादन करावयाच्या आहेत. ती प्रक्रिया अतिशय क्लिष्ट अशी प्रक्रिया आहे. आणि सातत्याने जिल्हाधिकारी कार्यालयाशी ह्यांच्याशी संपर्क साधावा लागतो. जे आजच्या स्थितीला दोन नगररचनाकार आणि एक सहाय्यक नगररचनाकार साहेब उपस्थित आहे. अशी तीन पदे महानगरपालिकेत आहे. भूसंपादनाची प्रक्रिया क्लिष्ट असल्यामुळे त्याचे फॉम तयार करणे, नकाशे तयार करणे, ती जिल्हाधिकाऱ्यांपुढे सबमिट करणे ही सर्व प्रकरणे रेव्हेन्युच्या अधिकाऱ्यांना ज्या प्रकारे माहिती असते. ती पद्धत प्रशासकीय अधिकाऱ्यांना समजावून घेण्याकरिता बराच वेळ लागतो आणि ह्या ज्या पद्धती आहेत महाराष्ट्र भूसंपादनाच्या त्या भूसंपादनाची जेवढी प्रकरणे आपल्याकडे आहे. ती प्रकरणे जवळजवळ सर्वांना माहिती आहे. अनेक जागा आपण ताब्यात घेतल्या त्याच्यावर क्रिडांगण उभारले परंतु त्या जागा अद्याप पर्यंत महानगरपालिकेच्या नावावर झालेलले नाही आहेत. काही ठिकाणी झाल्या आहेत. परंतु आपण प्रकरण त्यांच्याकडे बऱ्याच वर्षापासुन पाठवित आहोत. सातत्याने पाठपुरावा करतोय. सर्व माहिती आपण जिल्हाधिकारी कार्यालयाकडे उपलब्ध करून दिली. परंतु आपणाला जिल्हाधिकाऱ्याकडुन जागा ताब्यात मिळालेली नाही. यासाठी सातत्याने संपर्कात राहण्यासाठी भूसंपादनाची सर्व कार्यवाही, पुर्तता करणे एवढीच जबाबदारी ह्या अधिकाऱ्यावर असल्यामुळे आणि

महानगरपालिका अधिनियम १९४९-५३ (२) कलममध्ये अशी प्रोव्हीजन आहे की, विशेष अधिकारी म्हणुन सहा महिन्याकरिता नियुक्ती करु शकतो आणि सहा महिन्यापर्यंत आपण त्यांची प्रगती पाहू व त्यांना आपण इष्टांक ठरवुन दिलेला आहे. त्याप्रमाणे इष्टांकसुद्धा देऊ की ह्यावर्षामध्ये एवढी प्रकरणे आपल्याला माहिती आहे. आपल्याकडे आठवडा बाजार नसल्यामुळे अनेक विविध भागामध्ये भाजी मंडई, मासळी बाजार नाही आहे. यामुळे फेरीवाल्यांचा फार मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे व हा प्रश्न सोडविण्यासाठी भूसंपादन अधिकारी आपण सहा महिन्याच्या प्रतिनियुक्तीवर नियुक्त करण्याचा प्रशासनाचा प्रस्ताव आहे. आणि आपण त्यांना निश्चित असा इष्टांक देऊ धनराजजींनी सांगितल्याप्रमाणे आणि त्या इष्टांकामध्ये त्यांनी काम करावे असे आपण आग्रही विनंती त्यांना करणार. धन्यवाद.

**धनराज अग्रवाल :-**

किती जागा महानगरपालिकेला भूसंपादन करायची आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवालजी ह्यांनी चांगली चर्चा येथे घडवुन आणलेली आहे. शहराचा महत्त्वाचा भाग आहे. ह्या शहरामध्ये अशी बरीच प्रकरणे प्रलंबित आहेत. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीजी ह्यांनी समर्थपणे ह्याठिकाणी बोललेले आहेत. ह्याठिकाणी भाईंदर पूर्व चौपाटी आरक्षण क्र. १६१,१६२,१६३ नाट्य विभागीय कार्यालयीन जागा, भाईंदर पूर्व ते जेसलपार्क घोडबंदर रस्ता, भाईंदर पश्चिम ते स्टेडीयम पर्यंतचा तीस मीटरचा रस्ता, भाईंदर पश्चिम समांतर दहिसर लिंक रस्ता, रॉयल कॉलेज ते एम.आय.डी.सी. तीस मीटरचा रस्ता, आरक्षणातील मार्केटची जागा, भाईंदर पश्चिम चौपाटीची जागा, रेल्वेकडील केबिन व रुंदीकरणाची जागा, तसेच विविध डी.पी. रस्त्यांच्या जागा, शिवार गार्डन विस्तारीकरण करण्याकरिता लागणारी जागा, घोडबंदर किल्ला ताब्यात घेणे, भाईंदर उत्तन रोड पी.डब्ल्यु.डी करुन हस्तांतरित करुन घेणे. आदी बराचशा बाबी, बराचशा गोष्टी आपल्याला ताब्यात घ्यायच्या आहेत. आणि आपण ठरविले आहे की, आपल्या शहरामध्ये ह्याच्यापुढे अशी पॉलिसी घ्यायची आहे की जे रस्ते आहेत जे रस्ते कॉंक्रिट करून घ्यायचे आहे. जर शहराचा विकास करायचा असेल तर रस्ते आपल्याला ताब्यात घेणे फार जरुरीचे आहे. पण रस्ते करायची क्षमता जरी आपण दाखविली तर जागा ताब्यात नसेल तर काही ठिकाणी टि.डी.आर.चा प्रश्न येतो. काही ठिकाणी एफ.एस.आय.चा प्रश्न येतो. काही ठिकाणी तांत्रिक अडचणी आहेत, काही ठिकाणी कायदेशीर अडचणी आहेत. तर ह्या गोष्टी क्लिअर करता आले पाहिजे. मघाशी मा. उपआयुक्त साहेब ह्यांनी उल्लेख केला की रेव्हेन्यु डिपार्टमेंटच्या संदर्भाची माहिती जर आपल्याला असेल तर रेव्हेन्यु डिपार्टमेंटची माहिती असेल तर तो अधिकारी संपूर्ण काम करु शकतो. आणि सहकार्य करू शकतो. हे जे एम.एच.मोरे ह्याठिकाणी आलेले आहेत. त्यांनी रेव्हेन्यु डिपार्टमेंटमध्ये उपजिल्हाधिकारी म्हणुन त्यांनी काम केलेले आहे. आणि आपल्याला अशा पद्धतीच्या ज्या जागा ताब्यात घ्यायच्या असतील तर त्याला वेगळे डिपार्टमेंट आपण ह्याठिकाणी निर्माण केले पाहिजे. कारण मुंबई महानगरपालिकेकडे सुद्धा असे वेगळे डिपार्टमेंट त्यांनी निर्माण केलेले आहे. आणि त्या ठिकाणी सुद्धा एम.एच.मोरे ह्यांनी काम केलेले आहे. तर अशा पद्धतीचे एक स्वतंत्र असे डिपार्टमेंट असायला पाहिजे. आणि ह्याठिकाणी धनराजजी आपण उल्लेख केला की त्यांना इष्टांक देणे जरुरी आहे. आपण फक्त कार्यकारी अधिकारी घेतो. आणि त्यांना आपण जबाबदारी देतो. आणि तो तेवढा काळ काढून घेतल्यानंतर जी कामे व्हायला पाहिजे व जो काय अपेक्षित इष्टांक ठरविला पाहिजे तो याठिकाणी आपण ठरला पाहिजे. अशा पद्धतीची जी कामे महत्त्वाची आहे त्याचा इष्टांक आपण करारामध्ये ठरवून देऊ की आम्हाला अमुक ही रस्ते, रिझरव्हेशनचे गार्डन, शाळेचे असु दे किंवा अन्य जे रिझरव्हेशन आहे ते क्लिअर करता आले पाहिजे. अशा प्रकारचा इष्टांक आपल्याला त्या करारामध्ये करता आला पाहिजे. आणि असा इष्टांक दिल्यामुळे त्या अधिकाऱ्यावर तेवढीच जबाबदारी राहिल आणि तो अधिकारी तेवढ्या जबाबदारीने काम करू शकेल, अशा पद्धतीने मुंबई महानगरपालिकेमध्ये अशाप्रकारचे वेगळे खाते आहे ते ह्याठिकाणी केले जाईल. आणि रेव्हेन्यु खात्याशी माहिती असल्यामुळे जमिनीशी व महसुलीशी संबंध असतो आणि ते जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी ह्यांच्या अखत्यारीमध्ये मोडतो. अशाप्रकारे अधिकाऱ्याची संधी आपल्याकडे चालुन आलेली आहे आणि त्या संधीचा आपण फायदा घेतला पाहिजे. आपण सांगितल्याप्रमाणे इष्टांक त्यांना देऊन येथे चंद्रकांत वैतीजी ह्यांनी जो ठराव मांडलेला आहे मान्य करु.

**रिटा शहा :-**

हा ठराव करायच्या अगोदर सभापती साहेब माझे काही कन्फ्युजन आहे. कारण हा विषय महासभेत देखील झाला होता. तेव्हाही मी बोलली होती जी गव्हरमेंट जागा, कलेक्टरची जागा आहे

किंवा इतर डिपार्टमेंट आहे ती जागा तर आपण हस्तांतरीत करून घेऊ. पण जी मालकी जागा ती आरक्षणामध्ये गेलेली आहे. तेव्हा बोर्ड बनविली होती. आणि नंतर रात्री जाऊन कोणीतरी बोर्ड लावली व मा. महासभेत उत्तर मिळाले ते बोर्ड कोणी जाऊन लावले ते माहित नाही. आपल्या कॉर्पोरेशनचे बोर्ड काढुन कोण कुणाच्या जागेवर जाऊन बोर्ड लावतो. हा मोठा गुन्हा आहे. तेव्हा मला त्याचे काहीच उत्तर मिळाले नाही. ते बोर्ड कोणी लावले ते मला माहित नाहीत ते बोर्ड काढुन फेकुन द्या असे मला बोलले गेले. आरक्षणाच्या नावाखाली अशाप्रकारची गुंडागर्दी आणि आपण आज पाण्याच्या बाबतीत किंचाळतो कारण आपल्या येथील जी लोक आहेत त्यांची स्वतःची जमिन आहे आणि ती आरक्षणाखाली गेलेली आहे. तुम्ही त्यांच्याबरोबर कायदेशीर कार्यवाही करा. पण कायदेशीर कार्यवाही न करता असे रात्रीच गोडाऊनमधुन बोर्ड घेऊन जाऊन लावुन येतो की ही महानगरपालिकेची जागा आहे. अशा प्रकारचे प्रकरण व्हायला नाही पाहिजे. आरक्षणाचे करताना जेवढे भूसंपादनाचे मालक आहेत त्यांना कॉर्पोरेशनमार्फत नोटीसी पाठवुन बोलावुन घ्या. आणि तुम्हाला कुठली जागा पाहिजे ते तुम्ही त्यांच्याशी बोलुन घ्या. आणि मला सांगितले होते की तुम्हाला नाव देणार पण आम्हाला नंतरच्या मा. महासभेत कुठल्याही प्रकारचे नाव देण्यात आलेले नाही. असला प्रकार घडायला नाही पाहिजे. उद्या आपल्या प्रॉपर्टीवर कोणी बोर्ड लावले तर त्याची जबाबदारी कुणाची?

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, आमच्या विभागात बोर्डच लावण्यात आलेले नाही. सभेमध्ये ठराव मंजुर होतो बोर्ड लावायचा आहे.तर त्याची अंमलबजावणी का होत नाही.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, जे आरक्षणाचे सर्वे नंबर वाचून दाखविले त्याच्यामध्ये २३३ सर्वे नंबर आहे. तिथे अकरा एकर जागा आहे तिथे काही संस्थेने मागणी केलेली आहे. माजी स्वातंत्र्य सैनिक आहेत. तिथे जागा आहे ती जागा आपण कुणाला दिली आहे का? तिथे एक रुम बांधण्यात आलेली आहे. ती सरकारी जागा आहे. आणि अजुन तो प्लॉट नगरपालिकेच्या ताब्यात आलेला नाही. आता त्याठिकाणी जो रुम आहे तो रुम कुणाचा आहे. त्याला परवानगी दिलेली आहे का? ह्याचा खुलासा आपण सभागृहामध्ये करून द्यावा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या रिटा शहा ह्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. आणि अशा पद्धतीचे आरक्षणाबाबतीत जे काही प्रश्न निर्माण होणार आहे. भूसंपादन करताना सुद्धा प्रश्न येईल आणि भुसंपादनाचा जर आपला वेगळा विभाग असला तर त्या आरक्षणामध्ये बोर्ड लावणे तसेच ते आरक्षण आपल्याकडे रिलीज करून घेणे. त्या आरक्षणामध्ये काही प्रॉब्लेम असतील ते दूर करणे. अशापद्धतीचे काम आपण भूसंपादन अधिकारी आल्यानंतर त्या खात्याला दिल्यावर आपल्याला सोयीचे जाईल. आणि हे अतिशय महत्त्वाचे आहे. आज आपण शहरामध्ये विकासाची कामे करतोय. सरकारी जागा आहेच आणि खाजगी जागा घेताना आपण त्या पद्धतीचे करस्पॉन्ड् करता आले पाहिजे. त्या पद्धतीची माहिती देता आली पाहिजे. तसा पद्धतीचा तज्ञ अधिकारी आपल्याकडे असला तर आपण तशा पद्धतीचे काम करुन घेऊन आरक्षित असे प्लाट करुन घेऊ शकतो. आणि आरक्षणाची जबाबदारी आपण पार पाडली तर शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातुन आणखीन भर पडेल.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब मी जो आपल्याला मघाशी प्रश्न केला तो आणि दुसरा प्रश्न म्हणजे चौपाटीची जी कामे चालु आहे. आणि पलीकडच्य बाजुला आपल्याला चौपाटी विकसित करायची आहे. त्याठिकाणी एक दिड महिन्यापुर्वी काही प्रकारच्या झोपड्या निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे आपल्याला अडथळे निर्माण होऊ शकते.

**मा. सभापती :-**

ती जबाबदारी त्यांच्यावर येईल. सरकारी जागेवर झोपड्या बांधल्या आहेत. किंवा आरक्षणाचे प्लॉट आहेत त्याच्यामध्ये जर कोणतेही अतिक्रमण झालेले असतील तर आपल्याला हा अधिकारी नेमल्यानंतर वेगळे डिपार्टमेंट झाल्यानंतर आपल्याला काय करायला पाहिजे त्याची सविस्तर माहिती मिळेल.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, आता बंदरवाडीची झोपडपट्टी रेल्वेने त्यांच्या हद्दीमध्ये असल्यामुळे तोडल्या. ती झोपडपट्टी तेथे जाऊन वसली आहे. त्याकरिता आपल्याला चौपाटीचे काम करताना अडथळे येतील. नगरपालिकेने आताच त्याच्यावर दखल घ्यायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

आपल्या सूचनांची नोंद करुन घेतली जाईल.

**अशोक पाटील :-**

आपण आता जो भूसंपादनाचा विषय आणलेला आहे. त्यात सरकारी जागा का खाजगी जागा आरक्षणाखाली असे येणार आहे का? आणि जो नगररचना विभाग आहे त्यांच्या अखत्यारीमध्ये काय काय काम येतात.

**मा. सभापती :-**

मघाशी मी उल्लेख केला की, अशापद्धतीचे मुंबई महानगरपालिकेत जागा भूसंपादन करून घेणे.

**अशोक पाटील :-**

जर समजा सरकारी जागेत आरक्षण असेल जसे उपआयुक्त साहेबांनी उल्लेख केला जर रेव्हेन्यु खात्याचा अधिकारी असेल तर ज्याकाही क्लिष्ट असे भूसंपादन करण्यासाठी प्रोसेस आहेत. ते आपल्या अधिकाऱ्यांना जमत नाही म्हणुन तुम्ही हा खाजगी अधिकारी आपल्याकडे नियुक्त करित आहात. जर आपल्या अधिकाऱ्याला जमत नाही तर शंभर एकर जागा डंपिग ग्राऊंडसाठी कमीशनर साहेबांनी एका महिन्यामध्ये मंजुर करून दाखविली. अशी क्लिष्ट जर प्रोसेस असेल तर शंभर एकर जागा महानगरपालिकेच्या नावावर झालेली आहे. नगररचना विभागाकडे तेवढी क्षमता नाही आहे का?

**मा. सभापती :-**

तुम्हाला माहिती नंतर देतो.

**कल्याण केळकर (मा. उप आयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य श्री. अशोक पाटील साहेब आपण जो मुद्दा मांडला. त्याप्रमाणे जी क्लिष्ट भूसंपादनाची कार्यवाही आहे. खाजगी जागेचे संपादन करण्यासाठी महाराष्ट्र नगररचना अधिनियम १२६ कलमाखाली सहाची नोटीस काढावी लागते. व ती नोटीस काढल्यानंतर जी प्रोसेस आहे ती निश्चित क्लिष्ट स्वरुपाची प्रोसेस आहे. त्याचा सातत्याने पाठपुरावा करावा लागतो आणि जे तुम्ही आता बोललात की मा. आयुक्त साहेबांनी डंपिंग ग्राऊंडसाठी जागा संपादन केली. ह्यापूर्वी आपण नगरपालिका अस्तित्वात असलयापासुन नेताजी सुभाषचंद्र बोस क्रिडांगण असो, चौपाटीची जागा असो, शाळांची जागा असो, किंवा इमारतींची जागा असो याकरिता आपण सातत्याने पाठपुरावा केलेला आहे. ह्यापैकी ह्या ऑफिसची जागा आणि डंपिंग ग्राऊंडची जागा ह्या दोनच जागा एवढा पाठपुरावा करुन आता ताब्यात मिळालेल्या आहेत. तर हा जो अधिकारी नेमण्याकरिता प्रशासनामार्फत ही जी टिपणी गोषवारा आपल्याकडे आलेला आहे. ह्यामध्ये उद्देश हाच आहे की, त्याने सातत्याने पाठपुरावा करावा आणि पाठपुरावा करुन ही जी शासनाची जमिन आणि खाजगी भूसंपादन करावयाच्या जमिनी ह्या दोन्ही स्वतः करुन घ्यायच्या आहेत. ही एकच जबाबदारी त्यांच्यावर राहणार नाही. नगरपालिका शासनाच्या ज्या जमिनी आहेत ते पण त्यांनी ताब्यात मिळविणे आणि खाजगी जमिनी संपादन करावयाची जबाबदारी त्यांची आहे.

**अशोक पाटील :-**

आपल्याकडे नगररचना विभाग आहे. तसेच त्या विभागात नवीन अधिकारी सुद्धा नियुक्त केलेले आहेत. तरी त्याच्या अखत्यारीत ही बाब येत नाही का? सन्मा. सदस्य अग्रवाल साहेबांनी सुद्धा तोच मुद्दा उपस्थित केलेला होता.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य श्री. अशोक पाटील यांनी त्यांची भुमिका ही मांडलेली आहे. तरी त्या भुमिकेशी मी सहमत आहे. नगरपालिका काळापासुन आपल्याकडे एकछत्री कारभार होता. मा. मुख्याधिकारी आणि मा. नगराध्यक्ष हे कारभार सांभाळायचे. तेव्हा त्या नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांचे प्रशासनावर नियंत्रण होते आणि त्या काळात आपण नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाची जागा ताब्यात घेतली. तसेच त्याप्रमाणे नुकत्याच धडाकेबाज मा. आयुक्त आर. डी. शिंदे साहेबांनी त्या जागेबाबत पत्रव्यवहार सुरु केलेले आहेत. प्रयत्न चालू आहेत. तरी आपल्याकडे टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेंट जे आहे त्या ठिकाणी दोन अे.टी.पी. आहेत नविन आता सहाय्यक संचालक नगररचनाकार श्री. शेंडे साहेब

आलेले आहेत जेव्हा ते आले तेव्हा त्यांना सुद्धा हाच विषय केळकर साहेब यांच्या चेंबरमध्ये सांगितला. भूसंपादनाच्या ज्या जागा आरक्षणाच्या आहेत त्या ताब्यात आपल्याला घ्यायच्या आहेत. आणि असे असताना नवीन अधिकारी नियुक्त करणे मला वाटते मागील वर्षापासुन बघतो आहोत की नवीन अधिकारी येत आहेत आणि सुधारणा शहरात मात्र काही झालेली दिसत नाही. आणि टेबल वाढली, गाड्या वाढल्या, कॅबीन वाढल्या. त्यापलीकडे नवीन दुसरे काही झालेले दिसत नाही. आपण नविन अधिकारी नेमून टाऊन प्लानिंग डिपार्टमेंटवर अन्याय करतो का? किंवा जे तीन अधिकारी आहेत त्यांच्यावर आपण अविश्वास व्यक्त करतो का? ते सक्षम नाही का? माझे असे मत आहे. श्री.अशोकजी पाटील आणि धनराजजी अग्रवाल यांच्या भूमिकेशी सहमत आहे. हा निर्णय तुर्त स्थगित ठेवावा. संपुर्ण ह्या विषयाची शहानिशा करून जो अधिकारी नियुक्त करायचा आहे. त्याला आपण प्रत्यक्ष स्थायी समितीच्या समोर बोलवा. त्यांची शैक्षणिक पात्रता, तो काम करायला सक्षम आहे का? कारण ते रिटायर झालेले आहे असे म्हणतात. संपुर्ण सभागृहाच्या समोर आल्यावर आपण निर्णय घ्या. तो पर्यंत आपण निर्णय स्थगित ठेवावा.

**मिलन म्हात्रे :-**

हा जो विषय सभागृहामध्ये आला आहे. तर एक दिड तासाअगोदर मा. महापौरांच्या अभिनंदनाच्या ठरावावरती सन्मा. सदस्य आसिफ शेख ह्यांनी प्रशासनाची फार मोठी स्तुती केली. एक तासा अगोदर आपण एक कमेन्ट करता व थोड्या वेळाने दुसरे कमेन्ट करता हे कॉन्ट्रावन्सी चालले आहे. आणि हा जो विषय आहे तो महत्त्वाचा विषय आहे. ह्याच्यामध्ये जे तेरा पॉईंट आहे त्यात सात प्रस्ताव रस्त्याचे आहे. माझ्या माहितीनुसार अनेक रिझरव्हेशन अशी आहेत त्यात आपल्याला ह्या अधिकाऱ्याची नितांत गरज आहे. आणि आपल्याला कधीतरी हा अधिकारी नेमावा लागणारच आहे. माझ्या वार्डापासुन कामाला सुरुवात होते. आणि आपल्याला अधिकारी कधीतरी नेमावा लागणार आहे. आजच्या परिस्थितीला ज्या ठिकाणीची सुरुवात केली आहे. तिथे सायंकाळी साडेसात ते आठ पुर्वी तिथे बसेस लागायच्या. तिथे रिक्षा स्टँडचे रिझरव्हेशन आहे. पण ना फेरीवाला झोन बनविण्याकरीता काय करतोय तर नाही. आरक्षणाचे जे काम आहे त्यासाठी अधिकारी येणे हे मला फार महत्त्वाचे वाटते. परंतु हा जो १३२ चा विषय आणलेला आहे. ह्यामध्ये आपण कालावधी टाकलेला नाही. तसेच गोषवाऱ्यात वेतनाचा उल्लेख नाही. आणि मला असेही म्हणायचे आहे हा ठराव आणताना ह्याच्यामध्ये नाव नाही, वेतन कालावधीचा उल्लेख नाही. आपण ह्या विषयात ही सर्व नोंद करावी व सभागृहाने जो निर्णय घ्यायचा आहे तो घ्यावा.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य म्हात्रेजी ह्यांनी ह्याठिकाणी आपले विचार मांडले. सभापती साहेब ह्या नात्याने जेवढे गटनेते आहेत. त्यांच्याशी बसुन सविस्तर चर्चा करून नंतर विषय सभागृहासमोर आणले तर अतिशय उत्तम होईल.

**मा. सभापती :-**

आता विषय झालेला आहे. ठराव झालेला आहे. आणि ह्यापुढे असा पॉलिसीचा विषय असेल तर चर्चा घेऊन विषय घेण्यात येईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब आपण रुलिंग देण्याअगोदर मी जो विषय मांडला होता त्याचे उत्तर दयावे.

**मा. सभापती :-**

आपल्या प्रश्नाचे उत्तर आहे त्याची माहिती देण्यात येईल. सभागृहात ते अधिकारी उपस्थित नाही. त्यांना बोलवण्यात आले आहे.

**जोजफ घोन्सालविस :-**

आपले ह्या चर्चेत दिड तास गेले आहे.

**मा. सभापती :-**

सुचक चंद्रकांत वैतीजी व त्याला अनुमोदन मिलन म्हात्रे ह्या विषयाला रुलिंग असे देण्यात येत आहे की, मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ५६ (२) नुसार कार्यवाही करणे कामी रुपये दहा हजार रुपये प्रति महिना ठोक वेतनावर पाच महिन्याकरिता नेमणूक करण्याकरिता ही सभा इष्टांक घेऊन मंजुरी देत आहे.

**रिटा शहा :-**

साहेब आपण ह्या विषयाला मंजुरी देण्याअगोदर मला बोलायचे आहे. चंद्रकांत वैतीजींकडे जी लिस्ट होती तशी लिस्ट आपण एकाही सभासदाला दिलेली नाही. त्यांनी स्वतःच्या बळावर घेतलेली आहे. आपल्याला असे वाटत नाही का सर्व स्थायी समितीच्या सदस्यांना तुम्हाला विश्वासात घ्यायला पाहिजे. आपण ठराव मंजुर करून घेतात. पण आपण आम्हाला विश्वासात घेत नाही ह्याचा अर्थ असा झालेला आहे. ती लिस्ट आपण आम्हाला का दिलेली नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. महोदया ही लिस्ट आपण दिलेली नाही.

**रिटा शहा :-**

आपल्याला अधिकारी नेमायचा आहे. त्याकरिता माझे दुमत नाही. ती लिस्ट का दिलेली नाही.

**मा. सभापती :-**

ती लिस्ट दिलेली नाही. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीजी ह्यांनी स्वतः ती काढली. आणि आपण जे ह्या ठिकाणी म्हणणे मांडले त्याच्याशी मी सहमत आहे. आपल्याला अशी माहिती प्रशासनाकडुन यायला पाहिजे होती. पण जी माहिती वैती साहेबांनी ह्याठिकाणी काढली त्यामाहितीच्या व्यतिरिक्त ही आपली कामे असू शकतील. आणि ह्याच्यापूढे अशी माहितीही आपणापूढे आणण्यात येईल.

**रिटा शहा :-**

साहेब, ती माहिती त्यांनी स्वतःनी काढली असे मी सांगत नाही. ते त्यांच्या हिशोबाने काम करीत असतील. स्थायी समितीचे एवढे सदस्य आहेत आणि तुम्ही आमच्यासमोर हे विषय आणलेले आहे. आणि तुमच्याकडे जेवढी माहिती होती ती आपण आम्हाला दयायला पाहिजे होती.

**मिलन म्हात्रे :-**

कामाची प्रायोरिटी ठरवा आणि त्यानुसार काम करा.

**मा. सभापती :-**

आपण जो मुद्दा ह्याठिकाणी उपस्थित केलेला आहे. ह्याठिकाणी ती यादी वाचून दाखविलेली आहे.

**रिटा शहा :-**

साहेब आपण आम्हाला ही माहिती अगोदर दिली असती तर त्याच्यावर जाबजबाब विचारला असता. आता बोलुन काय फायदा आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. महोदया ह्या माहिती व्यतिरिक्त आपल्याकडे अजून काही माहिती आहे का?

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, नगररचना ह्याला सक्षम आहे का नाही? ह्याचा आपण खुलासा केलेला नाही.

**जोजफ घोन्सालविस :-**

आरक्षणाचे बोर्ड लावायचे ते महासभेत ठरले. व त्याबाबत ठराव झाला आहे. त्याची अंमलबजावणी का झाली नाही?

**धनेगावे :-**

बोर्ड बनविण्यासाठी दिले आहे.

**संजय गोखले :-**

आम्हाला अजुन लिस्ट देण्यात आलेली नाही.

**जोजफ घोन्सालविस :-**

साहेब तुम्ही अधिकारी नेमता आणि जर पहिल्याच ठरावात अंमलबजावणी होत नसेल तर आपण अधिकारी कशाला नेमायचा.

**मा. सभापती :-**

आपण विषय वेगळा बोलताय. आपण अधिकारी नेमल्यानंतर ज्या भूसंपादनाच्या बाबी आहेत. ज्याठिकाणी आपल्याला आरक्षणाचे बोर्ड लावायला पाहिजे, जे रिझरव्हेशन क्लिअर करायला पाहिजे आणि आपण जर हे खाते ह्याठिकाणी वेगळे केले तर नगररचना जे खाते इमारती दुरुस्ती इमारतींना नविन परवाना देणे ही जी कामे आहेत आणि नगररचनाकडुन जी आपली आरक्षणे आहेत ती आरक्षणे आपण भुसंपादन अधिकारी या खात्यामार्फत आपण त्याखात्याकडे माहिती वर्ग केली तर त्या अधिका-यामार्फत त्याचा फॉलअप होत राहील. आणि आपल्याला रिझरव्हेशन क्लीअर करता येतील.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ह्या ठरावाला आमचा विरोध नाही.

**धनराज अग्रवाल :-**

हे मागच्या अधिका-याचे काम नव्हते का? आता आपण अधिकारी नेमणार तेव्हा बोर्ड लागणार. मग आपण हा विषय मा. महासभेपुढे कशाला नेता? आपण अधिका-यांना कार्यरत करत नाही तर मा. महासभेपुढे विषय घेणे यात फायदा काय?

**मा. सभापती :-**

उपायुक्त साहेब असा ठराव झाल्यावर त्या कामाची कार्यवाही का झाली नाही. का कुठे काम बाकी राहिले. आपण त्याची माहिती घ्यावी.

**धनराज अग्रवाल :-**

बोर्ड लावले गेले तर नाही आणि आता बोर्ड लावणार म्हणुन विचारतो.

**मा. सभापती :-**

जे बोर्ड लावले गेले नाही ते बोर्ड लावुन घेऊ असे मी बोललो आणि जे लावले गेले नाही ते बोर्ड लावण्याकरिता आपण बोलतोय. हा विषय वेगळा आहे. भिन्न आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब जे मा. महासभेत ठरले आणि जे जुने अधिकारी होते ते सक्षम नव्हते का? बोर्ड का लावले गेले नाही?

**रिटा शहा :-**

साहेब मी देखील ह्या संदर्भात बोलु इच्छिते. मागच्या वेळेला नाईक साहेब आयुक्त होते व ते डायसवर बसले होते. त्यावेळी मी प्रश्न विचारला होता आपण जे आरक्षणाचे बोर्ड लावणार तर ते बोर्ड लावण्याच्या अगोदर भूसंपादन मालकीची जी जागा आहे. त्याला तुम्ही नोटीस देणार काय? आणि नोटीस देणार तर कुणाच्या नावावर देणार? कारण आपल्याकडे अशी प्रॉब्लेम आहे. आपण येथले भुमीपुत्र आहोत. आपल्याला माहिती आहे येथे जेवढी मालकीची जागा आहे त्याच्यावर सातबा-यावर किती वाद आहे. तेव्हा हा विषय रेंगाळत पडला होता की आपण ह्या विषयानंतर चर्चा करु अशी रुलिंग झाली होती. आपण नंतर ती रुलिंग बघा. तेव्हा मी प्रश्न विचारला होता कुठल्या मालकाला तुम्ही नोटीस पाठवणार. तेव्हा असे रुलिंग आले होते सातबारा उता-यामध्ये आपल्याकडे जेवढे रिझरव्हेशन प्लॉट आहेत मालकीचे ते आपण सातबारा तलाठ्याकडुन काढु व ज्याच्यानावावर जमीन आहे त्यांच्या नावावर आपण नोटीस पाठवु. तेव्हा अशी हरकत आली होती. सातबा-यावर नाव दुस-याचे आणि मालिक त्याचे वेगळे असे ही झाले होते. हे सर्व एकत्रिकरण करुन आपण त्याचा रिझल्ट आणू या. आणि त्यानंतर आपण काय करायचे नोटीस पाठवु, नंतर बोर्ड लावु असे आपण ठरविले होते. डायरेक्ट जाऊन बोर्ड लावुच शकत नाही अशी दादागिरी आपण करु शकत नाही. आपण पद्धतशीर आणि कायदेशीर जायला पाहिजे. असे ठरले होते की सातबारे काढु वर कुणाचे नाव आहे आणि खरा मालिक कोण आहे ते काढु व त्यानंतर बोर्ड लावु असे ठरले होते.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवालजी आणि सन्मा. सदस्या रिटा शहा ह्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे प्रशासनाने उत्तर द्यावे.

**कल्याण केळेकर (मा. उप आयुक्त सोा.) :-**

सन्मा. नगरसेवक श्री.धनराज अग्रवाल आणि रिटा शहा आणि सर्व नगरसेवकांनी जो मुद्दा उपस्थित केला. अशा त-हेचा ठराव पूर्वी मा. महासभेने केलेला आहे आणि ह्या ठरावावर निविदा प्रसिद्ध झाल्याची माहिती मला प्राप्त झाली. आणि ज्या ठिकाणी अशा त-हेचे बोर्ड लावणे शक्य आहे कारण की, रिटा शहा मॅडमने जो मुद्दा उपस्थित केला तो महत्त्वाचा मुद्दा आहे. जर कोणाच्या खाजगी जागेमध्ये आपण बोर्ड लावायला गेलो तर तो गृहस्थ आपल्याशी भांडण करेल आणि हा वाद निर्माण होणार आणि ह्या सर्व बाबींची शहानिशा करून ज्या जागा शासकीय जागा आहेत. ज्या जागा नगरपालिकेच्या ताब्यात आहेत. किंवा ज्या जागेवर बोर्ड लावणे शक्य आहे. त्या ठिकाणी येत्या पंधरा दिवसाच्या आत बोर्ड लावण्याची कार्यवाही केली जाईल. अशा संदर्भाचे आदेश मी आजच्या आज संबंधित विभागांना निर्गमित करतो आणि ज्या जागेवर बोर्ड लावणे शक्य आहे तिथे बोर्ड लावण्यात येईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, माझा प्रश्न असा होता की, त्या जागेवर बोर्ड का लावले नाही.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, केळकर साहेबांनी आता उत्तर दिले म्हणजे आपण आता काय सांगितले टेंडर काढले आहे तर कशाचे टेंडर काढले आहेत. नगरविकास खात्याने जर त्यांना दिलेच नसेल की, किती जागा आहेत आणि कुठे कुठे बोर्ड लावायचे आहे तर त्यांनी टेंडर कशाचे काढले आहे. हेच मला समजत नाही. येथे चुकीची माहिती काहीतरी चाललेी आहे.

**मा. सभापती :-**

ह्या ठिकाणी सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला ह्याची माहिती सभागृहापुढे आली नाही ती माहिती आपल्याला पुढच्या सभेत दिली जाईल. नुसती उत्तरे देऊन समाधान होणार नाही. वस्तुस्थितीमध्ये जे टेंडर काढले ते कोणत्या कामासाठी काढले. आरक्षणाच्या जागेवर बोर्ड लावण्यासाठी काढले का? आणि त्याची कार्यवाही झाली का नाही झाली आणि त्यात प्रशासनाकडुन कोणती अडचण निर्माण झाली. प्रशासनाने ती माहिती घेऊन पुढच्या सभेत उत्तर दयावे.

**धनराज अग्रवाल :-**

गोखले साहेबांनी काय उत्तर दिले की, मला लिस्ट देण्यात आलेली नाही. तर नगररचना विभागाचे कामच नाही का काय? की नुसते इमारतींना परवाना दयायचे तेवढेच काम आहे का? मा. महासभेमध्ये झालेल्या कामाची पूर्तता का होत नाही.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब सर्वे नं. २३३ सरकारी जमीन आहे ती अजुन ताब्यात आलेली नाही. आणि तशी मागणी केलेली आहे. ती जागा कुठल्या संस्थेला दिलेली आहे का? भरपूर संस्थेने त्याठिकाणी आपआपल्या परीने मागणी केलेली आहे. तर ती जागा कुठल्या संस्थेला दिली आहे किंवा नाही दिली आहे. तिथे एक स्ट्रक्चर आहे दहा बाय वीसचे पत्रा वगैरे टाकलेले शेड आहे. मग अशाप्रकारे कुणाला परवानगी दिलेली आहे का? ते कुणाचे आहे काय आहे. ह्याची खातरजमा केली आहे का? कारण ती जागा अजुन आपल्या ताब्यात आलेली नाही. त्याची माहिती आपण ह्याठिकाणी सभागृहाला दया. आणि अशी दिशाभुल करून सरकारी जागेत जर कोणी बांधकाम करत असेल तर नगररचना विभागाने लक्ष दिले पाहिजे. आपण ह्याचा खुलासा सभागृहा समोर करावा.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, ए.टी.पी. डिपार्टमेंट काम करते किंवा नाही. जे मा. महासभेत ठरले त्याची काय पुर्तता होते किंवा नाही याचे मला जरा उत्तर द्या.

**मा. सभापती :-**

आपण बोलल्यानंतर प्रशासनाशी संपर्क साधला. त्यांचे असे म्हणणे आहे की संपूर्ण माहिती घेऊन पुढच्या सभेत सभागृहाला सविस्तर अशी माहिती देण्यात येईल. आपला ठराव झालेला आहे. आरक्षणामध्ये बोर्ड लावलेले नाही आहे. ते लावण्याकरिता आपण ठराव केलेला आहे. तत्कालीन आयुक्त नाईक साहेब त्यावेळी होते. ठरावाची अंमलबजावणी का झाली नाही ह्यावर सर्व सदस्यांची चर्चा झालेली आहे. तर त्याची आज सभा घेऊन सन्मा. सदस्यांना पुढच्या सभेत उत्तर द्यावे आणि नलावडे साहेब ह्यांनी जे सांगितले त्याची माहिती घेऊन पुढच्या सभेत आपल्याला सांगितले जाईल.

**रिटा शहा :-**

सभापती साहेब, नलावडेजींना तुम्ही सांगितले की माहिती घेऊन पुढच्या सभेत उत्तर देतो. ते आपण दयावे. पण मला सांगायचे आहे की ती जी जागा आहे सर्वे नं.२३३ ती सरकारी जागा आहे. आणि तिथे खरोखर इललिगल बांधकाम झालेले आहे. महानगरपालिकेने अशी परवानगी कुणाला दिलेली नाही. तर ते तातडीने बांधकाम तोडा. असे अध्यक्ष या नात्याने तुम्ही रुलिंग दया.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब आपण जी पुढच्या सभेत माहिती देणार ती शून्य तासात घेणार का सभा संपल्यावर कसे घेणार?

**मा. सभापती :-**

सभा संपल्यावर माहिती देण्यात येईल. ए.टी.पी. डिपार्टमेंट आणि अतिक्रमण विभाग ह्यांना ह्याठिकाणी मी अशी रूलिंग देत आहे की, सर्वे नं.२३३ मध्ये जर कोणतीही पूर्व परवानगी घेतली नसेल.

त्याची माहिती आपण काढावी आणि माहिती काढल्यानंतर ते बेकायदेशीर बांधकाम आहे असे आपल्या निर्दशनास आले तर आपण त्याच्यावर तोडण्याची कार्यवाही करावी.

**प्रकरण क्र. १३२ :-**

भूसंपादन करणेकामी अधिकारी नेमणेबाबत.

**ठराव क्र. ११४ :-**

imara1Baa[-Mdr mahanagarpailaka xao~acaI ivakasa yaaojanaa maMjaUr JaalaI Asauna ivakasa yaaojanaotIla AarxaNao ivakisat krNaosaazI¸ AarxaNaaKalaIla jaagaa mahanagarpailakocyaa tabyaat AsaNao AavaSyak Aaho. AarxaNaaKalaIla jaagaa SaasakIya va KajagaI sva$pacyaa Asatat. sadrcyaa SaasakIya jaagaa tabyaat GaoNyaasaazI Saasanaacaa p`stava saadr k$na ivahIt pQdtInao jaagaa tabyaat GaoNao AavaSyak Aaho. tsaoca KajagaI jaagaa tabyaat GaoNyaasaazI BausaMpadnaÀkraranaoÀ ivakasa h@k p`maaNap~vdaro tabyaat GaoNyaacaI kaya-vaahI kravaI laagato. saQyaa mahanagarpailakocyaa Aasqaapnaovar BausaMpadna AiQakarI pd maMjaUr naahI va pd maMjaUrI haoNaosa ivalaMba laagaola va saQyaa mahanagarpailakokDo taMi~k kma-caarI vaga- Apura Asalyaanao SaasakIya jaagaa tabyaat GaoNao¸ AarxaNaaKalaIla jaagaocao BausaMpadna krNao va ivakasa h@k p`maaNap~ do}na jaagaa tabyaat GaoNao [. kaya-vaahI krNyaasaazI kM~aTIpQdtInao mahsaula ivaBaagaacao inavaR<a AiQakarI samanvaya AiQakarI mhNauna inayau@t kolyaasa AarxaNaaKalaIla jaagaa tabyaat GaoNyaacao kaya-vaahIsa gatI yao} Sakola. sababa zaok vaotnaavar AnauBavaI AiQakarI inayau@t kolyaasa mahanagarpailakokDuna SaasakIya stravar p`krNaacaa pazpuravaa tsaoca ivakasa h@k p`maaNap~asaazI kagadp~aMcaI put-ta k$na GaoNao¸ maaojaNaI k$na GaoNao va sava- ivaBaagaaSaI samanvaya zovaNao [. kamao krNyaakrIta mahsaUla ivaBaagaatIla inavaR<a AiQakarI naomalyaasa kamaaMcaa pazpuravaa krta yao[-la. krIta mahanagarpailakokDo mahsaUla ivaBaagaatIla EaI. ema.eca. maaoro ]pijalhaiQakarI 3inavaR<a´ yaaMnaI id.16.04.2003 raojaI hMgaamaI sva$pat naaokrI imaLNaobaabat Aja- kolaolaa Aaho. trI %yaaMcaa mahsaUla ivaBaagaatIla AnauBava laxaat Gaota BaUsaMpadnaacao kamakaja phaNao kamaI mauMba[- p`aMitk AiQainayama 1949 klama 5333´nausaar kaya-vaahI krNao kamaI $. 10¸000À1 p`it maihnaa maanaQanaavar paca maihnyaa krIta naomaNaUk krNyaasa maMjaUrI doNyaat yaot Aaho.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. सभापती,**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३३ चे वाचन केले.)

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब नगरपालिकेचे रोस्टर मंजुर झालेले आहे का?

**मा. सभापती :-**

नगरपालिकेचे रोस्टर मंजुर व्हायचे आहे आणि त्या रोस्टरचा बॅकलॉग भरला गेला तो रोस्टरला अनुसरुन भरला गेला.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, आपल्याकडे पंचवीस पदे इंजिनिअरची मंजुर आहेत. आणि ती सर्व पदे आपण डायरेक्ट भरायला पाहीजे. २५% ते आपले कर्मचारी आहेत म्हणुन पदे भरायला पाहिजे होती असे आपले ठरले होते. आमचा विरोध आहे की एवढी पदे आपल्याला आता भरायची जरुरत आहे का? तुम्हाला किती पदे भरायची आहेत. सर्व पदे भरायची नसतील जर चार पाच पदेच भरायची असतील तर २५% नगरपालिकेचे अधिकार आहे. सेवाज्येष्ठतेप्रमाणे ती पदे भरु शकतो. जे नगरपालिकेचे अधिकार आहेत ते आपण का घालवायचे? आणि सर्वांची डायरेक्ट भर्ती का करुन घ्यायची तरी याबाबत मला सविस्तर माहिती व्हावी.

**गोविंद परब :-**

साहेब, १९८७ साली प्रथम दोन कनिष्ठ अभियंताची पदे मंजुर झाली. त्यानंतर दोन पदे १९९७ साली आणि दोन सहाय्यक बिल्डिंग इन्स्पेक्टरची पदे मंजुर झाली. २००३ साली २१ पदे कनिष्ठ अभियंत्याची मंजुर झाली होती अशी २५ पदे मंजुरी झालेली आहेत आणि ज्यावेळी १९८७ साली दोन पदे मंजुर झाली त्यावेळी रोस्टर १९९४ च्या प्रथम तपासले. त्यावेळी नगरपालिकेत पदोन्नती देण्याबाबत दोन पदांपैकी एक पद पदोन्नती म्हणजे २५% पदे पदोन्नतीचा आणि ७५% सरळ सेवा आणि १९८७ पासून आजपर्यंत ते कनिष्ठ अभियंत्याचे पद रिक्तच आहे. तसेच जर आपण २१ कनिष्ठ अभियंता १२ मे २००३ ला मंजुर झाले आहे. त्याच्यात जर तसेच ठेवले तर सहा पदे होतात आणि नगरपालिकेत दोनच पदे असल्यामुळे ह्या पदाचा उमेदवार उपलब्ध होणे भविष्यात शक्य नाही. ही पदे जर त्याच रोस्टर प्रमाणे ठेवली तर ही जी २५% व ७५% ठेवली तर २५% पदोन्नतीसाठी तर ती उपलब्ध नाही आणि ती पदे तशीच रिकामी राहणार आहे आणि आता दुसरा मुद्दा असा आहे की, ती पदे नगरपालिकेने किती भरावी २५ पदे भरावी की कमी भरावी ते प्रशासनाने ठरवावे.

**धनराज अग्रवाल :-**

प्रत्येक खात्यामध्ये किती पाहिजे आपण त्याची आम्हाला माहिती दयावी. व महानगरपालिकेत किती पदे आहेत.

**कल्याण केळकर (मा. उप आयुक्त सो.) :-**

सन्मा. नगरसेवक श्री.धनराजजी अग्रवाल आपण सांगितल्याप्रमाणे नगरपालिकेकडे एकूण २५ पदे मंजुर झालेली आहे. आपणाला जी पदे भरावयाची आहे ती खालील प्रमाणे भरावयाची आहेत. बांधकाम विभाग-स्थापत्य अभियंताची पदे भरावयाची आहेत एकूण-९, विद्युत अभियंता-१ पद, कनिष्ठ यांत्रिकी पदे-१ (मॅकेनिकल इंजिनिअर), पाणीपुरवठा विभाग-कनिष्ठ अभियंता स्थापत्य एकुण ५ पदे भरायची आहेत. अतिक्रमण विभाग, कनिष्ठ अभियंता स्थापत्य एकूण ५ पदे भरायची आहेत. नगररचना विभाग कनिष्ठ अभियंता स्थापत्य २ पदे भरायची आहेत. अशी एकुण २३ पदे भरायची आहेत आणि त्या २५ पदांपैकी प्रामुख्याने रोस्टरची पदे १० भरावयाची आहेत ती तात्काळ पदे भरावी लागतील आणि ही पदे भरताना आपण जी शंका उपस्थित केली. त्याप्रमाणे आपल्याला पुढील मा. महासभेची मंजुरी करता ठराव करावा लागेल.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब १० पदे भरायची आहेत. पण आपण येथे १७ पदे भरत आहात. मग आपला अधिकार आपण का डावलताहेत ह्याच्यावर. आपल्या अधिकाऱ्यामध्ये आपण घेऊ शकतो. आपले जे दुसरे जुने कर्मचारी आहेत त्यांना आपण ह्या पदावर घेऊ शकतो.

**दिपक खांबीत :-**

साहेब, कनिष्ठ अभियंत्याचे खाली दुसरे कोणतेच पद नाही.

**धनराज अग्रवाल :-**

नगरपालिकेचे दुसरे कर्मचारी आहेत. त्यांना आपण ह्या पदावर घेऊ शकतो का?

**दिपक खांबित :-**

साहेब, शिपाईचा क्लार्क होऊ शकतो. पण लिपीकांचा इंजिनिअर होऊ शकत नाही. आणि ३१ सप्टेंबर, २००३ पर्यंत रोस्टर भरायचे आहे.

**धनराज अग्रवाल :-**

पदे भरायची आहेत पण एवढा बजेट आहे का?

**मा. सभापती :-**

जेव्हा ज्युनिअर इंजिनिअर असतात. तेव्हा त्याला खालून कोणतेही पद नाही आहे. आणि ज्युनिअर इंजिनिअरच्या खाली आपल्याकडे दुसरे कोणतेही पद नाही का ज्याला आपण प्रमोशन देऊ. एखादा अधिकारी असतो त्याला आपण प्रमोशन देतो. पण ज्युनिअर इंजिनिअरच्या खाली दुसरी कोणतीही पोस्ट नाहीच आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सो.) :-**

महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविला. त्यावेळी ५०% डेप्युटीशनवर आणि ५०% महापालिकेने पद भरावी असे पत्र पाठविण्यात आले होते. जी पदे मंजुर होऊन आली त्यात महानगरपालिकेत जे कर्मचारी उपलब्ध आहेत त्यांना आपण पदोन्नती देऊ. मात्र ज्युनिअर इंजिनिअरपेक्षा खालचे पद कोणतेही नाही. आता आपल्या नगरपालिकेच्या स्थापनेपासून दोनच ज्युनिअर इंजिनिअरची पदे आहेत त्यांना तर पदोन्नती देण्याचा प्रश्न येणार नाही. आणि जी पदे भरायची आहेत. ती पदे नाही भरायची असे ठरविले तर ती पदे रिकामी ठरणार व ते लॅप्स होतील. २५% पदे रद्द होणार आहे व शासनाच्या मान्यतेप्रमाणे आपण मान्यता दयायची आहे. १००% भरती करायला पाहिजे. पण किती भरती करायची म्हणून हा विषय सन्मा. सदस्य आपल्यासमोर आला आहे.

**मा. सभापती :-**

महानगरपालिकेमध्ये असा इंजिनिअर नाही. आणि शेवटी पदे मंजुर करुन घेण्यासाठी महानगरपालिकेला किती फेऱ्या माराव्या लागतात ते आपल्याला माहित आहे. आणि जी पदे मंजुर आहेत ती पदे भरली नाही तर ती लॅप्स झाली तर आपल्याला पुन्हा मंजूरी करिता वेळ जाईल. कनिष्ठ अभियंत्याच्या खालची कॅटेगरी असे कोणतेही अधिकारी ह्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नाही आहे. व असा अधिकारी निर्माण झाला आणि त्याला आपण डावलतोय असेही नाही. म्हणुन जी १००% पद मंजुर झालेली आहेत ती पदे आपण लॅप्स न करता ती पदे सरळसेवा भरतीमधून भरुन घ्यायची आहेत.

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. १३३ महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता या पदाचे संवर्गास मंजुरी देणे. ह्या विषयाला ही सभा मंजुरी देत आहे असे मी ठराव मांडत आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १३३ :-**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता या पदाचे संवर्गास मंजुरी देणे.

**ठराव क्र. ११५ :-**

mahanagarpailakocyaa Aasqaapnaovar sana 1987 pasauna daona kinaYz AiBayaMta caI pdo maMjaUr Asauna pOkI ek paNaI purvaza va ek saava-jainak baaMQakama ivaBaagaat maMjaUr Aahot. tsaoca id.19.05.97 raojaI daona sahayyak tqaa ibalDIMga [nspo@Tr hI pdo nagar rcanaa ivaBaagaasaazI maMjaUr Asauna id.11.05.2003 cao AadoSaanvayao 21 kinaYz AiBayaMta hI pdo maMjaUr JaalaolaI Aahot. varIla p`maaNao ekUNa 25 pdo ivaivaQa ivaBaagaasa maMjaUr Aahot. %yaacaI SaOxaNaIk pa~ta va vaotnaEaoNaI samaana Asauna pdacao kamaacao sva$p javaL javaL saarKoca Aaho. %yaamauLo sadr ir@t pdo mahanagarpailakosa Baravaayacal Jaalyaasa

mahanagarpailakosa AavaSyak SaOxaNaIk pa~ta va AnauBavaa p`maaNao sarL saovat maagaNaI k$na Ba$ Sakto. prMtU yaa pUvaI- ibaMdU naamaavalaI tpasaNaI cao vaoLI baaMQakama ivaBaaga va paNaI purvaza ivaBaagaat p`%yaokI ek ASaI daona kinaYz AiBayaMta pdo 1987 pasauna maMjaUr haotI. %yaa daona pdacaI ibaMdU naamaavalaI AVavat tpasaUna Gaoto vaoLI t%kailana nagarpalaIkot maMjaUr kinaYz AiBayaMta caI pdo 75‰ sarL saovat va 25‰ pdaonnatI pdo BarNyaacao p`maaNa zrvaUna tpasauna GaotlaI haotI. %yaa p`maaNao daona maMjaUr kinaYz AiBayaMtaMcyaa pdapOkI ek pd sarLsaovaosaazI va ek pd pdaonnatIsaazI zovalao haoto. prMtU saQyaa mahanagarpailakot ekUNa kinaYz AiBayaM%yaaMcaI 23 pdo maMjaUr Asauna pUvaI-p`maaNao jar 25‰ pdo pdaonnatIsaazI zovaNyaat AalaI tr 6 pdo yaotat tr 75‰ p`maaNao sarLsaovaosaazI 17 pdo yaotat prMtU kinaYz AiBayaMta yaa taMi~k pdavar pdaonnatInao kma-caarI vagaa-tuna ]maodvaar imaLNao AaSa@ya gaaoYT Aaho va %yaamauLo sadr pdo hI kma-caarI na imaLalyaanao vaYaa-nauvaYao- ir@t rahNaar va pdo ir@t raihlyaamauLo maMjaUr pdo Asatanaa sauQda mahanagarpaialaka Ba$ SakrNaar naahI¸ va hI pdo na Barlyaanao mahanagarpailakot kama krNyaasa taMi~k kma-caarI vaga- Apura pDNaar Aaho.

trI varIlap`maaNao vastuisqatI phata maMjaUr kinaYz AiBayaMta yaaMcaI ekuNa 21†2Ä23 pdo ek~ savaMga- tyaar k$na tI sava- pdo sarLsaovaonao BarNyaat yaavaIt va pUvaI- jao sarL saovaosaazI 75‰ va pdaonnatIsaazI 25‰ Asao jao p`maaNa zrivaNyaaMt Aalao to pdaonnatIsaazI BaivaYyaat taMi~k ]maodvaar imaLNao ASa@ya Asalyaanao pdaonnatIcao 25‰ p`maaNa r_ k$na %yaaeovajaI 100‰ p`maaNa sarLsaovaa BartInao zovaNao ]caIt hao}na AnaUSaoYaaM p`maaNao pdo sauQda %varIt Ba$na kaZNao saaoyaIcao hao[-la va pdo BarlyaamauLo p`Saasanaasa dOnaidna kamaacaa inapTara krNao saaoyaIcao haoNaar Aaho.

mahanagarpailakocyaa AasqaapnaovarIla sahayyak tqaa ibalDIMga [nsapo@Tr hyaa pdacaI ibaMdU naamaavalaI yaa pUvaI-ca maMjaUr Asalyaanao f@t kinaYz AiBayaaM%yaacyaa 23 pdacaI ibaMdU naamaavalaI tyaar kravayaacaI Aaho.

mahanagarpailakocyaa Aasqaapnaovar kinaYz AiBayaM%yaacaI pdo %yaa SaOxaNaIk pa~tocao ]maodvaar nasalyaanao pdaonnatInao Barta yaoNaar naahIt. %yaamauLo kinaYz AiBayaM%yaaMcaI ekuNa 23 pdo 100‰ sarLsaovaonao BarNyaakrIta ibaMdU naamaavalaI p`maaNaIt k$na GaoNyaasa maMjaUrI doNyaat yaot Aaho. sadr kinaYz AiBayaM%yaaMcaI pdo saava-jainak baaMQakama ivaBaaga¸ Saasana pirp~k

ËmaaMk AarTIAarÀ1089À1183ÀAasqaapnaa 1 2¸ id.1 jaanaovaarI 1998 va pirp~k ËmaaMk saop`ina 1097À237À Aasqaapnaa 1 2¸ id.16 iDsaoMbar 1998 naUsaar …

75‰ kinaYz AiBayaMta pdo sqaap%ya AiBayaaMi~kI maQaIla pdivaka va itcyaaSaI samatulya mhNaUna

maanyata imaLalaolaI pdivaka

25‰ kinaYz AiBayaMta pdo sqaap%ya AiBayaaMi~kI maQaIla pdiva ikMvaa itcyaaSaI samatulya mhNaUna

maanyata imaLalaolaI pdvaI.

yaap`maaNao BarNyaat yaavaIt.

kinaYz AiBayaM%yaacyaa 23 pdaMcaI ibaMdU naamaavalaI KalaIla p`maaNao yaot Aaho.

| A.Ë. | vagaa-naUsaar Aarixat pdo | AavaSyak pdo | Barlaolal pdo | AnauSaoYa | sqaap%ya AiBayaMi~kI | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | pdiva | pdivaka |
| 1 | Anausauicat jaatI 38´ | 2 | 1 | 1 | 1 | 2 |
| 2 | Anausauicat jamaatI 322´ | 5 | 1 | 5 | 2 | 3 |
| 3 | ivamaU@t jaatI 3A´ 33´ | 2 | 1 | 1 | 1 | 1 |
| 4 | BaT@yaa jamaatI 3ba´ 32.5´ | | | | | |
| 5 | BaT@yaa jamaatI 3k´ 33.5´ | | | | | |
| 6 | BaT@yaa jamaatI 3D´ 32´ | | | | | |
| 7 | ivaSaoYa maagaasa p`vaga- 32´ | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 8 | [tr maagaasa vaga- 39´ | 2 | 1 | 2 | 1 | 2 |
| 9 | sava-saaQaarNa 348´ | 11 | 1 | 11 | 3 | 8 |

varIla p`maaNao ibaMdU naamaavalaI maMjaUr k$na AarxaNaatIla pdo tatDInao BarNyaat yaavaIt sava-saaQaarNa pdo sauQda Saasana inaNa-yaanaUsaarca BarNyaat yaavaIt. tsaoca kinaYz AiBayaMta pdo mahanagarpailakot ivaBaagavaar KalaIla p`maaNao zovaNyaat yaavaI.

saava-jainak baaMQakama ivaBaga

kinaYz AiBayaMta ³sqaap%ya´ : 09
kinaYz AiBayaMta ³ivadyaut´ : 01
kinaYz AiBayaMta ³yaaMi~kI´ : 01

paNaIpUrvaza ivaBaaga

kinaYz AiBayaMta ³sqaap%ya´ : 05

AitËmaNa ivaBaaga

kinaYz AiBayaMta ³sqaap%ya´ : 05

nagarrcanaa ivaBaaga

kinaYz AiBayaMta ³sqaap%ya´ : 02

varIla p`maaNao AarxaNa ibaMdU naamaavalaI va Saasana pirp~k id.01.01.98¸ id.16.12.98 p`maaNao pdiva va pdivaka Qaark sqaap%ya AiBayaaMi~kI yaadItIla AiBayaMto¸ maMjaUr pdo BarNyaasa maanyata doNaoMt yaot Aaho.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३४ चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

सदरच्या विषयावर मला असे बोलायचे आहे की, ज्या ग्रामपंचायत काळापासुन ज्या जलवाहिन्या आहेत सिमेंटच्या त्या नादुरुस्त आहे व त्याची मोठ्या प्रमाणावर तक्रार येत आहे. आपण त्या नविन जलवाहिन्या शिफ्ट करताना जे चार्जेस घेतात ते चार्जेस घेऊ नका. आपण ह्या पाईप लाईन मधून त्या पाईप लाईनमध्ये चेंज करतो. त्याकरिता आपण चार्जेस घेऊ नका.

**मा. सभापती :-**

बोरींग चार्जेस आपण घेतो का?

**आसिफ शेख :-**

कुठलाही चार्जेस घेऊ नका.

**शरद पाटील :-**

पाचशे रुपये घ्या.

**आसिफ शेख :-**

सन्मा. अभियंता पाणीपुरवठा विभागाला शिफ्टींग चार्जेस घ्यायचे असे आपण नोटीस पाठवून घ्या.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब आपण आता जो निर्णय घेतला आहे. ह्याची अंमलबजावणी केव्हा होणार आहे.

**मा. सभापती :-**

आजपासून.

**दिनेश नलावडे :-**

ज्या लोकांनी पैसे भरले आहे त्यांचे पैसे आपल्याला परत दयावे लागतील.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सो.) :-**

ज्या दिवसापासुन ठराव होतो. त्या दिवसापासून ठराव लागू होतो.

**दिनेश नलावडे :-**

आमच्या वार्डातील लोकांनी आम्ही सांगितले तुम्हाला रक्कम ही अदा करावीच लागेल. आणि सहाशे कनेक्शन शिफ्ट केले आहे.

**शरद पाटील :-**

जे कनेक्शन शिफ्ट केले आहे त्याचा प्रश्नच राहत नाही.

**मा. सभापती :-**

ज्या जुन्या सिमेंटच्या पाईप लाईन आहेत आणि ज्या लाईनवर कनेक्शन शिफ्ट केले आहे. त्या कनेक्शनवर चार्ज लावत आहे.

**दिनेश नलावडे :-**

ज्या नविन पाईप लाईन बंद होत्या. त्या शिफ्टींग करताहेत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सो.) :-**

त्याला ट्रान्सफर कनेक्शन म्हणता येणार नाही. कनेक्शन ट्रान्सफर म्हणजे कमी व्यासाची पाईप लाईन होती आणि मोठ्या व्यासाची पाईप लाईन टाकली. आणि ट्रान्सफरचे जे चार्जेस आहे ते भरायला पाहिजे. नविन नळ कनेक्शन घेण्यासाठी मिरा भाईंदर शहरामधील लोकांनी पन्नास पन्नास हजार रुपये भरले आहेत आणि ते ट्रान्सफर कनेक्शन पाच हजार रुपये भरु शकत नाही का?

**दिनेश नलावडे :-**

विषय काय आलेला आहे.

**मा. सभापती :-**

सिमेंटच्या पाईप लाईन बद्दल आहे.

**दिनेश नलावडे :-**

सिमेंटचे पाईप लाईन असे दिलेले नाही.

**शरद पाटील :-**

पण महानगरपालिकेची पाईप लाईन कोण बंद करतोय.

**शिवमुर्ती नाईक (मा. उप आयुक्त सो.) :-**

आतापर्यंत ज्यांचे ज्यांचे कनेक्शन बंद केले. त्यांच्याकडुन पाच पाच हजार रुपये घेऊन पाईप लाईन ट्रान्सफर करतो.

**आसिफ शेख :-**

नागरिकांनी मागणी केली की तुम्ही आम्हाला रक्कम कमी करुन दया.

**दिनेश नलावडे :-**

आता जे आपण पाचशे रुपये आकारणी करणार आहोत ते शिफ्टींगसाठी का?

**मा. सभापती :-**

शिफ्टींगसाठी नाही. जी जुनी सिमेंटची लाईन आहे त्याच्यामध्ये घाण येते. म्हणून बिडाची पाईप लाईन टाकायची आहे. म्हणजे जशी सिमेंटची पाईप लाईन बदली करुन त्या कनेक्शनचे फक्त पाचशे रुपये घेतले जाईल. तसेच एक किंवा अन्य ठिकाणी जर का आपण रस्ता खोदला तर असे नाही की आपण कनेक्शनला मंजुरी दिली तर खड्ड्याचे चार्ज आणि रस्त्याचे चार्ज असे लावावे. त्या व्यतिरिक्त सिमेंटच्या पाईप लाईन बदलून बिडाची पाईप लाईन टाकतो त्याचे चार्ज लावावे.

**दिनेश नलावडे :-**

ती लाईन ज्या पद्धतीने पहिले चालु होती ती त्याच पद्धतीने चालू राहणार आहे का?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य जर ती लाईन बिडाची असेल तर ती लाईन चेंज होणार नाही. पण ती लाईन सिमेंटची असेल तर ती आपल्याला काढून टाकायची आहे.

**दशोरे :-**

ही जी जुनी सिमेंटची पाईप लाईन आहे आणि सपोझ ए.सी. लाईन आणि हे पूर्णपणे महानगरपालिका बंद करणार आहे. आणि नवीन पाईप लाईन टाकून देणार आहे. सपोझ पन्नास कनेक्शन आहे आणि ते शिफ्टींग आहे त्याच्या करिता हे प्रपोझल आणलेले आहे. तसेच जे इंडिव्ह्युजल आहे आणि समजा तक्रार आली की, आम्हाला पाणी येत नाही आणि आम्हाला शिफ्टींग करून पाहिजे, त्याच्यासाठी आम्ही पूर्णपणे चार्ज घेणार.

**दिनेश नलावडे :-**

शिफ्टींगला जे नियम आहेत तेच नियम चालु राहणार आहे का?

**दशोरे :-**

होय, तेच नियम चालू राहणार आहे.

**हेरल बोर्जिस :-**

डोंगरी, उत्तन, पाली परिसरात वितरण लाईन व्यवस्था महानगरपालिकेने दिले आहे. जे जुने कनेक्शन आहे तर त्या स्थानिक लोकांना तुम्ही कनेक्शन कोणत्या प्रकारे देणार आहात.

**मा. सभापती :-**

ज्या जुन्या लाईन बिडाच्या आहेत. त्या जुन्या लाईनला प्रेशर आहे. समजा एक लाईन मोठी केली त्या सी.एल. किंवा क्रॉस लाईन टाकली तर त्या लाईनवर प्रेशर देऊन पाणी वाढवावे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. नाईक साहेबांनी जो खुलासा केला लोकांच्या जो मजबुरीचा फायदा घेतला जात आहे. नाईक साहेबांनी सांगितले त्या वार्डामध्ये मी राहतो व कम से कम साडे तीनशे कनेक्शन बदली झाले. समजा तो पाईप लिकेज झाला आणि गटाराचे पाणी त्या पाईपमध्ये गेले. लोकांना चांगले पाणी पुरविणे ही टोटल जिम्मेदारी कोणाची आहे तर महानगरपालिकेची आहे. हे करत असताना ज्या कस्टमरने अगोदर कनेक्शन घेतले व त्या पाईप लाईनमध्ये जर काय प्रॉब्लेम आला तर त्याच्यात दोष कुणाचा? लोकांना अडवून अडवून त्याच्याकडुन पैसे घेतले. खड्डा मारायचे रोड क्रॉसिंग करायचे पैसे हे सर्व तुम्ही घेता व महानगरपालिकेतर्फे जे प्लंबर काम करायला येतात तेही पैसे घेतात. तर त्या लोकांनी काय करायचे? आमच्या येथे पैसे घेऊन त्यांनी काम केले आणि मी मुद्दामुन काम त्यांच्याकडुन करुन घेतले. ते पैसे घेतात हे मला सिद्ध करायचे आहे. माझ्या वार्डामध्ये मशीनची व्यवस्था नव्हती. सोय करून मशीन आणून दिल्यानंतर त्यांनी खणून दिले व माझ्या पाठीमागे त्यांनी पैसे घेतले. ग्रुप कनेक्शनचे पंधराशे, बाराशे रुपये दयायचे त्यांच्यानंतर ते काम करतात. नगरपालिकेच्या चुकीमुळे किंवा समजा त्या पाईप लाईनमध्ये काय करायचे आहे. जे साडे तीनशे कनेक्शन मजबुरीने ट्रान्सफर करायला लागले आणि त्या सगळ्यांनी पैसे भरलेले आहे. ते पैसे परत भरणार का? म्हणजे तुम्ही जुन्याचे अस्तित्व नष्ट करायला पाहता. त्या लोकांनी त्या वेळेच्या नियमानुसार पैसे भरलेले आहे.

**मा. सभापती :-**

आपण बिडाच्या पाईप लाईन बद्दल बोलता का सिमेंटच्या लाईन बद्दल बोलता.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब प्रश्न बिडाचा आणि सिमेंटच्या लाईनचा नाही आहे. ती पण पाईप लाईन फूटू शकते. त्याच्यात सुद्धा गटाराचे पाणी जाऊ शकते. आपण बिड आणि सिमेंट ह्यात कशाला बायफरफिकेशन करता.

**मा. सभापती :-**

बायफरफिकेशन करत नाही. आपण बोलता ते बरोबर आहे. समजा आपल्याला कधीतरी अशा लाईनमध्ये लिकेज सापडला नाही. आणि सतत घाण पाणी येते. जर महानगरपालिकेने निर्णय घेतला की ही लाईन बंद करायची. मग त्या लाईनचे शूल्क तेच राहिल. जे आपण आता आकारतोय पाचशेरुपये ते आणि जर ती लाईन बिडाची आहे परंतु ती लाईन पूर्णपणे निकामी झालेली आहे. त्यामध्ये गटाराचे पाणी येते. संपूर्णपणे इंजिनिअरने जाऊन पाहणी केली आणि लिकेज सापडला नाही आणि शेवटी महानगरपालिकेने निर्णय घेतला की ही लाईन दुरुस्त होऊ शकत नाही दुरुस्त होत नाही. म्हणुन आपल्याला नविन पाईप लाईन टाकावी लागेल व आपण ती लाईन टाकू त्यावेळेला शुल्क आकारले जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

या पाचशे रुपयामध्ये आपण काय काय इनक्ल्युड करणार. हे बघा मी सांगतो आपल्याला एखादी पाईप लाईन दुर असते. त्यामुळे त्याला रोड क्रॉसिंगचा प्रॉब्लेम येणार आहे.

**दशोरे :-**

नाही, हा सगळा खर्च कन्झ्युमरनेच करायचा आहे.

**मा. शिवमुर्ती नाईक सो. (उपआयुक्त) :-**

येथे काहीतरी गैरसमज झाला आहे. नगरपालिका फक्त पाईप लाईनला होल पाडून कनेक्शन जोडायला जातील. खोदाईचे काम तेच करतात. फक्त आपल्याकडे जो दुरुस्तीचा खर्च असतो रस्ता

दुरुस्तीचा फक्त तेवढेच आपण जमा करुन घेतो. खोदाई करुन देण्याचे काम प्रायव्हेट व्यक्तिच करते. आणि त्याचा खर्च तुम्ही दिल्याचे सांगता. महानगरपालिकेचे कर्मचारी रस्ता खोदाई करत नाही आणि खड्डापण घेत नाही. खड्डा घेण्याचा खर्च आणि होल पाडायला फक्त आपली माणसे जातात.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब , तुम्ही जे रोड क्रॉसिंगचे पैसे लावता.

**मा. शिवमुर्ती नाईक सा़ो. (उपआयुक्त) :-**

रोड दुरुस्तीचे मग रोड दुरुस्तीचे पैसे नको का लावायला.

**मिलन म्हात्रे :-**

डायरेक्ट माणसे करायला गेले की आपण बदलही करतात. दोन खड्ड्याचे पैसे लावता.

**दशोरे :-**

साहेब, जी जुनी लाईन आपण बंद करतो. तर त्या जुन्या खड्ड्याचे आणि नविन खड्ड्याचे असे पैसे घेतो. जेव्हा आपण लाईन पूर्णपणे बंद करणार तेव्हा आपण जुन्या खड्ड्याचे घेणार आणि मग जेव्हा नविन कनेक्शन खड्डा मारणार तेव्हा फक्त त्याचे चार्जेस घेणार आणि खड्डा दुरस्ती चार्जेस घेणार. जे शिफटींग चार्जेस अडीच हजार रुपये होते ते आता साहेब म्हणतात त्याप्रमाणे पाचशे रुपये घेणार. आणि ही जी लाईन टाकण्याची जबाबदारी आहे ती फक्त कन्झ्यूमरची जबाबदारी आहे. आणि फक्त बोरींग करणे एवढे महानगरपालिकेची जबाबदारी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा आपण हे सर्व कन्झ्युमरवर ढकलु नका. कनेक्शन पास केले व वर्क ऑर्डर मंजुर झाल्यानंतर तुमचा प्लंबर आला पाहिजे एवढे मला माहिती आहे. तुमच्या प्लंबरला आम्ही शोधणार नाही. त्या वर्क ऑर्डरवर पत्ता असतो, नाव असते. त्याने त्या साईटवर जाऊन बघायला पाहिजे.

**रिटा शहा :-**

सन्मा. सदस्य दिनेश नलावडे साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला की त्यांच्या वार्डात आपण मोठी पाईप लाईन टाकली जी लहान पाईप लाईन होती तिच्यावरुन कनेक्शन शिफ्टींग केले आणि पाच हजार रुपये चार्जेस लावले. त्याच्याजवळ माझे दुमत नाही. पण ती लहान पाईप लाईन त्यांच्याकडे आहे जी रिकामी होणार आहे. आणि ती सर्व कनेक्शन शिफ्टींग होणार आहे. व ते कनेक्शन आपण मोठ्या पाईप लाईनवर घेणार आहोत तर आपण त्या पाईप लाईनचे काय करणार आहात.

**दशोरे :-**

कधी कधी काय असते पाणी कमी असते त्यावेळी ह्याच्यावर ट्रान्सफर करणार व बाकी ती लाईन पण चालू राहणार आहे.

**रिटा शहा :-**

चालू राहणार ना !

**दशोरे :-**

लहान पाईप लाईन चालू राहणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, त्या फुटलेल्या पाईप लाईनमध्ये गटाराचे पाणी जात असेल अशी काय लाईन असतील. त्या आपण डिसकनेक्ट कराव्यात. अन्यथा ती पाईप लाईन आणि ही पाईप लाईन चालू राहिल आणि नव्या पाईप लाईनमध्ये घाणेरडे पाणी जाईल. साहेब आमच्याकडे असे चालू आहे.

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. १३४ जुनी पाईप लाईन कायम स्वरुपी बंद करतेवेळी नळ जोडणी नवीन पाईप लाईनवर स्थानांतरित करणेकामी आकारणेत येणाऱ्या शुल्काबाबत विचार विनिमय करणे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहरातील सिमेंटच्या जलवाहिन्या कायम स्वरुपी बंद करतेवेळी त्यावरील अस्तित्वातील नळ जोडण्या, नविन जलवाहिन्या स्थानांतरित करण्यासाठी बोरिंग चार्जेस, खड्डा खोदाई चार्जेस नियमाप्रमाणे घेण्यात यावेत. परंतू नळ जोडणी स्थानांतरित चार्जेस म्हणुन रुपये पाचशे प्रमाणे आकारण्यात मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे.

**प्रकरण क्र. १३४ :-**

जुनी पाईप लाईन कायम स्वरुपी बंद करतेवेळी नळ जोडणी नविन पाईप लाईन वर स्थानांतरित करणेकामी आकारणेत येणाऱ्या शुल्काबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. ११६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने महानगर पालिका हद्दीतील जुन्या सिमेंटच्या व बिडाच्या जलवाहिन्या कायम स्वरूपी बंद करते वेळी व जुन्या पाईपलाईनमधून गढुळ अथवा दुषित पाणी पुरवठा होत असल्यास महानगरपालिका सदर जलवाहिनी कायम स्वरूपी बंद करीत असेल तर त्यावरील अस्तित्वातील नळ जोडणी नवीन जलवाहिन्यावर स्थानांतरीत करणेसाठी इतर चार्जेस न घेता नळ जोडणी स्थानांतरीत शुल्क सरसकट रू. ५००/- (रूपये पाचशे मात्र) प्रमाणे आकारून नळ जोडणी स्थानंतरीत करणेस मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा येथे संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०१.३० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रभारी सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**